।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री पितृनवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

## ।।अध्याय पहिला।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

प्रथम नमितो गजाननासी। लाभावी तयाची कृपा मजसी। असावा सदा वरदहस्त शिरसी। जाई तेणेंच सर्व कार्य सिध्दिसी।।१।। करुनी देवगजाननाचे स्मरण। करीन पितृनवशतीचे लेखन। विषय शब्दादिने होऊन संपन्न। व्हावे माझे हे कार्य पूर्ण।।२।। नमन माझे देवी सरस्वतीसी। तिचिया कृपे चारही वाणी स्फुरती। लाभे अलौकिक परिमळ शब्दांसी। फुटती शब्दाशब्दातूनी अर्थ धुमारे।।३।। विनंती माझी तिचिया चरणी। करावी लिहीती माझी लेखणी। प्रासादिकता ग्रंथास सहजी लाभुनी। व्हावी अर्थपूर्ण पितृ नवशती।। ४।। विनम्र वंदन श्रीकृष्ण चरणासी। असे तो श्रीधर अंतर्यामी। असो त्याचा निवास मम हृदयी। देईल तोच मज लिहिण्यास स्फूर्ती।।५।। असे श्रीकृष्णमय हे सर्व जग। जळी स्थळी काष्ठी पाषाणी तो स्थित। सर्व पितर हे ही कृष्णाचेच स्वरुप। महती पितरांची व्हावी प्रकट।।६।। श्री स्वामी समर्थांनी देऊनी प्रेरणा। सांगितले पितृनवशती लिहिण्या। लाभावे पितर विषयक ज्ञान सकला। लाभेल पितृकृपा त्यामुळे सर्वांना।।७।। माझे सद्‌गुरु श्री स्वामी समर्थ। असे मी त्यांचाच दासानुदास। असे मम शिरी त्यांचा वरदहस्त। तेणेच होईल माझे कार्य सफल।।८।। वंदन माझे माझ्या मातापिताचरणी। मातापिताच असती परमदैवत जगी। ममतेने माझे संगोपन करुनी। घडविले

त्यांनीच या वैद्य गणेशासी।।९।। सिंधू माझी माता, पिता लक्ष्मण। असे त्यांचे मम जीवनी वरदान। चरणी त्यांच्या मी अनन्यशरण। त्यांच्याच कृपेने लिहीन पितृमाहात्म्य।।१०।। असती पितर सर्वांसी वंदनीय। त्यांची महती या नवशतीत सांगेन। माझे पिता देतील मज स्फुरण। मातेच्या कृपेने होईल नवशती पूर्ण।।११।। माझे आईबाबा,द्यावे ज्ञान तुम्हीच। द्यावा मजसी पितृलोकाचा परिचय। व्हावे त्या सर्वांचे अंतरंगी स्फुरण। लाभावे त्या सर्वासी शब्दरुप।।१२।। करितो आता पितृवंशाचे वर्णन। असती स्वर्गात पितरांचे सातगण। त्यातील तीन गण असती मूर्तिरहीत। चारगण पितरांचे असती मूर्तिमान।।१३।। अत्यंत तेजस्वी असती सातही गण। अमूर्त पितृगणात असती वैराज नाम। असती वैराज प्रजापतीचे संतान। पूजिती तयांसी समस्त देवगण।।१४।। यांना प्राप्त होई सनातन लोक। परी होती ते योगमार्गापासून विचलित। ब्रह्माच्या दिनाच्या अंतिम भागात। ब्रह्मवादी रुपात होती ते उत्पन्न।।१५।। पूर्वजन्म स्मृती होतसे तया प्राप्त। घेऊनी मग सांख्ययोगाचा आश्रय। (सांख्ययोग हा भारतीय षड्दर्शनांपैकी एक असून कपिलमुनींनी तो सांगितला आहे.) योगाभ्यासाने करती सिध्दी प्राप्त। होण्या जन्ममरण फेऱ्यातून मुक्त।।१६।। मेना ही ह्यांची मानस कन्या। असे मेना हिमालयाची जाया। मैनाक नावाचा तिचा पुत्र दुसरा। क्रौञ्च नावाचा तिचा पुत्र पहीला।।१७।। क्रौञ्च नामे पर्वत असे प्रसिध्द। असे हा पर्वत घृताने (तुपाने) परिवेष्टित। होत्या मेनाच्या कन्या तीन। उमा, एकपर्णा आणि अपर्णा नाम।।१८।। दिल्या हिमवानाने आपुल्या ह्या कन्या। उमा नामे रुद्राला, दूसरी एकपर्णा सिताला। तिसरी अपर्णा दिली जैगीषव्याला। तीनही कन्यांचा असा विवाह झाला।।१९।। पूर्वजन्मी होती उमा दक्षपुत्री। रुद्र म्हणजे शिव

पितरांचा अधिपती। दक्षाने केला शिवाचा अवमान यज्ञी। म्हणे शिव सर्व जगताचा संहार करी।।२०।। अमंगल शिव असे अमंगलभागी। त्यामुळे नसे योग्य तो यज्ञभागासी। पतिनिंदा ऐकून उमा संतप्त झाली। रागाने केला देहत्याग यज्ञमंडपी।।२१।। झाला यज्ञस्थानी प्रचण्ड हलकल्लोळ। त्यामुळे मग दक्ष झाला दु:खित। म्हणाला नंतर तो स्वकन्येस। मुली असशी जगज्जननी तू तर।।२२।। मजवर अनुग्रह करण्यास्तव। आली असशी तू पुत्री होऊन। असे तुझीच सत्ता सकळ चराचरात। नको करुस तू माझा परित्याग।।२३।। म्हणाली उमा तेंव्हा दक्षासी। करीन पूर्ण मी मम कार्यासी। करतील यज्ञाचा विध्वंस शिवजी। नंतर त्यांना प्रसन्न करण्यासी।।२४।। मृत्युलोकी करावे कठोर तपश्चर्येसी। त्या प्रभावाने होशील प्रजापती। होतील नंतर साठ कन्या तुजसी। होईल तुला उत्तम योगाची प्राप्ती।।२५।। दक्षाने मग विचारले स्वकन्येसी। या पापातून मुक्त होण्यासाठी। कोणकोणत्या महत्त्वाच्या तीर्थस्थानांसी। जावे मी सांग तुझे दर्शन घेण्यासी।।२६।। म्हणाली जगज्जननी मग दक्षासी। सर्व प्राण्यांमध्ये आणि नित्य नेहमी। असे सर्व चराचरात विद्यमान मी। परी सिध्दी आणि कामनापूर्तीसाठी।।२७।। जावे माझ्या विविध स्थानांसी। एकशे आठ मम स्थाने प्रसिध्द असती। तशीच एकशे आठ माझी रुपे असती। करता माझे स्मरण होईल पापमुक्ती।।२८।। जो कोणीही मनुष्य करील। माझ्या ह्या नामांचे स्मरण। तो मनुष्य निश्चितपणे तेवढ्यानेच। सर्व पापांपासून होईल निवृत्त।।२९।। त्याचप्रमाणे माझ्या विविधस्थानी जाऊन। करील जो भक्तिपूर्वक माझे दर्शन। होईल तो त्याच्या सर्व पापांतून मुक्त। लाभेल कल्पपर्यंत शिवलोक निवास त्यास।।३०।। असे सांगून करुन देहत्याग। शिवाची पत्नी होण्यास्तव। घेतला जन्म तिने मेनापुत्री

म्हणून। तपश्चर्येने झाली शिवपत्नी पार्वतीरुपात।।३१।। परमात्मा विष्णुच्या आज्ञेने प्रेरित। होऊन घेऊन ध्यानी वेदांतील ज्ञान। केले ब्रह्मदेवाने सृष्टीचे सृजन। झाली चारवाणी चारखाणी सृष्टी उत्पन्न।।३२।। (चारवाणी - परा,पश्यन्ती, मध्यमा, वैखरी। चारखाणी - उद्भीज, स्वेदज,अंडज, जारज) केले ब्रह्मदेवाने मानस पुत्रांचे सृजन। तैसेची केले त्याने पितर उत्पन्न। पितरांचे स्थान होते स्वर्गात। पितरांचे पूजन करती सर्व देव।।३३।। असती पितर शीघ्र संतुष्ट। असती क्रोधरहीत, शस्त्रविहीन, दृढ मैत्रीयुक्त। शांतात्मा ते असती पवित्रता परायण। असती सदा प्रियवादी पितर।।३४।। असती पितर भक्तीप्रिय। होती भक्तांवर शीघ्र प्रसन्न। गृहस्थांची प्रथम देवता पितर। गृहस्थाश्रमीयांनी करावे त्यांना संतुष्ट।।३५।। करती पितर हविष्यान्न भक्षण। सूर्यच असे पितरंचा अधिनायक। पितरांचे हे वर्णन आयुरारोग्यवर्धक। असे हे वर्णन बहु पुण्यदायक।।३६।।या पितरांच्या पासून मनुगण। करती आपापल्या प्रजेचे सृजन। या पितरांच्या कृपेकरुन या सृष्टीत। असे झाला महान श्राध्दपरंपरेचा उगम।।३७।। पितरांच्या नामे श्राध्द विधानात। चांदीचे किंवा चांदीमिश्रित धातुचे पात्र। 'स्वधा' उच्चारणासह द्यावे ब्राह्मणास। ऐशा दानाने होती पितर प्रसन्न।।३८।। करावे अग्नि, सोम, यम, तर्पण। नाही जमले तर ब्राह्मणाच्या हस्तावर। जल, अजाकर्ण, अश्वकर्ण वा गोशाळेत। द्यावे तर्पण श्रध्दा भक्तिभाव पूर्वक।।३९।। पितरांचे स्थान असे आकाश। दिशांमध्ये विशेषतः दिशा दक्षिण। जल,तीळ, गाईचे दूध, तांदूळ, यव। मूग, ऊस, श्वेतपुष्प, घृत(तूप)पितरांस प्रिय।।४०।। काळे उडीद, कुमुदपुष्प, कमल, बेल, मंदार। धोत्रा, बकरीचे दूध पितरांस निषिध्द। मोहाचे फूल, चणे, आळशी हे पदार्थ। करु नये यांचा उपयोग श्राध्दात।।४१।। करता

भक्तिपूर्वक पितरांस प्रसन्न। देती समृध्दी, स्वर्ग, आरोग्य, संतान। देवकार्या पेक्षा पितृकार्य असे विशेष। देवतांच्या आधी करावे पितृतर्पण।।४२।। होती पितर शीघ्रवेगे कृपावंत। शांत, पवित्र, प्रियवादी, भक्तानुरक्त पितर। गृहस्थासाठी सुखदायक, आद्यदैवत। श्राध्दात देवतारुपे असे सूर्य अधिष्ठित।।४३।। असती श्राध्दाचे तीन प्रकार। नित्य, नैमित्तिक आणि काम्यरुप। नित्यश्राध्दास मानती अदैव श्राध्द। पर्वकाळचे श्राध्द पार्वण नामे प्रसिध्द।।४४।। श्राध्दास्तव कोणते ब्राह्मण उचित। सांगतो ते आता विशेष करुन। पंचाग्नि ज्ञाता, पंचाग्नि उपासक। स्नातक, वेदज्ञ, श्रोत्रिय, विद्वान।।४५।। (पंचाग्नि - १ दक्षिणाग्नी, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य, आवसभ्य। २ वडवाग्नी, मंदाग्नी, जठराग्नी, शोकाग्नी, कामाग्नी।) सर्वज्ञ, उच्चकुलीन, पुराणज्ञ, धर्मज्ञ। शिवभक्त, पितृपरायण, सूर्यभक्त, वैष्णव। ब्राह्मणभक्त, योगज्ञ, तसेच कुलीन। आत्मसंयमी,शीलवान हे उचित।।४६।। श्राध्दाचे भोजन देण्यालायक। पुत्रीचा पुत्र, मित्र, गुरु, आचार्य। सोमपायी, विद्यागुरु, बंधु, ऋत्विक। विधीवाक्य, व्याख्याता, यज्ञाचा मिमांसक।।४७।। सामवेद,स्वरज्ञाता, ब्रह्मचारी, विद्वान। करवावे यांनाच प्रयत्नपूर्वक भोजन। ऐशा श्रेष्ठांनी करता श्राध्दभोजन। होईल तेच श्राध्द परमार्थ संपन्न।।४८।। निमंत्रित ब्राह्मणाने असावे क्रोधरहीत। पवित्र, आचारसंपन्न, ब्रह्मचर्य व्रतस्थित। तैसेची श्राध्दकर्त्याने करावे व्रतपालन। या श्राध्दास म्हणती पिंडान्वाहार्यक श्राध्द।।४९।। पिंडान्वाहार्यक श्राध्दाचे असे वैशिष्ट्य। करावे हे नेहमी अमावस्या तिथीस। शक्यतो करावे हे श्राध्द गोशाळेत। अथवा करावे जलाशयासमीप।।५०।। श्राध्दकर्त्याने पितरांसाठी निर्मित। चरुंचे दोनादि समसंख्याक मुठीने। करावे चरु पितरांना प्रदान। उरलेले ठेवून घ्यावे

उजव्या बाजूस।।५१।। (चरु - यज्ञ इत्यादिसाठी शिजवलेला भात) अग्निमध्ये देऊन तुपाची धार। करावे चरु तीन भागांमध्ये विभक्त। त्यांचा करावा चार बोटा एवढा विस्तार। नंतर धातुच्या तीन पळ्या घ्याव्यात।।५२।। अशाच प्रकारे होऊन अपसव्य। म्हणजे जानवे उजव्या खांद्यावर घेऊन। घ्यावे पितळ्याचे जलपात्र व कुश(दर्भ)। तीळ, समिधा, दुसरे पात्र, नतून वस्त्र।।५३।। गंध, धूप, चंदन इत्यादि घेऊन। ठेवावे सर्व स्वतःच्या उजव्या बाजूस। अशाप्रकारे सारे साहित्य जमवून। करावी तयारी दरवाज्यासमोर।।५४।। शेणाने सारवलेल्या स्वच्छ भूमीवर। सव्यानेच करावे चौकोनी मंडळ। अक्षता, फूल इत्यादिने करुन पूजन। करावे निमंत्रित विश्वेदेव ब्राह्मणांचे स्वागत।।५५।। नंतर शेणाने सारवलेल्या स्वच्छ भूमीवर। अपसव्य होऊन गोमुत्राने करावे गोलमंडळ। अक्षता पुष्पाने त्याची पूजा करुन। करावे निमंत्रित ब्राह्मणांचे स्वागत।।५६।। आदरपूर्वक करावे त्यांचे पादप्रक्षालन। करावे वारंवार त्यांचे अभिनंदन। दर्भापासून बनवलेल्या आसनी बैसवून विधिपूर्वक। आचमन देऊन द्यावे जलपान।।५७।। ब्राह्मणांची संख्या देवकार्यास दोन। पितृकार्यासाठी असावे तीन ब्राह्मण। किंवा देव आणि पितृ दोन्ही कार्यात। करवावे एक एका ब्राह्मणास भोजन।।५८।। या निमंत्रित ब्राह्मणांची आज्ञा घेऊन। चरुला कास्याच्या पात्रात ठेवून। गृह्योक्त विधानानुसार विधिपूर्वक। करावे अग्निमध्ये चरुचे हवन।।५९।। करावे अग्नि, सोम तसेच यमतर्पण। करावा 'दक्षिण' नाम अग्नी प्रज्वलीत। करावे नंतरच श्राध्दकर्म संपन्न। करावे हे सारे कार्य अपसव्य होऊन।।६०।। शिल्लक हविचे करुनी सहापिंड। सोडावे डाव्याहस्ते तीळावर जल। नंतर करुनी मन इर्ष्या द्वेषरहीत। डावा पाया दुमडून हातात दर्भ घेऊन।।६१।। वेदीवर रेषा

ओढून पसरावे दर्भ। नंतर दक्षिणेस करुनी मुख। पसरलेल्या दर्भावर करावे जलसिंचन। नंतर आपुल्या हातात पळी घेऊन।।६२।। करुन पितरांचे गोत्र तथा नामोच्चारण। ठेवावे ते पसरविलेल्या दर्भावर। नंतर त्या पिंडावर करावे जलसिंचन। करावे गंधादि उपचाराने पूजन।।६३।। त्यानंतर वेदमंत्रांचे करुन उच्चारण। करावे पुन्हा पितरांचे आवाहन। नंतर पितरांच्या पत्नींना उद्देशून। करावे दर्भावर भक्तीने अन्नप्रदान।।६४।। पिंडावर करुन आवाहन विसर्जन। त्यापिंडांमधून थोडाथौडा भाग घेऊन। करावे ते निमंत्रित ब्राह्मणांस प्रदान। ब्राह्मणांनी त्याचे करावे ग्रहण।।६५।। अमावस्यादिनी पिंडान्नातून घेतलेल अन्न। करती त्याचे भक्षण ब्राह्मण। म्हणून अन्वाहार्यक श्राध्द ऐसे नाम। दिले असे अमावस्येच्या श्राध्दास।।६६।। प्रथम हातावर करुन जलसिंचन। नंतरच ब्राह्मणांच्या हाती द्यावे पिंडांश। करुनी भक्तीने नारायण स्मरण। आग्रहपूर्वक भोजन द्यावे ब्राह्मणांस।।६७।। ब्राह्मणांची तृप्ती झाल्यनंतर। सर्व वर्णांसाठी करावे विकर कर्म। तेंव्हा सांडवावे अगदी प्रयत्नपूर्वक। ते अन्न जलसहीत प्रेमे भूमीवर।।६८।। नंतर पुन्हा ब्राह्मणांस द्यावे आचमन। नंतर हाती घेऊन जल, पुष्प, अक्षत। स्वस्तिवाचनपूर्वक घालावे पिंडांवर। शेवटी करावे श्राध्दफळ कृष्णास अर्पण।।६९।। नंतर ब्राह्मणांस प्रदक्षिणा घालून। आदरपूर्वक द्यावा ब्राह्मणांस निरोप। दक्षिण दिशेला मग करुनी मुख। पितरांकडे विनम्रत्वे करावी याचना।।७०।। आमचे दाता, वेदज्ञान तसेच संतान। व श्रध्दा या साऱ्याची वृध्दि होत जावो। दानदेण्यायोग्य आम्ही असावे सतत। दारी यावे सतत अतिथिगण।।७१।। अशाप्रकारे विधिपूर्वक श्राध्द समाप्ती नंतर। करावे ते पिंड गाय वा बकरीस अर्पण। किंवा टाकावे ते अग्नि किंवा जलात। तसेच

उत्तम संतान प्राप्ती व्हावी म्हणून।।७२।। श्राध्दकर्त्याच्या पत्नीने मधले पिंड। प्रार्थना पूर्वक श्रधेने करावे भक्षण। अशारीतीने पितृकर्म करुन पूर्ण। विश्वेदेवाचे करुन पूजन करावे भोजन।।७३।। श्राध्दकर्ता व भोक्त्यास असती नियम। करु नये त्याने नंतर पुन्हा भोजन। मैथुन, कलह, दिवसा शयन। करावा दोघांनी या साऱ्याचा परित्याग।।७४।। सपिंडीकरणा नंतर गृहस्थाने। कन्या, कुंभ किंवा वृषभ राशीत सूर्य स्थित। असता करावे विधिवत पिंडदान। होईल तेणे सुखीगृहस्थ जीवन।।७५।। सांगितले अन्वाहार्यक श्राध्दविषयक। केले जाते जे अमावस्या तिथीस। आता सांगतो काय इच्छिती पितर। सांगितले जे मत्स्यपुराणी पितृगाथेत।।७६।। म्हणाले मत्स्यभगवान मनुराजास। करतो आता पितृगाथेचे वर्णन। सांगितले असे हे सर्व पितरांनीच। सांगतो तुजसी तेच सकल।।७७।। करती इच्छा पितृलोकी स्थित पितर। असे जी तीव्र त्यांच्या मनात। म्हणती असा कोणी होईल वंशज। जो शीतल नदी स्थानी जाऊन।।७८।। देईल शीतल जलांजली आम्हास। त्यामुळे होईल आमुची तृषा शांत। करील जो दूध, मूळ, फळ। आणि विविध खाद्यसामग्री सहीत।।७९।। अथवा जर हे काही नसेल शक्य। तर देईल जो तिळासहीत जल। करील जो अतिशय भक्तिभावापूर्वक। केवळ जलतर्पणाने करील नित्य श्राध्द।।८०।। होईल का कुणी आमुच्या वंशात। वर्षाऋतुमध्ये मघा नक्षत्रावर। जर त्रयोदशी आली तर। जो करील आमुचे भक्तिपूर्वक श्राध्द।।८१।। करुन भक्ति भावपूर्वक श्राध्द। मधु तुप मिश्रित असे खाद्य। जे शिजविलेले असेल दुधात। करील तो ते आम्हास अर्पण।।८२।। घेईल का कुणी जन्म कुळात। जो काल समयोचित उत्पन्न भाज्या घेऊन। आमचे श्राध्द करुन करील अर्पण। त्यामुळे आम्ही पितर होऊ

तृप्त।।८३।। मधु, कालशाक, महाशाक यांनी युक्त। मुनिजन जे सेवन करती ते अन्न।। करतो ग्रहण आम्ही पितर। ते मात्र फक्त सूर्यास्त समया पूर्वीच।।८४।। होईल ऐसा कुणी आमुच्या वंशात। जो सूर्यग्रहण पर्व समयास। अर्थात राहु दर्शन काल पर्यंत। जाऊनी जो पवित्र गयातीर्थास।।।८५।। गजच्छाया योग होता प्राप्त। करवील आम्हास असे भोजन। फळांच्या गराने असेल युक्त। ऐसे अतिशय उत्तम अन्न आम्हा देईल।।८६।। देईल जर तो ऐसे अन्न। त्यामुळे कल्पपर्यंत आम्हा पितरांस। लाभेल तृप्ती होऊ प्रसन्न। देणाऱ्याला होईल सद्‌गती प्राप्त।।८७।। सांगितले जे आम्ही तुम्हास। यातील एकानेही होतो तृप्त। जर देईल हे सर्व आम्हास। त्या विषयी काय सांगू तुम्हास।।८८।। असा आमचा वंशज कोणी असेल। जो करील आम्हा पितरांस्तव। कृष्णमृग चर्माचे देईल दान। होऊ त्यामुळे आम्ही प्रसन्न।।८९।। होईल का कुणी ऐसा नरश्रेष्ठ। जो करील आमुच्या कुळास धन्य। देऊन गोदान श्रेष्ठ ब्राह्मणास। करील आम्हा सर्व पितरांस तृप्त।।९०।। घेईल कुणी आमुच्या कुळात जन्म। असेल जो नितांत पितृभक्त। भक्तीने आम्हा पितरांस्तव। करील जो वृष (बैल) उत्सर्ग (सोडणे)।।९१।। असती बैलाचे (सांड) अनेक रंग। पण उत्सर्गासाठी विशेष वर्ण। असावा तो वृष(सांड) नीलवर्णीय। अथवा शुक्ल(पांढरा ) रंगाचा वृष।।९२।। असेल आमुच्या कुळात नरश्रेष्ठ। असेल जो अतिशय दानशूर। करील भक्तीने तो श्राध्द संपन्न। देईल ब्राह्मणांस विविध दान।।९३।। श्रध्दायुक्त अंत:करणाने देईल। सुवर्ण दान, गोदान, श्रेष्ठ ब्राह्मणांस। देईल जो पृथ्वीदान आम्हास्तव। ज्यामुळे लाभेल तृप्ती आम्हां पितरांस।।९४।। असेल असा कुणी आमुचा वंशज। करील जो बागबगिचा, कूप। सरोवर आणि

विहीर। करुन निर्माण होईल तो धन्य।।९५।। घेईल जन्म आमुच्या कुळात। असा कोणी जो असेल विष्णुभक्त। मधुसूदन त्या देवेशास शरण। करील त्याची भक्ती नितांत।।९६।। असेल आमुच्या कुळात विद्वान। जो करील विद्वद्‍जनांचा सत्कार। देईल विद्वानांना भक्तिपूर्वक। धर्मशास्त्रविषयक पुस्तक दान।।९७।। अशी इच्छा व्यक्त करती पितर। असे ती पितृकल्पात (गाथेत) वर्णित। सांगितली तुजसी करुन वर्णन। ऐकूनच होशील तू धन्य।।९८।। असे हा श्राध्दकल्प अति पवित्र। असे श्राध्दकर्मविधि वर्णन त्यात। असे हे वर्णन सकल पापनाशक। असे हे वर्णन पुण्यवर्धक।।९९।। ऐकवील जो श्राध्दसमयास। ही पितृगाथा सर्वांस भक्तिपूर्वक। श्राध्दात अर्पिलेले अन्न पदार्थ। लाभती पितरांस अक्षय रुपात।।१००।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन प्रथम श्रीगजाननास। जावे माझे कार्य पूर्णत्वास। करुनी सर्व विघ्नांवर मात। व्हावी पूर्ण ही पितृनवशती।।१।। करीतो देवी शारदे तुज नमन। तुझ्या कृपेनेच स्फुरते वचन। पितृवर्णन नवशतीत साकारुन। करावे कृतार्थ वैद्य गणेशास।।२।। व्यापिले श्रीकृष्णानेच चराचर। निर्गुण निराकार तो सर्वेश्वर। करुन तयासी विनम्र नमस्कार। श्राध्दविधींचे मी करीन वर्णन।।३।। भोगमोक्ष प्रदायी साधारण श्राध्द। स्वयं भगवान विष्णुने केले वर्णन। हे श्राध्द असे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण। सांगतो वर्णुन त्याचे विधी विधान।।४।। सूर्याचे उत्तरायण व दक्षिणायन। सूर्याचे तुला व मेष संक्रमण म्हणजे विषुव योग। कृष्णापक्षाची अष्टका तिथी समुदाय। तसेच अमावस्या आणि पोर्णिमेस।।५।। (अष्टका तिथी - मार्गशीर्ष, पौष, फाल्गुन कृष्णपक्षाची सप्तमी, अष्टमी आणि नवमी ह्या तीन तिथींचा समुदाय) आर्द्रा, मघा, रोहिणी नक्षत्रास। ब्राह्मण मिळाल्यावर आणि असता द्रव्य। गजच्छाया, व्यतिपात, वैधृतियोग। विष्टी, भद्रा, करण ऐशा योगास।।६।। करावे अशा दिनी साधारण श्राध्द। करीतसे हे श्राध्द पितरांस प्रसन्न। असती आणखीही फलदायक योग। सांगतो येथे मी करुन वर्णन।।७।। अक्षयतृतीया, अक्षयनवमी। माघीपुनव, भाद्रपदशुक्ल त्रयोदशी। असती या सर्व युगादि तिथी। करावे या तिथींस श्राध्द संपन्न।।८।। या

फलदायी तिथींवर करता श्राध्द। होई ते श्राध्द अक्षय फलदायक। मन्वन्तराच्या आदि तिथींना करावे श्राध्द। सांगतो कोणत्या ह्या तिथी मी येथे।।९।। आश्विन शुक्ल नवमी, कर्तिक शुक्ल द्वादशी। चैत्र व भाद्रपद शुल्क तृतीया। फाल्गुनी अमावस्या, पौष शुक्ल एकादशी। आषाढ शुक्ल दशमी, माघ शुक्ल सप्तमी।।१०।। श्रावण कृष्णाष्टमी, आषाढीपोर्णिमा। कार्तिक, फाल्गुन, चैत्र, ज्येष्ठपोर्णिमा। असती अशा या तिथी एकूण चौदा। असती ह्या मन्वन्तराच्या आदि तिथी।।११।। ज्या मन्वन्तराच्या आदि तिथी। ह्यातील माघ शुक्ल सप्तमी तिथी। होती सूर्यदेव रथारुढ त्या तिथीस। रथसप्तमी नामे प्रसिध्द असे ही तिथी।।१२।। करती या तिथीस तिळ जलतर्पण। असे त्याचे महत्त्व सहस्र श्राध्दांसम। होती पितर त्यामुळे अति प्रसन्न। स्वतः पितर वर्णिती याचे माहात्म्य।।१३।। वैशाखी पौर्णिमा, सूर्यचंद्रगहण। विविधोत्सव प्रसंगी, पितृपक्षात। तीर्थस्थानी, देवमंदिर, गोशाळेत। पूज्यभक्तिभावे करावे श्राध्द।।१४।। श्राध्दाच्या आधी दोन दिवस। शीलवान ब्राह्मणास करावे निमंत्रित। देवकार्यास दोन, पितृकार्यास तीन। अथवा एकेक ब्राह्मण दोन्ही कार्यांस।।१५।। विश्वेदेवांना देऊनी आसन। यव आणि फुलांनी करावे अर्चन। 'शं नो देवीरभीष्टये०' (वाज.सं३६/१२)। म्हणून दोन मातीचे घट जलाने भरावे।।१६।। 'यवोऽसि' (नारायणोपनिषद्) या मंत्राने। कुंभामध्ये यवाचे (साळीचे) दाणे टाकावे। नंतर गंधाक्षता फुलांनी पूजन करावे। विश्वेदेवांसाठी त्यांच्याजवळ ठेवावे।।१७।। 'विश्वेदेवास०' (शु.यजु ७/३४) ह्या मंत्राने। आवाहन करुन दर्भ भूवर पसरावे। गंधपुष्प वाहून' या दिव्या आप०'। (तै.सं) ह्या मंत्रोच्चाराने अर्घ्य द्यावे।।१८।। अशाप्रकारे करुनी पूजन। त्यांच्या पासून निवृत्त होऊन। करावा आरंभ पितृकार्यास।

अपसव्याने द्यावे ब्राह्मणांस दर्भासन।।१९।। करावी तीन अर्घ्यपात्रे तयार। दर्भनिर्मित पवित्रक टाकावे त्यात। 'शं नो देवी०' (शु.यजु. ३६/१२) मंत्राने। भरावी ती तीनही पात्रे जलाने।।२०।। 'तिलोऽसि'मंत्राचा करुनी उच्चार। तीळ,गंध,पुष्प, टाकून पूर्ण भरावे। पितरांसाठी निर्मित ही पात्र। असावी लाकडी, रजतमय किंवा सुवर्णमय।।२१।। पितृकार्यात चांदीस विशेष महत्त्व। झाली चांदी शिवाच्या नेत्रापासून उत्पन्न। असे चांदी पितरांस परम प्रिय। चांदीमुळे पितर होती प्रसन्न।।२२।। अशारीतीने ती पात्रे घेऊनी हातात। करावे पित्याचे नाम व गोत्र उच्चारण। नंतर ब्राह्मणांची अनुज्ञा घेऊन। मंत्रोच्चारणाने करावे पितरांचे आवाहन।।२३।। त्यासाठी वंदन करुन ब्राह्मणांस। सांगावे करीतो आता पितरांस आवाहन। द्यावी ब्राह्मणांनी अनुमती 'कर'म्हणून। नंतर श्राध्दकर्त्याने करावे पितरांस आवाहन।।२४।। 'उशन्तस्त्वा० - एवं आयान्तुन:०'। या ऋचांनी करावे पितरांचे आवाहन। 'या दिव्या०'मंत्राचे करुन उच्चारण। करावे पितरांना अर्घ्य प्रदान।।२५।। नंतर गंध फुलाने करावे त्यांचे पूजन। पिण्डदान करण्या आधी घ्यावे जल। ते जल ठेवावे पितृपात्रात। नंतर ठेवावे ते पात्र वेदीच्या अग्रभागात।।२६।। 'पितृभ्य: स्थानमसि' असे म्हणून। करावे त्या ठिकाणी जलसिंचन। ह्या कार्यातही करावे अग्निकार्य संपन्न। हातात दर्भ घेऊन द्यावे भोजन।।२७।। असती पितर गृहस्थांस आद्य पूजनीय। म्हणूनी श्राध्दकार्याच्या समयास। पितृसूक्त, इंद्र अग्नि,सोमसूक्त। इत्यादि प्रीतिवर्धक सूक्तांचे करावे पठण।।२८।। ब्राह्मण भोजन झाल्यावर पूर्ण। सर्व वर्णांसाठी योग्य ते अन्नपदार्थ। त्यांना प्रथम करुनी जलयुक्त। भोजनकर्त्यांच्या समक्ष भूमिवर ते पसरवावे।।२९।। करावी प्रार्थना मन:पूर्वक। ''माझ्या कुळातील

ज्यांचा अग्निसंस्कार। झाला असेल अथवा झाला नसेल। त्या सर्वांना या अन्नाने लाभो सद्‌गति परम'' ।।३०।। त्यानंतर भोजनकर्त्या ब्राह्मणांच्या हातावर। श्राध्दकर्त्याने श्रध्दापूर्वक द्यावे जल। दक्षिणाभिमुख होऊन पसरवावे दर्भ। करावे श्राध्दकर्त्याने गोत्रोच्चारण।।३१।। नंतर दर्भावर म्हणजेच पिंडवेदीवर। करावे शुध्दी होण्यासाठी जल सिंचन। त्यानंतर अन्नाचे पिंड ठेवावे दर्भावर। गंध आणि फुलांनी करावे पिंडपूजन।।३२।। डाव्या हाताने डावा घुडगा टेकून। हातात दर्भ धारण करुन। नंतर भावभक्तिने सकल विधिपूर्वक। करावे श्रध्देने पितृकार्य संपन्न।।३३।। पितृकार्यात पितरांना उद्देशून। यथाशक्ति दक्षिणा द्यावी ब्राह्मणांस। तैसेच गाय, पृथ्वी, हिरण्य, वस्त्र। सुंदर शय्यादिंचे द्यावे ब्राह्मणांस दान।।३४।। नंतर 'स्वधा'चे उच्चारण करुन। श्राध्दकर्त्याने व्हावे पूर्वाभिमुख। करावे विश्वेदेवांना जल प्रदान। ऐसे करुन घ्यावे त्यांचे आशीर्वाद।।३५।। सविनय विनंती करावी ब्राह्मणांस। व्हावे आमुचे पितर अतिशय सौम्य। व्हावी आमुची गोत्रवृध्दी, समृध्दि आम्हांस। तैसेची आमच्या दात्यांना व्हावी प्राप्त।।३६।। करावी विनंती होवो आशीर्वाद सत्य। 'होईल तैसेची' ऐसे ब्राह्मण वचन। करवून ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन। पिंड उचलून करावा ग्रहबली भक्तिपूर्वक।।३७।। निमंत्रित ब्राह्मणांच्या विसर्जनापर्यंत। असती सकल वस्तुजात उच्छिष्ट। ब्राह्मणांचे उच्छिष्ट, भूवरील अन्न। असे नोकरांचा अधिकार त्यावर।।३८।। पितरांसाठीचे हे तर्पणरुप कार्य। पुत्रहीन, पुत्रवान अन स्त्रियांसााठीही योग्य। कार्यानंतर ब्राह्मणांसी पुढे उभे करुन। जलपात्र हाती घेऊन 'वाजे वाजे'म्हणत।।३९।। ऐसे करावे पितरांचे विसर्जन। द्यावा निरोप आठ पाऊले चालून। येऊन करावा अग्निस प्रणाम। मंत्रपूर्वक करावा वैश्वेदेव, नित्यबळी प्रदान।।४०।।

वैश्वेदेव, बळी, विधिपूर्वक करुन। अतिथि, बंधु, पुत्रांसह करावे भोजन। असे हे सामान्य नाम पार्वण श्राध्द। करी सर्वप्रकारचे मनोवांछित पूर्ण।।४१।। आता सांगतो आभ्युदायिका वृध्दिश्राध्द। असे हे तिसऱ्या प्रकारचे पार्वण श्राध्द। करावे उत्सव, आनंद, यज्ञ, विवाह। इत्यादि शुभसमयी करावे हे संपन्न।।४२।। या श्राध्दात प्रथम मातांचे पूजन। त्यानंतर करावे पितरांचे पूजन। ह्या पूजनानंतर मातामहांचे पूजन। तसेच करती विश्वेदेवांचे पूजन।।४३।। श्राध्दकर्त्याने प्रथम होऊन पूर्वाभिमुख। त्यानंतर करावी प्रदक्षिणा पिंडास। नंतर दही, अक्षता, फल, जल घेऊन। दुर्वा दर्भासह सर्व करावे पिंडास अर्पण।।४४।। 'संपन्नम्' हा आभ्युदयिक श्राध्दाचा मंत्र। मंत्रोच्चारणाने करावे पितरांस अर्घ्यप्रदान। या प्रसंगी वस्त्र सुवर्णादि साहित्य घेऊन। करावे दोन ब्राह्मणांचे पूजन।।४५।। तीळाच्या ठिकाणी 'नांदी'शब्द उच्चारुन। यव घेऊन कार्य करावे संपन्न। (यव - सातु, जव) श्राध्दात श्रेष्ठ विद्वान ब्राह्मणांकडून। मंगलमय सूक्त, स्तोत्रांचे करवावे पठण।।४६।। शूद्र सुध्दा करुन शकतो हे वृध्दिश्राध्द। त्याने सदा नमस्कार मंत्राने करावे संपन्न। अथवा देऊन शिधा योग्य ब्राह्मणांस। करावे त्याने हे वृध्दिश्राध्द संपन्न।।४७।। शूद्राने दानशील होऊन करावे दान। दानानेच होती सर्व मनोरथ पूर्ण। सांगितले आहे हे भगवंताने प्रत्यक्ष। म्हणूनी करावे याचे तंतोतंत पालन।।४८।। आता सांगतो 'एकोद्दिष्ट' श्राध्द। भगवान विष्णूने केले याचे वर्णन। मृत्युनंतर असे अशौच विधान। विप्रांस दहादिवस, बारा क्षत्रियांस।।४९।। वैश्यास पंधरा, एक महिना शूद्रास। असे हे अशौच फक्त सगोत्रीयांस। मुंडन न झालेल्यास एक रात्र। मोठयास तीनरात्र असे अशौच।।५०।। करावे प्रेतात्म्यासाठी बारा दिवस। प्रेतात्म्यास करावे पिंडदान दररोज। असे

हेच पाथेय प्रेतात्म्यास। बारा दिवसपर्यंत न जाई तो यमपुरीस।।५१।। बारा दिवस पहात राही कुटुंबीयांस। त्याच्या सर्व दाह शांती, थकावट घालविण्यास। दहा रात्री बांधुन ठेवावा जल घट। बांधावा हा घट पिंपळवृक्षास।।५२।। अकराव्या दिवशी ब्राह्मण भोजन। बाकी वर्णांनी अशौच निवृत्तीनंतर। द्यावे त्यांनीही ब्राह्मणास भोजन। करावे बाराव्या दिवशी एकोद्दिष्ट श्राध्द।।५३।। एकोद्दिष्ट श्राध्दात आवाहन, पिंडदान। विश्वेदेवांचे पूजन असे निषिध्द। या श्राध्दात एकच पवित्रक व अर्घ्य। तसेच एकाच पिंडाचे असे विधान।।५४।। 'उपतिष्ठताम्' म्हणून द्यावे तिळासह जल। नंतर 'स्वदितम्' म्हणून भूवर पसरावे अन्न। विसर्जनाच्या वेळी 'अभिरम्यताम् मंत्र'। म्हणून करावे हे श्राध्द पूर्ण।।५५।। अशा रीतीने वेदज्ञ पुत्राने करावे श्राध्द। मृत्युतिथीस प्रतिमास करावे हे श्राध्द। करावे सूतक समाप्ती नंतर सुवर्णपुरुष दान। तसेच करावे फल, वस्त्रयुक्त शय्यादान।।५६।। अशाप्रकारे प्रतिमासी करुन श्राध्द। वर्षानंतर करावे सपिण्डीकरण श्राध्द। सपिण्डीकरण श्राध्दाच्या नंतरच। होई प्रेतात्मा पार्वण श्राध्दास भागी।।५७।। सपिण्डीकराण श्राध्दात विश्वेदेव करावे नियुक्त। त्यानंतरच द्यावे पितरांसी स्थान। यापेक्षा वेगळे असावे प्रेताचे स्थान। अर्ध्यासाठी करावे चार पात्र तयार।।५८।। असावी ती चंदन, जल, तीळाने युक्त। प्रेतपात्रातील जल तीन भाग करुन टाकावे पितृपात्रात। नंतर असेच करावे चार पिंड तयार। ठेवावे त्यांना पितर आणि प्रेत स्थानांवर।।५९।। त्यानंतर 'ये समान ०' (वाज स १९-४५-४६) दोन मंत्रांनी। प्रेत पिंडाचे दर्भाने करावे तीन भाग। मिळवावे त्या भागांस पितरांच्या पिंडात। राहात नाही चौथा पिंड शिल्लक।।६०।। सपिण्डीकरणाने प्रेतात्मा होई संतुष्ट। होई नंतर तो पितृरुपात परिवर्तित।

आणि ‘अग्निष्वात्त’ देवपितरांमध्ये। मिळे उत्तम अविनाशी पद तयास।।६१।। अशाप्रकारे प्रेतासाठी एक वर्ष पर्यंत। जो करी अन्न इत्यादि पदार्थांचे दान। होई प्राप्त त्याला अश्वमेध यज्ञाचे फळ। म्हणून एक वर्षपर्यंत करावे श्राध्द।।६२।। सपिण्डीकराण श्राध्दात वडील, त्यांचे वडील। आजोबा, पणजोबांशी प्राप्त करी संबंध। त्यावेळी तो होई बंधनातून मुक्त। होई तो लेपभागी मुक्त होऊन।।६३।। अशारीतीने चौथे, पाचवे व सहावे पितर। असती लेपभागी व पितादि तीन पिंडभागी। यामध्ये पिंड देणारा असे सातवा वंशज। म्हणून सातपिढ्यांपर्यंत सपिंडता मानती।।६४।। म्हणाले नंतर मत्स्यभगवान। करवावे श्राध्दात ब्राह्मण भोजन। होती त्यामुळे पितर संतुष्ट व प्रसन्न। लाभे आपणास त्यांचे आशीर्वचन।।६५।। यानंतर मार्कण्डेय सांगती पितृगीत। या गीताचा सांगतो सारांश। सर्वांनी तो लक्षात घेऊन। करावे त्याप्रमाणे जेव्हढे शक्य होईल।।६६।। मार्कण्डेय म्हणती इच्छिती पितर। व्हावा आमुच्या कुळात पुत्र धन्यतर। जो सोडूनी कंजुषी देऊन पिंड। करील भक्तिने आम्हास प्रसन्न।।६७।। असेल जो नर धनधान्य संपन्न। करील तो रत्नदान, वस्त्रदान, महादान। जल, फुल, फळादिकाने तर्पण। आम्हासाठी भक्तिभावाने तो करील।।६८।। नसेल जर विशेष वैभव संपन्न। यथाशक्ति देईल तो विप्रभोजन। जर नसेल सामर्थ्य करण्या अन्नदान। यथाशक्ति वन्यशाक (वन्यशाक - वनात उगवणाऱ्या भाज्या)दान देईल।।६९।। असे नसेल तर प्रार्थुन देईल द्विजांस। यथाशक्ति जो दक्षिणादान। नसता तेही सामर्थ्य जयास। तो प्रणाम करुन तीळदान देईल द्विजांस।।७०।। किंवा हाती घेऊन सात - आठ तीळ। होऊन भक्तिभावाने विनम्र। जो देईल तीलांजली आम्हा पितरांस। तेवढ्यानेही होऊ आम्ही संतुष्ट।।७१।। नाही तर

जाऊन गाईंच्या समीप। द्यावा चारापाणी अनेक गाईंस। त्याप्रमाणे पितृप्रेमाने होऊन भक्तियुक्त। करावे प्रसन्न आपुल्या पितरांस।।७२।। जर यापैकी काहीही नसेल शक्य। असेल त्याच्याकडे साऱ्याचाच अभाव। तरी त्याने जावे दूर वनांतरात। उचलून हात करावे काखप्रदर्शन।।७३।। करुन काख प्रदर्शन उच्चारावे उच्चरवात। सूर्य इत्यादि लोकपालांना उद्देशून। 'नसे वित्त, धन, अन्य श्राध्द योग्य साहित्य। त्यामुळे नसे शक्य मज श्राध्द विधान।।७४।। तरी भक्तिभावाने होऊन अति विनम्र। करीतो प्रार्थना मी पितरांस। या काख प्रदर्शनाने व वायुने मार्गस्थ। होऊन तृप्त पितरांनी द्यावे वरदान'।।७५।। अशा प्रकारे हे गाईले गीत। स्वतः पितरांनी भावाभावास्तव। लाभले संपूर्ण श्राध्दविधान फळ। जे शक्य ते भक्तिभावे करणाऱ्या द्विजास।।७६।। असे हे मार्कण्डेयोक्त वचन। असे समाविष्ट ते वराहपुराणात। असे त्या पुराणात श्राध्दकल्पनाम। तेराव्या अध्यायात केले कथन।।७७।। श्राध्दप्रसंगी करावे पितृसूक्त पठण। असे ते ऋग्वेदाच्या दशम मण्डलात। दहाव्या मंडलातील पंधरावे सूक्त। एक ते पंधरा ऋचा पितृसूक्त नाम।।७८।। विविध स्थानांत निवसति पितर। सूक्तातील पहिल्या आठ ऋचांत। श्राध्द हविर्भाग स्वीकार करण्यास्तव। केले असे आमंत्रित पितरांस।।७९।। सूक्ताच्या अंतिम सहा ऋचांत। केले आहे आवाहन अग्नीस। कृपया यावे अग्निने सर्व पितरांसह। करावे अग्नीने हविर्भाग ग्रहण।।८०।। या सूक्ताचे ऋषी शंख यामायान। सूक्ताचे देवता असती पितर। त्रिष्टुप आणि जगती असे छंद। आता घेऊ या जाणून त्याचा भावार्थ।।८१।। वर, खाली, आणि मध्यस्थान स्थित। सोमपानास योग्य जे पितर। यज्ञज्ञाते, सौम्य स्वभावाचे पितर। येऊन करावे त्यांनी आमचे रक्षण।।८२।। नूतन, पुरातन आणि अन्यत्र

स्थित। यमलोक, मर्त्यलोक, विष्णुलोक स्थित। या सर्वच पितरांसी करतो वंदन। करावा त्यांनी आमच्या वंदनाचा स्वीकार।।८३।। ज्ञानी, पितर आणि विष्णु विक्रमण। कुशासनाधिकारी असती पितर। यावे त्यांनी प्रसन्न होऊन। यावे आणि करावे हवि, सोमरस, ग्रहण।।८४।। कृपया यावे पितरांनी आम्हा समीप। अर्पित केलेला हविर्भाग करावा ग्रहण। यावे पितरांनी सुखप्रसाद युक्त। क्लेशमुक्त सुख द्यावे आम्हांस।।८५।। पितरांस प्रिय सोमादि स्थापन। दर्भासनावर केले पितरांस आवाहन। पितरांनी आमुचे करुनी रक्षण। करावी आमची स्तुती देवांसमोर।।८६।। वेदीच्या दक्षिणेस बसून करावी यज्ञप्रसंशा। आमच्या चुकांसाठी करावी क्षमा। देऊ नये आम्हा त्याची शिक्षा। असे विनवणी पडतो तुमच्या पाया।।८७।। अरुण वर्णाच्या उषादेवीच्या मांडीवर। विराजित असलेले आमुचे पितर। मर्त्यलोकनिवासी (मला) ह्या श्राध्दकर्त्यास। करावे त्यांनी विपुल धन प्रदान।।८८।। सोमरसभागी वसिष्ठ कुळातील पितर। झाले आहेत येथे उपस्थित। करुनी त्यांनी आम्हास उपकृत। समर्पित हविचे करावे ग्रहण।।८९।। हविर्द्रव्यांच्या ज्ञानी अर्कापासून। स्तोमाच्या सहाय्याने केले निर्मित। विश्वसनीय धर्म नावाच्या हवि समीप बसणारे। कव्य नाम पितर जे आहेत तृष्णेने व्याकुळ।।९०।। कधी विलग न होणारे, वस्तुरुप हवि भक्षिणारे। द्रवरुप हविचे पान करणारे। उत्तम ज्ञानाने युक्त असे आमुचे पितर। या पितरांसह अग्निदेवा यावे आपण।।९१।। इंद्रादि देवांसह रथातून गमन करणारे। धर्म नाम हविजवळ बसणारे पितर आमुचे। अग्निपावन व पथदर्शक पावन पितर। हे अग्निदेवा, त्यांच्यासह इथे यावे आपण।।९२।। आसनाधिष्ठित पितरांनी करावे भक्षण। हविर्द्रव्याचे जे केले अर्पण दर्भासनावर। करुन स्वीकार पितरांनी

व्हावे प्रसन्न।। संततीयुक्त, धनयुक्त करावे आम्हास।।९३।। यानंतर केले अग्निदेवास प्रार्थन । ज्ञानी अग्निदेवा, समर्पित हवि करुन मधूर। अर्पून पितरांस केले आम्हा उपकृत। आता आपणही करावे हवि भक्षण।।९४।। आमचे पितर जे आहेत उपस्थित। आणि जे येथे आलेले नाहीत। आम्ही ज्यांना जाणतो किंवा नाही जाणत। परंतु त्यांना तुम्ही जाणता निश्चित।।९५।। त्या सर्वांसाठी त्यांच्या इच्छेप्रमाणे। तयार केलेले हे सारे हविर्द्रव्य। आमच्या पितरांसाठी आपण करावे। प्रसन्नता पूर्वक या द्रव्याचे ग्रहण।।९६।। आता आणखी एक नम्र निवेदन। ज्या पितरांना केले अग्निने पावन। किंवा असे न होता अग्नीत भस्मसात। झाले स्वतःच जे पितृभूत पितर।।९७।। स्वर्गाच्या मध्यात करती निवास। ज्यांच्या अनुमोदनाने नूतन मृतजीवांस। प्राण धारण करण्यायोग्य त्यांच्या शरीरास। त्यांच्या इच्छेप्रमाणे बनवून द्यावे त्यांस।।९८।। हे अग्निदेवा, तुजसी विनम्र वंदन। असशी पावक, वाहक तू परम पावन। देऊनी हविर्भाग करावे पितरांस प्रसन्न। असती जे देवलोकात सदा वंद्य।।९९।। पितरांचे महत्त्व पितरांचे जीवन। केले असे या अध्यायात वर्णन। हे कार्य करविणारे स्वामी तुम्हीच। चरणी तुमच्या माझे लक्ष प्रणाम।।१००।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।। अध्याय तिसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

देवी सरस्वतीस वंदन। मागतो तिजकडून मी वरदान। वाग्‌देवतेने होऊनी प्रसन्न। द्यावे मजसी अखण्ड वरदान।।१।। दक्षकन्या देवी सती आणि शिव। होते करीत क्रीडा लीलापूर्वक। त्यासमयी हिमनग पत्नी मेना नाम। होती करीत त्यांच्यावर प्रेमवर्षाव।।२।। यज्ञप्रसंगी पित्याकडून अपमानित। सतीने केला तेंव्हा स्वदेहत्याग। त्यावेळी सतीने मनी केला निश्चय। मेना हिमालयपुत्री मी होईन।।३।। देहत्यागानंतर योग्य समयास। सतीने हिमनगमेना पुत्री रुपात। प्रसन्नतापूर्वक घेतला जन्म। करुन तपस्या केले शिवास प्रसन्न।।४।। सांगतो आता मेनाचे संक्षिप्त चरीत्र। झाला कसा विवाह हिमालयासह। हिमालय नगश्रेष्ठ सौदर्यं संपन्न। हिमभंडारयुक्त तो पशुसमृध्द नग।।५।। धर्माची अभिवृध्दी होण्यास्तव। केला त्याने विवाह करण्याचा निश्चय। तेंव्हाच आपले कल्याण व्हावे म्हणून। देवतागण गेले पितरांच्या समीप।।६।। म्हणाले तेंव्हा ते सर्व पितरांस। देवतांच्या कार्यासाठी ऐकावे वचन। ज्येष्ठ तुमची पुत्री मेनाचा विवाह। करावा तुम्ही हिमालयासह।।७।। तेंव्हा आपल्या पुत्रींना असे श्याप। ऐसा विचार करुनी मनात। केला मेनाचा विवाह हिमालयासह। आले पर्वतराज मेनेसह घरास।।८।। ब्रह्माचा पुत्र प्रजापति दक्षराज। होत्या दक्षास कन्या साठ। होती त्यात स्वधा नाम पुत्री एक।

दिले त्यांनी तिज पितरांस।।९।। ह्या स्वधापासून तेंव्हा पितरांस। झाल्या धर्ममूर्ति कन्या तीन। ह्या तीनही कन्या होत्या अयोनिज। पितरांच्या मनापासून झाल्या उत्पन्न।।१०।। होत्या पितरांस मानसकन्या तीन। मेना, धन्या आणि कलावतीनाम। गेल्या होत्या त्या विष्णुदर्शनास। सनकादि सिध्दगण आले तेथ।।११।। देवतांनी दिले तयांस उत्थापन। या कन्या होत्या शिवमाया मोहीत। नाही दिले त्यांनी सनकादीस उत्थापन। झाले सनकादि अतिशय क्रोधीत।।१२।। दिला त्यांनी शापा पितर कन्यांस। झाल्यात तुम्ही नरभाव मोहीत। जा तुम्ही दूर स्वर्गलोक सोडून। व्हाल तुम्ही तिघी मनुष्यस्त्रिया।।१३।। ऐकून मुनींचे ऐसे शापवचन। झाल्या पितृकन्या अतिशय लज्जित। केले मन:पूर्वक त्यांनी क्षमायाचन। सांगितला तेंव्हा शापमोचन उपाय।।।१४।। म्हणाले सनत्कुमार तेंव्हा तयांस। ऐकावे प्रसन्नचित्ते माझे वचन। ज्येष्ठ कन्या मेना वरील हिमालयास। असे तो विष्णूचेच अंशरुप।।१५।। दुसरी धन्या जनकपती होईल। तिची कन्या होईल महालक्ष्मी सीतारुपात। तिसरी कलावती वरील वैश्य वृषभानास। तिचीच पुत्री असेल राधानाम।।१६।। अशाप्रकारे पितरांच्या कन्या तीन। होऊन पापरहीत कल्याणकारक। विष्णुरुपाशीच जाहल्या एकरुप। गेल्या परत त्या स्वधमास।।१७।। विचारले भीष्माने पुलस्त्य ऋषींस। जाणू इच्छितो मी पितरांचा वंश। रवि, श्राध्ददेव आणि सोम वंश। कृपया सांगावा करुन वर्णन।।१८।। म्हणाले पुलस्त्य महर्षि भीष्मास। सांगेन तुज मी पितरांचा वंश। स्वर्गस्थ पितृगण असती सात। त्यात चार मूर्त तीन अमूर्त।।१९।। वैराज प्रजापति पुत्रांचे पितर अमूर्त। त्यांची पूजा करती वैराज देवगण। योगभ्रष्ट होऊन आले सनातन लोकात। सांगतो कशी मुक्ती मिळाली त्यांस।।२०।। होता ब्रह्माचा

दिवस समाप्त। झाली त्यांना योग आणि सांख्यविषयक। सर्वोत्तम स्मृती झाली त्यांना प्राप्त। मिळाली पुनर्जन्म रहीत मुक्ती त्यांस।।२१।। पितरांची मानस कन्या मेना नाम। झाला तिचा हिमालयासह विवाह। हिमालयाचा पुत्र होता मैनाक। मैनाकचा पुत्र क्रौञ्च पर्वत।।२२।। त्यामुळेच झाला क्रौञ्च द्वीप निर्माण। योगज्ञा मेनाच्या कन्या तीन। उमा, एकपर्णा तिसरी अपर्णा नाम। तिन्ही कन्या करीत होत्या व्रत।।२३।। हिमालयाने दिली उमा रुद्रास। भृगुऋषींसह झाला एकपर्णाचा विवाह। तिसरीचा विवाह जैगीषव्य ऋषीसह। करीत होत्या तिघी तपस्या कठोर।।२४।। सांगतो पितरांच्या विषयीचे ज्ञान। राहती जेथे मारीच नंदन पितृगण। त्या लोकास म्हणती। सोमपथ लोक। ज्यांच्या द्वारे पितृकरती देवताध्यान।।२५।। जेथ राहती अग्निष्वाता नाम। यज्ञ संपन्न करणारे हे पितृगण। झाली त्यांना कन्या अच्छोदा नाम। केले पितरांनी अच्छोद सरोवर।।२६।। तेथे देवांचे एकहजार वर्षे पर्यंत। केले अच्छोदाने तप प्रखर। तिला वर देण्या आले पितृगण। दिव्यमाला गळयात होते दिव्यरुप।।२७।। होते सर्व पितर सामर्थ्य संपन्न। होते ते सुंदर कामदेवा समान। होता त्यांच्यात अमावसुनाम पितर। झाली अच्छोदा कामार्त पाहुन त्यास।।२८।। अच्छोदाने मागितले तेंव्हा अमावसुस। चालताना करीत नव्हती ती भूस्पर्श। तरीही अमावसुने दिला तिज नकार। धैर्यामुळे झाली अमावस्यानामे प्रसिध्द।।२९।। वस्तु इत्यादि जे दिले जाते पितरांस दान। ते सर्व अच्छोदा करीत होती अक्षय। झाली त्यामुळे ती पितरांस प्रिय। झाला होता तिच्या तपस्येचा क्षय।।३०।। लज्जित अच्छोदाने केली पितरांस विनंती। अच्छोदाकडून होणाऱ्या देव कार्यासाठी। प्रसन्न होऊन पितर म्हणाले तिजसी। सांगतो फलप्राप्ती विषयी तुजसी।।३१।। स्वर्गलोकी

दिव्य शरीराद्वारे केलेले कर्म। त्याचे फळ मिळते त्याच शरीरात। मृत्युपश्चात देवत्व होता प्राप्त। त्याचे फळ मिळे त्याच शरीरात।।३२।। म्हणून पुण्यकरुन त्याचे फळ तुज। लाभेल मत्स्ययोनी अठरावे द्वापारात। पितरांची अमर्यादा केल्याचे फळ। वसुराजाची तू कन्या होशील।।३३।। होईल परी तुज देवतालोक प्राप्त। महर्षि पराशरांपासून होईल पुत्र। असेल तुझा पुत्र विष्णुचा अवतार। करील तो वेदांचे चार विभाग।।३४।। राजा शंतनुपासून होतील दोन पुत्र। विचित्रवीर्य आणि चित्रांगद ऐसी नाम। ऐसिया परी देऊन दोन पुत्रांस जन्म। जाशील नंतर तू पितृलोकात।।३५।। पितृलोकी होशील अष्टका नामे प्रसिध्द। ह्या लोकी असेल तुझे सत्यवती नाम। करशील आयुरारोग्य कामना पूर्ण। सांगितले असे पितरांनी तिज।।३६।। असे स्वर्गलोकी विभ्राजनाम लोक। राहती तेथे बर्हिषद नाम पितृगण। येथे अभ्युदय प्रशालेत करता श्राध्द। लाभे तयांस अतिशय आनंदानुभव।।३७।। असती येथे दानव, असुर, गन्धर्वांचे गण। तसेच असती यक्ष आणि राक्षसगण। करती तेही देवतांचे पूजन तसेच। तपस्या योगामुळे माझे शेकडो पुत्र।।३८।। देती ते सारे भक्तांस अभयदान। यांची मानसकन्या पिपरीनाम। असे योगिनी केले तिने तप कठोर। ब्रह्माजींनी प्रसन्न होऊन दिले वरदान।।३९।। म्हणाली ती तेंव्हा ब्रह्मदेवांस। लाभो मज पती योगी, सुंदर जितेंद्रिय। ब्रह्मा म्हणाले तिज व्यासपुत्र शुकदेव। असती ते परमश्रेष्ठ योगाचार्य।।४०।। असती ज्ञानी ते आपल्या पित्यासम। वैराग्य, भक्तीची ते मूर्ति असतील। तुजसी हा श्रेष्ठ पती लाभेल। तू त्यांची सुव्रता पत्नी होशील।।४१।। असेल तुमची कन्या कृतीनाम। तीही असेल योगिनी ब्रह्मनिष्ठ। करावा तिचा विवाह पाञ्चाल राजासह। तिचा पुत्र ब्रह्मदत्त असेल योगश्रेष्ठ।।४२।।

कृष्ण,गौर आणि शंभुनाम। असतील तुम्हास तीन महान पुत्र। असतील तिघेही शुध्दाचरण संपन्न। योगी,ब्रह्मनिष्ठ आणि आचरणशील।।४३।। पितरांची मानसकन्या 'गौ'नाम। असेल सुकन्या सदाचार संपन्न। आपले पती साध्य गणांस असेल प्रिय। होईल ती त्यांची कीर्ति वर्धक।।४४।। मार्तण्डमंडल नाम मरीचि गर्भ पितृलोकात। राहती अंगिरापुत्र हविष्मान पितृगण। हे राजे लोकांचे पितर देती भोग,मोक्ष। ह्या लोकी जाती तीर्थश्राध्द कर्ते क्षत्रिय।।४५।। ह्या पितरांची कन्या यशोदा नाम। अंशुमान पत्नी पंचजनाची सून। ती दीलीपची माता होईल। भगिरथाची ती पितामही असेल।।४६।। कामधुक् पितृलोकी राहती 'स्वधा'(नाम) पितर। आहेत ते कर्दम प्रजापति पुत्र। यांची मानसी कन्या विरजा नाम। झाली ती अष्टका नंतर ब्रह्मलोकात।।४७।। असतील ते आज्यप नामे प्रसिध्द। पुलहच्या वडिल बंधु पासुन उत्पन्न वैश्यगण। तसेच यज्ञ आणि श्राध्दकर्ते वैश्य। जाती ते नेहमी या लोकात।।४८।। एकाच वेळी ते करती बांधव दर्शन। असती त्यात त्यांचे माता, बंधु, पिता, मित्र। त्यांना आपल्या दहाहजार जन्मांपर्यंत। राही तो अनुभव करती ते दर्शन।।४९।। त्यांची मानस कन्या नर्मदा नाम। सदाप्रवाही नदी असे तिचे रुप। करीतसे पवित्र ती जीवलोकास। होते विलीन ती पश्चिम सागरात।।५०।। ब्रह्मलोकाच्याही वर असे सुमनस लोक। निवास करती तेथे सोमप नाम पितर। धर्ममय तनु असणारे हे ब्रह्मापेक्षा श्रेष्ठ। प्रलयसमयी लाभले ब्रह्मत्व तयांस।।५१।। सोमप पितरांपासून झाली सृष्टी उत्पन्न। असे मानून लोक करती श्राध्द। पितरांपासूनच झाला योगाचा विस्तार। त्यामुळे आदिसर्गात श्राध्द झाले निर्माण।।५२।। पितरांना उद्देशून करावा 'स्वधा' उच्चार। पुरोहीतांस दान देऊन करावे तृप्त। अग्निहोत्र करुन करावे पितरांस

प्रसन्न। अग्नि नसता द्यावे ब्राह्मण करावर जल।।५३।। पितरांसाठी दक्षिणदिशा मानती श्रेष्ठ। अपसव्य होऊन करावे तीळ तर्पण। भक्तिपूर्वक जो करी पितरांस प्रसन्न। सामर्थ्य, आरोग्य, संतती फल लाभे त्यास।।५४।। पितृकार्य असे देवकार्याहून श्रेष्ठ। क्रोधरहीत पवित्र पितर होती शीघ्र प्रसन्न। भक्ति प्रिय सुखद पितर पर्वांची देवता। हविष्मान पितरांचे अधिपती सूर्य।।५५।। नंतर पुलस्त्य महर्षि म्हणाले भीष्मास। अन्न तसेच जलाने करावे नित्य श्राध्द। असती श्राध्दाचे प्रमुख तीन प्रकार। नित्य, नैमित्तिक आणि काम्यश्राध्द।।५६।। ब्राह्मणभक्त, सूर्यभक्त, वैष्णव। ब्रह्मवेत्ता, जितेंद्रिय, सुशील ब्राह्मण। करावे तयांसीच श्राध्दास्तव आमंत्रित। द्यावे आमंत्रण एक दिवस आधीच।।५७।। निमंत्रित ब्राह्मणांचे शरीरात। वायु बनुन येऊन राहती पितर। करावे विनम्र होऊन त्यांस निवेदन। श्राध्दात आपण असावे सुस्नात, क्रोधरहीत।।५८।। अग्निहोत्री तर्पणनाम पितृकार्य पश्चात। करावे आहार्यक पिण्ड निर्माण। अमावस्येच्या दिनी करावे श्राध्द। गोशाळा अथवा जलाशया समीप।।५९।। श्राध्दात प्रथम अर्घ्य द्यावे देवब्राह्मणास। नंतर अपसव्याने द्यावे पितृ ब्राह्मणास। नंतर ब्राह्मणांचे घेऊन अनुमोदन। करावे अग्निमध्ये होमादि कार्य।।६०।। गुह्यसूत्रामध्ये वर्णित विधी समयानुसार। अग्नि आणि सोमास करावी आहुती प्रदान। हे कार्य करावे दक्षिणाग्नी मध्येच। हा अग्नीच असे श्रेष्ठ ब्राह्मण।।६१।। त्यानंतर पितरांसाठी पर्युक्षण कार्य। करावे पितृकार्य अपसव्य होऊन। हवनशेष अन्नातून करावे पिण्ड निर्माण। उजव्या हाताने करावे पिडांचे दान।।६२।। ठेवावे दर्भ दक्षिणाभिमुख होऊन। पितरांचे नाम, गोत्र, उच्चारण। ठेवावे एकेक पिण्ड दर्भावर। करुन त्या पिंडांना हस्तस्पर्श।।६३।। म्हणावे ‘ लेपभागभुजाः पितरः तुष्यन्तु। अर्थ लेपभागी

पितर व्हावे तृप्त’। करावे त्यांचे पूजन धूप, दीप देऊन। अशाप्रकारे करावे पितरांस आवाहन।।६४।। हवनाग्निच्या प्रातिनिधिक स्वरुपी। द्यावे पळी पळी जल ब्राह्मण हस्ती। नंतर पिंडातून थोडा थोडा भाग काढुनी। द्यावा ब्राह्मणांस खाण्यासाठी।।६५।। त्यानंतर ब्राह्मणांस द्यावे भोजन। भगवान श्रीहरीचे करावे स्मरण। ब्राह्मण जेवून झाल्यावर तृप्त। नंतरच करावे सार्ववर्णिक विकिर कर्म।।६६।। ब्राह्मणांनी आचमन घेतल्यानंतर। पिंडांवर जल, फुल, अक्षता घालावीत। पिंडांवरच करावे स्वधावाचक कर्म। नाहीतर श्राध्दाचे मिळत नाही फळ।।६७।। नंतर ब्राह्मणांचे विसर्जन करुन। करावी प्रदक्षिणा भक्तिभावे करुन। त्यानंतर दक्षिणाभिमुख होऊन। करावी पितरांस मनःपूर्वक प्रार्थना।।६८।। म्हणती या श्राध्दास अग्निहोत्री ब्राह्मणांचे। अन्वाहर्य पार्वण श्राध्दनाम। केले जाते अमावस्येस हे श्राध्द। द्यावे पिंड ते गाय, बकरी वा अग्निस।।६९।। द्यावे मधले पिंड पत्नीस खाण्यास। करावी प्रार्थना आपल्या पितृगणांस। व्हावा पत्नीला सन्तानवर्धक पुत्र। पितृकर्म पूर्ण झाल्यावर बलि वैश्वेदेव।।७०।। श्राध्दकर्त्याने न करावे पुन्हा भोजन। न करावा त्याने वाहनातून प्रवास। व्यायाम, मैथुनादिंचा करावा त्याग। करु नये कलह, वेदांचे अध्ययन।।७१।। असे सूर्य जेंव्हा कन्या, कुंभ, वृषभेत। करावे कृष्णपक्षात प्रतिदिन श्राध्द। अग्निहोत्रीने श्राध्दायोग्य स्थानात। करावे सर्वत्र सपिण्डिकरण विधी।।७२।। भीष्मजींनी विचारले पुलस्त्य महर्षिस। मत्युलोकी जे देती ब्राह्मण वा अग्नीस। कसे प्राप्त होई ते शुभाशुभ योनिस। प्राप्त झालेल्याचा प्रेत कसा घेती भोग।।७३।। पुलस्त्य म्हणाले असे पिता वसु रुप। पितामह रुद्ररुप, प्रपितामह आदित्यरुप। त्यांचे नाम गोत्र उच्चारण। देती त्यांना दिलेले हव्य, कव्य, त्यांस।।७४।।

जन्म घेता पितर असे त्यांचे नाम, गोत्र। नामादि द्वारेच श्राध्दभाग होई त्या प्राप्त। कर्मानुसार झाली दिव्य योनी प्राप्त। तर प्रदत्त अन्न प्राप्त होई अमृत रुपात।।७५।। दैत्य योनीत असता भोगरुपात प्राप्त। पशुयोनित तृणरुपात, प्रेतांस सर्पयोनीस वायुरुपात। यक्ष योनीत पेय रुपात राक्षसांस मांसरुपात। दानवांस पेयरुपात प्रेतांस रुधिररुपात।।७६।। पितरांना जर असेल मनुष्यरुप प्राप्त। तर लाभे ते अन्न,पेय किंवा भोगरुपात। स्त्री योनीत असता रतिशक्ती लाभे पतीस। इतर जीवांस लाभे भोजनशक्ती रुपात।७७।। होई प्राप्त दातृत्व, वैभव आरोग्यादि रुपात। श्राध्दास म्हणती पुष्प ब्रह्मप्राप्तीच फलरुप। प्रसन्न पितृगण देती श्रध्द कर्त्यास। आयु, पुत्र, धन,विद्या स्वर्ग आणि मोक्ष।।७८।। भीष्म पूसती कौशिक पुत्रांस मोक्ष। पांच जन्मसंबंधाने लाभले परमपद। पुलस्त्य वदती तेंव्हा भीष्मजींस। सांगतो त्याविषयी माहिती तुज।।७९।। कुरुक्षेत्रात होते धर्मात्माऋषि कौशिक नाम। त्यांचे सारे पुत्र होते गर्गऋषींचे शिष्य। पित्याच्या मृत्युनंतर पडले भयंकर दुर्भिक्ष। झाली तेंव्हा अनावृष्टी भयंकर।।८०।। करीत होते गुरु आज्ञेने ते गाईची राखण। झाले होते सारे क्षुधेने पीडीत। केला विचार करु या गाईचे भक्षण। छोटा म्हणे करावा उपयोग श्राध्दरुपात।।८१।। त्यामुळे होईल गोहत्या पापनाश। त्याप्रमाणे ज्येष्ठाने केले पितृश्राध्द। विश्वेदेव केले दोन आणि तीन भावांस। एकास अतिथि करुन झाला श्राध्दकर्ता।।८२।। अशाप्रकारे भक्तीने केले त्यांनी श्राध्द। गाईस वाघाने मारले असे सांगून। दिला बछडा त्यांनी गर्गऋषींस। असे दिले त्यांनी क्रूर कर्मास वैदिक बल।।८३।। मरणानंतर ते झाले दशपुरमध्ये व्याध। पितृपरायणत्वाने राहीले जातीचे स्मरण। स्वीकारले त्या सर्वांनी पूर्ण वैराग्य। अनशन तीर्थात केला धर्मयुक्त प्राण त्याग।।८४।। त्यानंतर

झाले कालंजपर्वतावर मृग। ज्ञानी असल्यामुळे केला शरीरत्याग। मानस तीर्थात झाले चक्रवाक सात। कर्माप्रमाणे झाली नामे प्राप्त।।८५।। सुमना,कुसुमोवसु,चित्तदर्शी, सुदर्शी। ज्ञाता तसेच ज्ञान पारंगत त्यांची नामे। होते श्रेष्ठ योगी मोठया भावाच्या आज्ञेत। त्याप्रमाणे ते सर्व होते वर्तत।।८६।। त्यातील तिघांचे होते चित्त चंचल। पाहीले त्यांनी महाबलवान अणुहराजास। होता राजा स्त्रियांसह क्रीडा करीत। पाहुन तिघेही झाले योगभ्रष्ट ।।८७।। झाला होता अणुहाचा जन्म। बलशाली पाञ्चाल राजाच्या वंशात। होती त्याच्याकडे सेना पुष्कळ। होता तो राजा वाहनासहीत।।८८।। पाहुन पितृवर्ती जो पितृभक्ती परायण। राजा होण्याची इच्छा मनात। अणुहाची अमीत सेना वाहन पाहून। मंत्री होण्याची इच्छा झाली दोघांस।।८९।। पितृवर्ती झाला विभ्राजपुत्र बह्मदत्त। झाला काम्पिल्य नगराचा राजा ब्रह्मदत्त। दोन भाऊ झाले पुण्डरीक अन् सुबालक। झाले मंत्री ते ब्रह्मदत्ताच्या राज्यात।।९०।। सुदेवाची पुत्री झाली ब्रह्मदत्त कांता। होती ती नियुक्त पितरांच्या कार्यात। त्यामुळे होती ती ब्रह्मवादिनी श्रेष्ठ। सन्नती असे होते तिचे नाम।।९१।। ब्रह्मदत्त करीत होता तिच्यासह राज्य। निघाला एकदा तो महालातून बाहेर। गेला होता पत्नीसह तो उद्यानात। होता तेथे फेरफटका मारीत।।९२।। ऐकले राजाने चिंटा - चिंटीचे संभाषण। पत्नी सन्नतीला वाटले आश्चर्य। म्हणाली ‘तुम्ही हसलात मला पाहून’। करीन प्राणत्याग झाला मम अपमान।।९३।। झाला राजा निरुत्तर तिचे बोल ऐकून। केले त्याने सात रात्री नियम पालन। ब्रह्माकडून मिळाले राजास वरदान। झाले राजाच्या राणीचे समाधान।।९४।। आपली पत्नी अन् मंत्र्यांसह निघाला बाहेर। पाहीले त्याने वेदपाठ कर्त्या ब्राह्मणास। कथिला बाह्मणाने पूर्वजन्म इतिहास राजास।

ऐकून भूवर पडला राजा व्याकुळ होऊन।।९५।। राजाचे मंत्री, राजा करु लागले विलाप।‘ काम दोषामुळे झालो योगभ्रष्ट। राजाने ब्राह्मणा दिले धन व ग्रामदान। त्यानंतर केला पुत्रास राज्याभिषेक।।९६।। नंतर ते तिघे गेले मानस सरोवरास। जलात स्नान करुन झाले मत्सर रहीत। त्यानंतर वनवासी योग केला धारण। तपस्येच्या बळावर मिळविले परमपद ।।९७।। अशाप्रकारे प्रसन्न होता पितृगण। करती आयु,धन, स्वर्ग,मोक्ष प्रदान। हे ब्रह्मदत्ताचे पितृमाहात्म्य। ब्राह्मणाकडून ऐकता होई ब्रह्मलोकी सन्मान।।९८।। आपले जीवन सुखी करती पितर। करावे नित्य स्मरण मनापासून। तीर्थक्षेत्री जाऊन करावे श्राध्द। मन:पूर्वक आचरिता होती पितर प्रसन्न।।९९।। पितृतीर्थ आणि त्यांचे माहात्म्य। स्वामी कृपेने सांगेन वर्णन करुन। पितृचरणी मनोभावे वंदन करुन। स्वामीकृपे गणेश होईल कृतार्थ।।१००।।

श्री पितृचरणार्पणमस्तु। श्रीस्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय चवथा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीगजानना, विद्यादाता, श्री गजवदना। चरणी तुझ्या मी ठेवितो माथा। कृपावंता, दयासागरा, विघ्नहर्ता। द्यावे मजसी तू वरदान आता।।१।। श्री पितृनवशती लिहिण्यासी। देई बाबा मती तू मजसी। पितृमाहात्म्य वर्णन करण्यासाठी। लाभावे सामर्थ्य तवकृपे मजसी।।२।। भीष्मजी पूसती पुलस्त्य महर्षिंस। दिवसाचा कोणता प्रहर श्राध्दास योग्य। कोणकोणत्या तीर्थी करावे श्राध्द। ज्यामुळे अधिक फलप्रद श्राध्द होईल।।३।। म्हणाले पुलस्त्य महर्षि भीष्मासी। पुष्कर नावाचे तीर्थ श्रेष्ठ तीर्थांमाजी। असे पुष्करतीर्थ सकल फलदायक। असे अतिशय पवित्र, मंगलकारक।।४।। येथे केलेले होम,दान, जप, श्राध्द। निःसंशयपणे असे अनन्त फलदायक। ऋषी आणि पितरांसी असे प्रिय। म्हणूनी करावे पुष्कर तीर्थामध्ये श्राध्द।।५।। नन्दा, ललिता तसेच मायापुरी (हरिद्वार)स्थान। असती ही तीर्थे पुष्करासम महान। यांच्या पेक्षा महान मित्रपद हे तीर्थ। त्याच्यापेक्षा ही श्रेष्ठ असे केदारतीर्थ।।६।। गंगासागर असे सर्व तीर्थमय क्षेत्र। त्याच प्रमाणे असे ब्रह्मसरोवरतीर्थ। त्याच्या समानच असे शतद्रु नदीजल। असे हेही अतिशय पवित्र मंगलमय।।७।। नैमिष तीर्थ असे अतिशय श्रेष्ठ। सर्वच तीर्थांचे फलदेणारे असे हे तीर्थ। नैमिष तीर्थाचे असे विशेष महत्त्व। झाला येथेच गंगेचा सनातन प्रवाह उत्पन्न।।८।।

विराजती येथे भगवान यज्ञवराह। तसेच राहती येथे शूलपाणि भगवान। असे येथे शंकरमूर्ति अष्टदशभुज। दिले जाते या क्षेत्री सुवर्णाचे दान।।९।। असे नैमिषारण्य खूप महान। धर्मचक्राचे चाक झाले येथेच जीर्ण। झाली धर्मचक्राची चौकट दुर्बल। झाला धर्म चौकटीपासून मुक्त।।१०।। सर्वही तीर्थक्षेत्रांकडून उपासित। असे महत्त्वपूर्ण हे नैमिषतीर्थ क्षेत्र। येथे होई ज्यास वराहदेवाचे दर्शन। पवित्र होऊन मिळे नारायण लोक त्यास ।।११।। कोकामुख नावाचे तीर्थ असे श्रेष्ठ। होते येथे सर्वांस इंद्रमार्गाचे दर्शन। असे येथे पुरातन कालापासून। अव्यक्तजन ब्रह्मदेवाचे पितृतीर्थ।।१२।। असे या तीर्थाचे आणखी एक विशेष। जाहले जर येथे विद्यमानस्वरुपात। प्रत्यक्ष ब्रह्मदेवाचे दर्शन होई ज्यास। होईल त्याला ते दर्शन मोक्षप्रदायक।।१३।। कृत या नावाचे असे एक तीर्थ। असे हे पवित्र तीर्थ सकल पापनाशक। असती येथे स्वत: भगवान जनार्दन। आद्य नृसिंह रुपातच विराजमान।।१४।। इक्षुमती नाम तीर्थ पितृकल्याणकारक। असे येथे गंगा आणि यमुनेचा संगम। प्रयत्न पूर्वक येथे जाऊन करावे श्राध्द। राहती तयांचे पितर सदैव तृप्त।।१५।। कुरुक्षेत्र तीर्थ असे अतिशय पुण्यप्रद। आजसुध्दा असे या तीर्थाचे वैशिष्टय। सर्व इच्छापूर्ती करणाऱ्या अतिशय पवित्र। पितृतीर्थाच्या मार्गाचे दर्शनही पवित्र।।१६।। असे नीलकण्ठ नाम पितृतीर्थ विख्यात। असे तसेच भद्रसर आणि मानससरोवर मन्दाकिनी, अच्छोदा-विपाशा तीर्थ। तैसेची पवित्र सरस्वती आणि सर्व मित्रपद।।१७।। त्याप्रमाणेच असे श्रेष्ठ वैद्यनाथ तीर्थ। असती ही सारी तीर्थे महाफलदायक। या प्रमाणेच क्षिप्रा नदीही असे पवित्र। तैसेची कालंजगिरितीर्थ पुण्यदायक।।१८।। तीर्थोद्भेद, हरोद्भेद,गर्भोद्भेद महालय। भद्रेश्वर, विष्णुपद, नर्मदाद्वार(अमरकंटक)

त्याचप्रमाणे गयाक्षेत्र असती ही महान। या तीर्थांत पिण्डदान असे समान पुण्यकारक।।१९।। या साऱ्या पितृतीर्थांचे करता स्मरण। तेव्हढ्यानेही होती सर्व पापे नष्ट। करती जे या तीर्थांमध्ये पिण्डदान। त्यांच्या पुण्याविषयी बोलणेच अशक्य।।२०।। ओंकारतीर्थ, कावेरीनदी, कपिलाचे जल। ज्यांचा चण्डवेगा नदीमध्ये संगम। त्या संगमस्थानाचे जल, अमरकण्टक। असती ही तीर्थे महाफलदायक।।२१।। करता अमरकण्टक येथे स्नानादि कार्य। लाभे कुरुक्षेत्रापेक्षा दशपट फल। असे अमरकण्टक नर्मदानदीचे द्वार। असे नर्मदा मानसकन्या पितृगणांची ।।२२।। असे अतिशय प्रसिध्द शुक्लतीर्थ। तैसेची असे प्रसिध्द सोमेश्वर तीर्थ। करता ह्या पवित्र तीर्थांत स्नान। सर्व व्याधींचा त्यामुळे होई विनाश।।२३।। येथे करावे श्राध्द, दान आणि होम। करावा स्वाध्याय तैसेची निवास। मिळे त्यामुळे तीर्थांपेक्षा इतर। करोडोपटीने अधिक त्याचे फळ।।२४।। असे कायावर नाम महान तीर्थ। होता तेथे एक तेजस्वी ब्राह्मण। मानती की त्या ब्राह्मणाच्या घरात। झाला होता भगवान शिवाचा अवतार।।२५।। चर्मण्वती, शूलतापी, पयोष्ठी तैसेच। पयोष्ठी संगम महोषधी चारणा क्षेत्र। नागतीर्थ प्रवर्तिनी, महावेणा नदी पवित्र। महाशाला, वरुणा, हुताशनपुर, भैरवतीर्थ।।२६।। महान भृगुतीर्थ असे श्रेष्ठ गौरीतीर्थ। वैनायक नाम तीर्थ, श्रेष्ठ वस्त्रेवरतीर्थ। वेत्रवती नामक नदी अतिपवित्र। महारुद्रतीर्थ, महालिंगा, दशार्णानदी तीर्थ।।२७।। महानदी, शतरुद्रानदी, नदी शताह्व। तैसेच महान फलदायी पितृपदपुर। अंगारवाहिका, कालिका, पितरा पवित्र। असती तैसेची घर्घर नद।।२८।। असती ही सारी, ही सारी तीर्थ। असती अनन्त पुण्यदायक पितृतीर्थ। स्नान आणि दान इत्यादी कार्यास। मानली जाती ही तीर्थे श्रेष्ठ।।२९।। करावे या तीर्थांमध्ये पितृश्राध्द।

लाभते अनन्त फल श्राध्दकर्त्यास। म्हणूनीच सांगतो जाऊनी प्रयत्नपूर्वक। या क्षेत्री करावे श्रध्देने पितृश्राध्द।।३०।। शतावटानदी, ज्वाला, शरद्वनदी। श्रीकृष्णतीर्थ, द्वारका, उदक्सरस्वती। मालवतीनदी, गिरिकर्णिकानदी। धूपतापतीर्थ तैसीची अनेक तीर्थे।।३१।। असती क्षेत्रे दक्षिण समुद्रतटावर। गोकर्णतीर्थ, गजकर्णतीर्थ चक्रानदी आणिक। श्रीशैल, शाकतीर्थ, तैसेच नारसिंह तीर्थ। महेन्द्रतीर्थ, महापुण्यानदी, महानदी तीर्थ।।३२।। असती ही तीर्थे अनन्त फलदायक। असती श्राध्द करण्यास्तव ही सर्व श्रेष्ठ। करावे श्राध्द ऐशा पवित्र स्थानात। होई ते श्राध्द अनन्त फलदायक।।३३।। या तीर्थांचे भक्तिभावे करता स्मरण। होई अनन्तजन्म पापांचा नाश। करीता स्नान दानादि पवित्र कार्य। होईल ते सर्वांसी अतिमंगलकारक।।३४।। पवित्र तुंगभद्रानदी, चक्ररथीनदी। भीमेश्वरतीर्थ, कृष्णवेणानदी। कावेरीनदी, पवित्र गोदावरीनदी। उत्तम त्रिसंध्यातीर्थ, अंजनानदी।।३५।। या सर्वांनी वंदित त्र्यंबक तीर्थ। असती ही तीर्थे अतिशय पुण्यदायक। त्र्यंबकतीर्थ असे अति पवित्र। 'भीम' नामे भगवान शंकर विराजित।।३६।। त्र्यंबक येथे असती शंकर विराजित। त्यामुळे असे हे तीर्थ अनन्त फलदायक। या क्षेत्री केलेले श्राध्द आणि दान। करोडो पटीने देई ते कर्त्यास फळ।।३७।। सर्वोत्तम असलेले व्यासतीर्थ। श्रीपर्णानदी, राकानदी, शिवनदी पवित्र। शिवधारा आणि विख्यात भवतीर्थ। पुण्यकारक रामेश्वरतीर्थ, सनातन पुण्यतीर्थ।।३८।। वेणापुरम्, अलंपुरम्, प्रसिध्द अंगारकतीर्थ। आत्मदर्शनतीर्थ, वत्सव्रातेश्वरतीर्थ। अलंवुषतीर्थ, गोकामुख तीर्थ। हरिश्चंद्रपुर आणि गोवर्ध्दनतीर्थ।।३९।। चंद्रपुर आणि पृथूदकतीर्थ। सहस्राक्षतीर्थ आणि हिरण्याक्षतीर्थ। कदलीनदी, त्याचप्रमाणे नामधेय तीर्थ। सौमित्रि, संगमतीर्थ, इंद्रनीलतीर्थ।।४०।। महानाडतीर्थ

आणि प्रियमेलकतीर्थ। असे तीर्थस्थानी देवतांचा निवास। त्यामुळे श्राध्द करण्यासाठी ही तीर्थे। असती प्रशस्त आणि बहुपुण्यप्रद।।४१।। या तीर्थक्षेत्रांमध्ये केलेले दान। असे शंभरकोटी पटांपेक्षा अधिक पुण्यपर। म्हणुनीच मानली गेली अतिशय पवित्र। येथ श्राध्द करता होती प्रसन्न पितर।।४२।। पवित्र बहुदानदी, सिध्दवट नाम तीर्थ। पर्यटिकानदी आणि पाशुपततीर्थ। या सर्व स्थानी केले गेलेले श्राध्द। असे दोनशे कोटीपटीने अधिक पुण्यप्रद।।४३।। पंचतीर्थ जेथे होई गोदावरी नदी। दक्षिणावर्ती होतसे ती प्रवाहीत। असे हजार लिंगानी युक्त ही नदी। असे परशुरामास सर्वोत्तम आनंदप्रद।।४४।। म्हणती सारे सनातन योगीजन। प्रतिकची भीती गोदावरीच्या मनात। त्यामुळे असे येथे ती सदाप्रवाहीत। असे हे तीर्थ कोटीपटीने फलदायक।।४५।। अनेक अप्सरांच्या समुहानी युक्त। असे ते हव्यकव्य तीर्थ पवित्र। अशा पावन तीर्थात केलेले श्राध्द। होई कर्त्यास ते अनन्त फलदायक।।४६।। येथे केलेले श्राध्द तसेच हवन कार्य। शेकडो कोटीपटींनी असे फलप्रद। असे पितरांसी बहु आनंददायक। होती श्राध्दकर्त्याचे पितर प्रसन्न।।४७।। सहस्रलिंग तीर्थ,उत्तम राघेश्वरतीर्थ। इंद्रकला नदी जिथे पुरातन समयास। इंद्राने आपला मित्र नमुचिस मारुन। मिळविले त्याने स्वर्गाचे राज्य।।४८।। त्यास्थळी मनुष्यांनी जर केले श्राध्द। लाभे तयास श्राध्दाचे अनन्त फळ। करावे तेथे श्राध्दकर्म व दान। होई तयास ते बहु पुण्यफलप्रद।।४९।। पुष्करतीर्थ, शालग्रामतीर्थ। शोणापत (सोनपत) तीर्थ असे वैश्ववानराशयतीर्थ। सारस्वततीर्थ आणि स्वामीतीर्थ। मलंदरा, कौशिकी, चन्द्रिकानदी पवित्र।।५०।। विदर्भा, वेगा, पयोष्णीनदी पवित्र। प्राङ्मुखा, कावेरी, उत्तरांगा पवित्र। तैसेच जालंधर पर्वत, ही श्राध्दतीर्थ। लाभे येथील श्राध्दाचे अनन्तफळ।।५१।।

लोहदण्डतीर्थ आणि चित्रकूटतीर्थ। गंगेचा अतिशय मंगलमय घाट। कुब्जाभ्रक तीर्थ, उर्वशी पुलीनतीर्थ। संसारमोचन तीर्थ, ऋणमोचन तीर्थ।।५२।। असती ही सर्व पितृकार्यास श्रेष्ठ। येथील श्राध्दांचे फळ अनंत पट। अट्टाहासतीर्थ, गौतमेश्वर, वसिष्ठतीर्थ। भारततीर्थ, ब्रह्मावर्ततीर्थ कुशावर्ततीर्थ।।५३।। हंसतीर्थ सुप्रसिध्द पिण्डारकतीर्थ। शंखोध्दारकतीर्थ, भाण्डेश्वरतीर्थ। बिल्वकतीर्थ, नीलगिरीतीर्थ। सर्व तीर्थांचा स्वामी बदरिकाश्रमतीर्थ।।५४।। वसुंधरा नावाचे तीर्थ, रामतीर्थ। जयन्तीतीर्थ विजयतीर्थ, शुक्लतीर्थ। ह्या तीर्थांमध्ये केलेले श्राध्द व दान। होई प्राप्त श्राध्दकर्त्यास मोक्ष।।५५।। मातृगृहतीर्थ, करवीरपूरतीर्थ। तीर्थांचा स्वामी सप्तगोदावरीतीर्थ। ह्या ठिकाणी श्राध्दकर्त्याने करता श्राध्द। होई तयास ते उत्तम अनन्त फलप्रद।।५६।। कीटक प्रदेशात असे गयातीर्थ पवित्र। तसेच असे राजगृह नाम वन पवित्र। त्या वनातील च्यवनाश्रम असे पवित्र। तेथील पुनःपुना (पुन पुन) नदी पवित्र।।५७।। विषयाराधन तीर्थात नदी पुनपुन नाम। ब्रह्मदेवांनी गाईलेली गाथा पवित्र। करीत असे विचरण पुनपुन नदी क्षेत्रात। म्हणून असती सर्व मंगलमय पुनित।।५८।। हवे असतील एष्टव्या इत्यादि गृहस्थास। अनेक पुत्रांची कामना जर असेल। तर त्यांनी श्राध्द करण्यास जावे गयेस। किंवा करावा त्याने अश्वमेध यज्ञ।।५९।। एकदा मनुष्य असे गात आले गयेस।'' होईल का कुणी पुत्र आपल्या कुळात। जाईल तो पुत्र पवित्र गयेस। करील तो पूर्वीच्या सात पिढ्यांस तृप्त।।६०।। तसेच पुढे होणाऱ्या सात पिढ्यांस। करील तो तृप्त जाऊन गया तीर्थास। होईल का कुणी असा आमुच्या कुळात। करील जो गयेस आमुचे अस्थि विसर्जन।।६१।। देईल का जलांजली तील मिश्रित आम्हास। करील का पिण्डदान तो

तीन अरण्यात'' । पुष्कर, नैमिषारण्य आणि धर्मारण्य। असती अशी ही तीन पवित्र अरण्य।।६२।। गयाक्षेत्राचे धर्मपुष्ठ असे पवित्र। ब्रह्मसरोवरही असे पितृश्राध्दास श्रेष्ठ। असे तैसेची गयाशीर्ष वटतीर्थ। येथे केलेले दान होई अक्षय।।६३।। मानती की वंशातील कुणीतरी। घरी श्राध्द करुन निघे गयेस जाण्यास। असा निघाला कुणी वंशज जाण्या गयेस। तेणेच त्याच्या पितरांना स्वर्ग होई प्राप्त।।६४।। नाही राहात त्याच्या वंशात कुणी प्रेत। प्रेत असलेले होती पिण्डदानाने मुक्त। होते राहात एक श्रेष्ठमुनी गयेत। होते फार श्रध्दाळु आणि भाविक।।६५।। नित्यदिनी हातात दर्भ घेऊन। आंब्याच्या वृक्षमूळाशी करीत होते तर्पण। त्यामुळे आम्रवृक्षास लाभत असे जल। पितृतर्पणाने होत होते पितर तृप्त।।६६।। गयेत जाऊन पिण्डदान करणे श्रेष्ठ। त्याच्या पेक्षा मोठे नसे अन्य कोणते दान। गयेत केले जरी एक पिंडदान। त्यामुळे होती त्याचे पितृगण मुक्त।।६७।। काही महर्षि मानती अन्नदान श्रेष्ठ। काही देती धनदानास अधिक महत्त्व। परंतु सर्व महर्षी हे नक्की मानतात। गयेतील पिण्डदानच अधिक श्रेष्ठ।।६८।। तसेच महत्त्वाचे सांगतो आणखी एक। प्रेमाने मानससरोवर दक्षिण वा उत्तर तटावर। जाऊन करती महाचल महासरोवर दर्शन। करती तेथे प्रणाम श्रेष्ठ ब्राह्मणांस।।६९।। होई त्यांना संपूर्ण जन्माचे फल प्राप्त। होती त्यांची इच्छिते कामना पूर्ण। होई त्याचे संपूर्ण जीवन कृतार्थ। लाभे तयास अतिशय आनंद सुख।।७०।। असे केले येथे तीर्थवर्णन संक्षिप्त। विस्तारपूर्वक करणे बृहस्पतीसही अशक्य। तिथे मनुष्यमात्रांना काय लागेल पाड। असे हे तीर्थमाहात्म्य वर्णनातीत।।७१।। आता जे सांगतो ते करावे श्रवण। असे आणखीही काही महत्त्वाचे अधिक। सत्यतीर्थ आणि असे दयातीर्थ। इंद्रियनिग्रह तीर्थही असे श्रेष्ठ।।७२।। घरी राहुनच

शम दम पालन श्रेष्ठ। आपल्या वर्णाश्रमधर्माचे अनुष्ठानतीर्थ। ह्या तीर्थांचे करावे नियमित पालन। सदाचार,धर्माचरण हे सर्वाहून श्रेष्ठ।।७३।। सांगितली मी अनेक तीर्थ तुज। असे त्या तीर्थांचे फल अधिकाधिक। पण सर्वांपेक्षा सर्वाधिक असे सर्वश्रेष्ठ। गयातीर्थी केलेल्या श्राध्दाचे फळ।।७४।। सांगतो आत श्राध्दास योग्य समय। सकाळचे तीन मुहुर्त असे प्रातःकाल। तीनच मुहूर्तांचा असे संगव(ज्ञान)। त्यानंतर तीन मुहुर्त असे माध्याह्न काळ।।७५।। त्यानंतरचे तीन मुहुर्त अपराह्न । त्यानंतर तीन मुहूर्त असे सायंकाल। सायंकालची वेळा राक्षस समय। म्हणून करु नये कधीही यावेळी श्राध्द।।७६।। दिवसाचे एकूण असती पंधरामुहूर्त। दुपारनंतरचा असे आठवा मुहूर्त। या मुहुर्ताचे नाव असे कुतप। कारण यानंतर सूर्य होत जाई मंद।।७७।। ही वेळ असे श्राध्दास योग्य। करावा या वेळेत श्राध्दास प्रारंभ। या वेळी सुरु केले गेलेले श्राध्द। देई अनंत फल श्राध्द कर्त्यास।।७८।। खड्गपात्र, कुतप, नेपाळीकांबळ। सोने, दर्भ, तीळ, गाय दौहित्र (मुलीचा मुलगा)। यांच्यामुळे पाप होत असे दु:खित। यामुळे या आठही गोष्टी असती कुतप।।७९।। कुतप मुहूर्त आणि त्यानंतरचे चार। असती श्राध्द करण्यास योग्य हे पाच मुहूर्त। स्वधावाचक श्राध्द करावे या मुहूर्तांवर। होते हे श्राध्द अनंत फलदायक।।८०।। श्राध्दकर्मात महत्त्व असे दर्भास। तैसेची असे महत्त्व काळ्यातीळांस। भगवान विष्णुंच्या शरीरापासून। असती हे दोन्ही झाले उत्पन्न।।८१।। तीर्थस्थानी निवास करणाऱ्यांनी। जलांतर्गत जाऊन द्यावी तिलांजली। घरी श्राध्द करताना घ्यावे दर्भ हातात। दर्भ घेऊनच करावे पितृतर्पण।।८२।। असे हे विवेचन श्राध्दविषयक। ब्रह्मदेवांनी केले असे वर्णन। असे हे वर्णन पवित्र, पुण्यप्रद। असे हे वर्णन आयुवर्धक

पापनाशक।।८३।। करील जो कोणी ह्याचे भक्तिभावे पठन। अथवा करील जो याचे भक्तीने श्रवण। होईल तो सर्व ऐश्वर्यांनी संपन्न। कारण असे हे अतिशय पुण्यफलदायक।।८४।। श्राध्दाच्या वेळी तीर्थक्षेत्री निवास। आणि करावे ह्या अध्यायाचे पठन। होईल त्याच्या सर्व पापांचा नाश। होईल त्याच्या अलक्ष्मीचाही नाश।।८५।। जाणते पुरुष मानती हे अतिशय पवित्र। होईल यामुळे महापाप विनाश। होईल याचे श्रवण किंवा पठन। धनधान्य कीर्ति समृध्दि प्रदायक।।८६।। सांगतो तुम्हास मी विशेष करुन। असे हे माहात्म्य देवता सन्मानित। ब्रह्म, रुद्र, तसेच सूर्यदेवता। देती या माहात्म्यास विशेष सन्मान।।८७।। श्री पद्मपुराणाच्या प्रथम सृष्टिखण्डात। श्राध्द प्रकरण नामे अकरावा अध्याय। केले असे श्राध्दविषयक समस्त वर्णन। त्याचाच सारांश असे या अध्यायात।।८८।। आजही असती पितृतीर्थे प्रसिध्द। तेथे जाऊन केले असता श्राध्द। होती तयाचे सर्व पितर मुक्त। लाभे सुखशांती श्राध्द कर्त्यास।।८९।। सर्वप्रथम सांगतो त्र्यंबकेश्वर तीर्थ। असे तेथे प्रत्यक्ष शिव, विष्णु निवास। करती येथे विशेषतेने त्रिपींडी श्राध्द। होती मुक्त वंशातील अतृप्त पितर।।९०।। गोदावरी तीरी पवित्र नाशिक क्षेत्र। असे गोदावरी येथे सदाप्रवाहीत। रामकुंडात येथे करती अस्थि विसर्जन। लाभे त्यामुळे मुक्ती प्रेतात्म्यास।।९१।। मृतात्म्याच्या दशक्रिया विधी येथ। करीता लाभे मुक्ती सर्व पितरांस। येथील वर्षश्राध्दाचे असे विशेष फळ। सपिंडीकरण करता होती मुक्त पितर।।९२।। काशी, गया, प्रयाग ही तीनही क्षेत्र। असती पापनाशक ही पितृतीर्थ। या तीनही स्थानात करीता तीर्थश्राध्द। होती तयाचे सर्व पितर प्रसन्न।।९३।। प्रयागक्षेत्री असे त्रिवेणी संगम। गंगा, यमुना, सरस्वती नदीचे मिलन। संगमात स्नान करुन करावे तीर्थश्राध्द। त्यामुळे

सातपिढ्या होती मुक्त।।९४।। काशीक्षेत्री गंगानदीचा घाट। तेथे जाऊन करावे पितरांचे श्राध्द। पितरांना लाभते मुक्ती येथ। होई त्यामुळे काशीयात्रा सफल।।९५।। गया क्षेत्र झाले असे प्रसिध्द। प्रत्यक्ष गयानेच केली येथे मुक्ती प्रदान। येथे सर्वही पिढ्यांस पिंडसंतर्पण। केले जाते मंत्र उच्चारे करुन।।९६।। असती येथे प्रकटले विष्णुभगवान। असती येथे उमटले विष्णूचे पाद। पिंडदान करुनी करती श्राध्दसंपन्न। विष्णु पादावर पिंड वाहून करती संतर्पण।।९७।। गुजराथ प्रांती असे मातृगया स्थान। असे उत्तर गुजराथेत सिध्दपुर त्याचे नाम। करीता येथे मातेचे श्राध्द संतर्पण। होती पाच पिढ्या त्याच्या मुक्त।।९८।। दक्षिणेस तैसेची रामेश्वर तीर्थ। येथे श्राध्दकर्त्यास लाभे अनन्त फल। होती तयाचे सर्व पितर प्रसन्न। होई तयास आयुरारोग्य सुख शांती लाभ।।९९।। स्वामींच्या कृपेने केले असे वर्णन। करावे सर्वांनी नित्य नेमे तीर्थश्राध्द। पितर जयांचे असती संतृप्त। नांदे त्यांच्या जीवनी ऐश्वर्य समाधान।।१००।।

।। श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थचरणार्पणमस्तु।।

## ||अध्याय पाचवा||

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।

श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

अनन्यभावे आलो गणेशा चरणासी। मजवरी तवकृपा सदैव असावी। द्यावी स्फुर्ती तू या गणेशासी। पितृ नवशतीच्या लेखनासाठी।।१।। लाभावे मज यथायोग्य ज्ञान। पितृमाहात्म्याचे करण्यावर्णन। तयांच्या कृपे व्हावे मम जीवन। कृतार्थ अन् लाभावे आशीर्वचन।।२।। दाखविली श्रीहरीने लीला एक। होती घडली ती सत्ययुगात। दाविले त्याने गौरमुखास अद्‌भूत कर्म। पाहून गौरमुखास झाला अत्यानन्द।।३।। आनंदे केला त्याने निश्चय मनात। आराधीन मी श्रीहरि जगदीश्वरास। म्हणून गौरमुख गेला नैमिषारण्यास। असे तेथे एक प्रभासनामतीर्थ।।४।। असे हे तीर्थ पवित्र परम दुर्लभ। असे हे तीर्थ चंद्रासी संबंधित। येथील स्वामी असती श्रीहरि भगवान। दैत्यसूदन नामे असती विराजीत।।५।। केली गौरमुखाने सुरुवात मनःपूर्वक। जगदीश्वर हरीची आराधना कराण्यास। आराधनेमुळे झाल्या चित्तवृत्ती स्थिर। आले तेथे मार्कण्डेय मुनीश्रेष्ठ।।६।। लाभले गौरमुखास ते अतिथिरुपात। झाला परमानंद तयांस पाहून। गौरमुखाने केले स्वागत आदरपूर्वक। भक्तीने दिधले आसन तयांस।।७।। दिले गौरमुखाने त्यांना अर्घ्य, पाद्य। त्याची भक्ती पाहून झाले मार्कण्डेय प्रसन्न। केली गौरमुखाने विनंती सविनय। महाव्रती मुनिश्रेष्ठ असे मागणे एक।।८।। करावा मजसी श्राध्दतत्त्व उपदेश। विनंती ऐकून झाला मुनींस आनंद। अतिशय मधुरस्वरात म्हणाले मुनि त्यास। सांगेन तुजसी मी

सकल ज्ञान।।९।। सर्व देवतांचे गुरु म्हणजे प्रवर्तक। असती स्वतः भगवान नारायण। त्यांच्यापासून झाले ब्रह्मा प्रकट। दिली आज्ञा ब्रह्मास सृष्टी रचना करण्यास।।१०।। सात मुनींची सृष्टी केली प्रथम निर्माण। म्हणाले ब्रह्मा मुनिंची रचना करुन। करावी तुम्ही माझी उपासना नित्य। पण मुनिंनी केले स्वतःचेच पूजन।।११।। पाहून त्यांचे असे विपरीत कर्म। झाले ब्रह्मदेव अतिसंतप्त। दिला ब्रह्मदेवांनी मुनींस शाप। म्हणाले होईल तुमचे सारे ज्ञान नष्ट।।१२।। अशाप्रकारे मुनी झाले शापग्रस्त। केले त्यांनी वंशप्रवर्तक पुत्र उत्पन्न। नंतर निघून गेले ते स्वर्गास। झाले परलोकवासी मुनीजन।।१३।। झाले आपुले पितर असे स्वर्गस्थ। केले त्यांच्या मुलांनी विधिपूर्वक श्राध्द। श्राध्द करुनी केले तयांस तृप्त। या पितरांस सारे म्हणती ‘वैमानिक’।।१४।। झाले प्रकट ते ब्रह्मदेवाच्या मनापासून। मंत्रोच्चारण करुनी करती पिण्डदान। पुत्र करती पिण्डदान हे पाहात। ते मुनी करती स्वर्गलोकी निवास।।१५।। नंतर गौरमुख म्हणाला मार्कण्डेयास। जाणू इच्छितो मी श्राध्दयोग्य समय। तसेच असती पितरांचे किती गण। जाणू इच्छितो आपणाकडून सर्व।।१६।। म्हणाले मार्कण्डेय गौरमुखास। देवतांसाठी करती सोमरस वृध्दि पितर। स्वर्गनिवासी असती जे काही पितर। असती ते मरिची इत्यादि नामे प्रसिध्द।।१७।। असती ते पितर एकूण सात। असती चार मूर्त आणि तीन अमूर्त। सांगतो त्यांचे कोणते लोक। असे कसा त्या पितरांचा स्वभाव।।१८।। राहती काही सनातन नाम लोकात। त्या पितरांस म्हणती ‘भास्वर’पितृगण। असती हे साऱ्या देवतांना उपास्य। ब्रह्मवादी असती हे सारे पितर।।१९।। ब्रह्मलोकापासून होऊन विभक्त। नित्य लोकात ते करती निवास। अशी शंभरयुगे झाल्यानंतर। होई यांचा पुन्हा प्रादुर्भाव।।२०।।

होता त्यांना आपल्या पूर्वस्थितीचे स्मरण। करती ते सर्वोत्तम योगाचे चिंतन। लाभतसे त्यामुळे त्या पितृगणांस। योग-संबंधी अनिवृत्ति-लक्षण मोक्ष।।२१।। ह्या साऱ्या पितृगणांस श्राध्दात। योग्यांच्या योगाद्वारे केल्यावर तृप्त। योगवृध्दि करती ते योग्यांच्या हृदयात। भगवत्भक्तांच्या भक्तीने होती ते संतुष्ट।।२२।। गौरमुख, हे श्रेष्ठ योगी म्हणूनच। जे करती भगवंतास सर्वस्व अर्पण। अश्या योग्यांस श्राध्दात करावे तृप्त। देऊन नाना वस्तूंचे,धनाचे दान।।२३।। सोमरस भोक्त्या पितरांस म्हणती सोमप। असे ह्या पितरांचा प्रधान प्रथम सर्ग। असती हे पितर उत्तम वर्णाचे ब्राह्मण। असे ह्या सर्वांचे एक-एक शरीर।।२४।। राहती हे पितर स्वर्गलोकात। भूलोक निवासी करती यांचे पूजन। कल्पपर्यंत जीवी मरीची आदि पितर। असती हे पितर ब्रह्मदेवाचे पुत्र।।२५।। करती मरुतांची उपासना स्वपरिवारासह। असती मरुद्‌गण ह्या पितरांना उपास्य। सनक्‌ इत्यादि तपस्वी वैराजनाम। हे पितृगण असती मरुद्‌गणांसही पूज्य।।२६।। वैराज नावाचे जे पितृगण। त्यांची एकूण संख्या असे सात। अशा रीतीने असती पितरांचे संतान। सांगितला तुज परिचय संक्षिप्त।।२७।। वेगवेगळया वर्णांचे सर्वच लोक। करु शकती ह्या पितरांचे पूजन। इतकेच नाही तर ब्राह्मण, क्षत्रिय। आणि वैश्य या वर्णांचे घेऊन अनुमोदन।।२८।। तीन वर्णांखेरीज इतर द्विजेतर वर्ग। करु शकती ह्या पितराचे पूजन। परी त्यांचे पितर असती अन्य। असती ते ह्या पितरांहून भिन्न।।२९।। (ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य हया वर्णांना मुंज (उपनयन) अधिकार आहे म्हणून ते द्विज कारण मुंज हा त्यांचा दुसरा जन्म मानला जातो) पितरांमध्ये असती मुक्त व चेतनक। या दोन प्रकारचे दृष्टिस नाही दिसत। त्यासाठी करावे लागे विशिष्ट शास्त्राध्ययन। तैसेची करावे लागे पुराणांचे अवलोकन।।३०।।

ऋषींनी बनवली असती शास्त्र। या शास्त्रांचे करुनी नीट अध्ययन। असा करुनी घ्यावा पितरांचा परिचय। तरच मिळेल पितर परिचय आपणास।।३१।। सृष्टीची रचना करण्याच्या समयास। ब्रह्मदेवांना पुन्हा स्मृती झाली प्राप्त। झाले ब्रह्मदेवांस पूर्व पुत्रांचे स्मरण। तेंव्हा ब्रह्मदेवास आले लक्षात।।३२।। पुत्रांच्या ज्ञानाचा प्रभाव विशेष। त्या प्रभावाने झाले परम पद प्राप्त। ब्रह्मदेवांस तेंव्हा आले दिसून। झाले असती आपले पुत्र स्वर्गस्थ।।३३।। वसु आदिंचे काश्यपादि पितर। ब्राह्मणांदिचे वसु इत्यादि पितर। तैसेची त्यांचे गंधर्व इत्यादि पितर। ही साधारण गोष्ट तू घे समजून।।३४।। हे पितृगणांच्या सृजनाचे वर्णन। प्रसंग कारणाने सांगितले मी तुज। तसे पाहता करोडो वर्षे जरी केले वर्णन। या प्रसंगाचा नाही होणार अंत।।३५।। द्विज श्रेष्ठा सांगतो आता मी तुज। श्राध्दासाठी उचित काळाचे वर्णन। श्राध्दकर्त्यास लाभता श्राध्दयोग्य पदार्थ। आला असता कोणी श्रेष्ठ ब्राह्मण घरास।।३६।। उत्तरायण किंवा दक्षिणायन आरंभ। असेल जेंव्हा व्यतिपात योग। तेंव्हा श्राध्दकर्त्याने विधिविधान पूर्वक। काम्यश्राध्दाचे करावे अनुष्ठान।।३७।। असतो जेंव्हा विषुव योग। म्हणजे जेंव्हा असतो सूर्य विषुववृत्तावर। सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण असेल। तेंव्हा श्राध्दकर्त्याने करावे काम्यश्राध्द।।३८।। होते जेंव्हा सूर्याचे राश्यन्तर। नक्षत्र अथवा ग्रहांनी होता पीडीत। पडले असता एखादे वाईट स्वप्न। घरी येता जेंव्हा नविन धान्य, करावे काम्यश्राध्द।।३९।। असता अमावस्या अनुराधा, विशाखा। किंवा स्वाती नक्षत्राने युक्त। यावेळी जर केले पितृश्राध्दानुष्ठान। त्यामुळे आठवर्षां पर्यंत राहती पितर तृप्त।।४०।। असेल अमावस्या पुनर्वसु पुष्य। अथवा आर्द्रा नक्षत्राने युक्त। यावेळी श्राध्दकर्त्याने करावे श्राध्द। राहती पितृगण बारा वर्षांपर्यंत

तृप्त।।४१।। धनिष्ठा, पूर्वाभाद्रपदा, किंवा शताभिषायुक्त। अशी अमावस्या मिळणे असे दुर्लभ। अशा प्रकारे वरील नऊ नक्षत्रांनी युक्त। अमावस्येस केलेले श्राध्द होईल अक्षयतृप्तिप्रद।।४२।। वैशाखशुक्ल तृतीया, शुक्ल नवमी कार्तिक। कृष्णत्रयोदशी भाद्रपद, अमावस्या माघ। चंद्रसूर्यग्रहण तैसेची अष्टकाचार। उत्तरायण किंवा दक्षिणायनाचा आरंभ।।४३।।(अष्टका प्रत्येक महिन्याची सप्तमी,अष्टमी, नवमी तिथी तसेच पौष, माघ आणि फाल्गुनची कृष्ण अष्टमी या तिथिंना 'अष्टका 'म्हणतात) या मुहूर्तांवर भक्तिभावपूर्वक। श्रध्देने एकाग्र अंत:करणाने करावे श्राध्द। दिले जरी एकाग्रमनाने तीळ मिश्रित जल। असे श्राध्द सहस्रवर्षे श्राध्दासम ।।४४।। असे हे श्राध्दयोग्य समय रहस्य। असे सांगितले पितृगणांनी स्वयम्। करावे या सर्वाचे पठण किंवा श्रवण। करावे याचे आचरण श्रध्दापूर्वक।।४५।। असेल माघ अमावस्या शतभिषा युक्त। असे पितृतृप्तीसाठी हा विशेष काल। असेल जर धनिष्ठा नक्षत्राने युक्त। असे श्राध्दासाठी उत्तम फलदायक।।४६।। या दिवशी श्राध्दकर्त्याने होऊन एकाग्र। द्यावे आपुल्या पितरांस अन्न, जल। त्यामुळे श्राध्दकर्त्यास मिळे उत्तम फळ। होती तृप्त पितर दहाहजार वर्षां पर्यंत।।४७।। श्राध्दासाठी उत्कृष्ट असती हे मुहूर्त। अल्पपुण्यवंतास ते नाही मिळत। हा पितरांस परम तृप्तीदायककाल। मिळतसे केवळ अतिशय पुण्यवंतास।।४८।। उत्तम मुहूर्तांवर अवश्य करावे श्राध्द। तेणेच होई सफल गृहस्थाश्रम। होता पितृगण तृप्त लाभे ऐश्वर्य। उत्तम संतान आणि जीवनी सुख।।४९।। गंगा, शतद्रु, विपाशा, सरस्वती। नैमिषारण्यातील गोमती नदीत करुन स्नान। आदरपूर्वक करता पितरांचे तर्पण। श्राध्दकर्त्याच्या सकल पापांचा होई नाश।।५०।। असता पूर्वाभाद्रपदा माघी अमावस्येस।

यावेळी केलेले श्राध्द असे विशेष। श्राध्दाने या होती पितृगण तृप्त। सुखाने करती शयन पूर्ण युगपर्यंत।।५१।। वैश्वेदेवाने करावे आईच्या वडिलांचे श्राध्द। त्याचप्रमाणे पितृपक्ष आणि मातामहपक्ष। दोन्ही मिळून करावे एक वैश्वेदेवश्राध्द। त्या श्राध्दाने होती आईचे वडिल तृप्त।।५२।। देवतांसाठी निमंत्रित ब्राह्मणास। पूर्वमुख बसवून द्यावे भोजन। पितृपक्ष, मातामहपक्ष नियुक्त ब्राह्मणांस। उत्तरमुख बसवून द्यावे भोजन।।५३।। शहाण्यामाणसाने श्राध्द विधानात। आसनासाठी कुश देऊन नंतर। करावे देवतांचे श्रध्दापूर्वक आवाहन। त्यानंतर अर्घ्यादि देऊन करावे पूजन।।५४।। ब्राह्मणांच्या आज्ञेने देवतांस। द्यावे जल आणि तीळाने अर्घ्य। नंतर श्राध्दकर्त्याने विधिपूर्वक। चंदन, धूप आणि दीप करावे अर्पण।।५५।। असेच उपचार करावे पितरांस उद्देशून। परंतु ते सर्व करावे अपसव्य होऊन।(अपसव्य - जानवे उजव्या खांद्यावर ठेवून) मंत्रोच्चारणाने करावे पितरांस आवाहन। अपसव्याने द्यावे तीळमिश्रित जलअर्घ्य।।५६।। श्राध्दविधी समयी आला अतिथि तेथ। भुकेजलेला यात्रेकरु भोजन करण्यास। ब्राह्मणांकडून घ्यावी परवानगी मागून। करवावे अतिथिस यथेच्छ भोजन।।५७।। असती अज्ञातस्वरुप अनेक योगीजन। मनुष्यांना उपकृत करण्यास्तव। धराधामपर करीत असती विचरण। म्हणून जाणत्यांनी नक्की करावा अतिथि सत्कार।।५८।। अतिथि सत्काराचे असे महत्त्व। अतिथिस सर्वत्र मानती देवस्वरुप। त्यामुळे जर नाही केला अतिथिसत्कार। होई त्यामुळे श्राध्द फळाचा नाश।।५९।। आता श्राध्दा वेळेचे हवन विधि विधान। ब्राह्मणांस भोजन देण्यापूर्वी घ्यावे अनुमोदन। भाजी आणि मीठ रहीत अन्न घेऊन। तीन वेळा करावे त्याचे अग्नित हवन।।६०।। 'अग्नये कव्य वाहनाय स्वाहा'।

या मंत्राने द्यावी पहीली आहुती। ‘सोमाय पितृमते स्वाहा’ म्हणून दुसरी। ‘वैवस्वताय स्वाहा’ मंत्राने तिसरी आहुती।।६१।। असे याप्रमाणे आहुती विधान। हवनानंतर शिल्लक अन्न हाती घेऊन। वाढावे थोडे थोडे ते अन्न। सर्व ब्राह्मणांच्या पानात भक्तिपूर्वक।।६२।। श्राध्दामध्ये तयार केलेले सर्व पदार्थ। असावे मधुर भोजन कर्त्याच्या इच्छेनुसार। सर्व अन्नपदार्थ पात्रांमध्ये ठेवून। बोलावे मधुर वचन ब्राह्मणांस।।६३।। ‘करावे कृपया इच्छेप्रमाणे भोजन। ब्राह्मणांनी सुध्दा होऊन प्रसन्न। मौनाने करावे भोजन सुखपूर्वक। यजमानाने शांत चित्ताने वाढावे भोजन।।६४।। करीत असता ब्राह्मण भोजन। करावा रक्षोघ्न मंत्राचा पाठ। (रक्षोघ्नमंत्र - यज्ञेश्वरो यज्ञसमस्तनेता भोक्ताऽव्ययात्मा हरिरीश्वरोऽत्र। तत्संनिधानादपयान्तु सद्यो रक्षांस्यशेषाण्यसुराश्च सर्वे।।) नंतर भूमीवर पसरवावे तीळ। आपल्या पितृस्वरुपातील ब्राह्मणांचे करावे चिंतन।।६५।। भूमिवर पिंड देताना करावी प्रार्थना। ‘व्हावे माझे पिता, पितामह,प्रपितामह तृप्त’। केलेल्या होमाने होऊन सबल। होऊ देत तृप्त पिता, पितामह, प्रपितामह।।६६।। मातामह, प्रमातामह, वृध्दप्रमातामह। आणि वैश्वेदेव सारे होऊ देत तृप्त। हव्यकव्य भोक्ता यज्ञेश्वर भगवान। त्यामुळे सर्व राक्षस असुरगणांनी जावे येथून।।६७।। निमंत्रित ब्राह्मणांच्या भोजना नंतर। टाकावे थोडेसे अन्न भूमिवर। आचमनासाठी ब्राह्मणांना जल। नंतर त्यांच्या आज्ञेने करावे पिंडदान।।६८।। पितृ तीर्थातूनच द्यावी तीळयुक्त जलांजली। तसेच मातामह इत्यादिंना करावे पिंडदान। पुष्प,धूप, दीपाने पूजित पिण्ड। द्यावा पहिला आपल्या पित्यास उद्देशून।।६९।। नंतर पितामह प्रपितामहांस उद्देशून। एक एक पिंड करावा अर्पण। ‘लेपभागभुजस्तृप्यताम्’ मंत्र उच्चारण। करुन पाडावे अन्न कुशाने

भूवर।।७०।। यानंतर स्वस्तिवाचन कर्त्या ब्राह्मणास। करावी यथाशक्ती दक्षिणा प्रदान। नंतर वैश्वेदेवांसाठी करावा मंत्रपाठ। करावी आशीर्वादासाठी प्रार्थना।।७१।। मग प्रथम करावे पितृब्राह्मणांचे विसर्जन। नंतर करावे देवब्राह्मणांचे विर्सजन। पितृ तसेच मातामह दोन्ही श्राध्दांत। अर्घ्य पाद्यादि द्यावे देवब्राह्मणांस प्रथम।।७२।। मधुर वचनाने अतिशय प्रीतिपूर्वक। द्यावा निरोप सर्व ब्राह्मणांस। ते निघाल्यावर दारापर्यंत जावे मागोमाग। त्यांनी आज्ञा दिल्यावरच यावे परत।।७३।। श्राध्दविधिनंतर करावे वैश्वदेव। अशा रीतीने करुनी सर्वांचा सत्कार। बंधु - बांधवांसह नंतर करावे भोजन। तैसेची सेवकांनाही द्यावे भोजन।।७४।। अशारीतीने करावे पिता, पितामह। मातामह, प्रमातामह श्राध्द। श्राध्द करुन करावे सर्व पितर तृप्त। प्रसन्न पितर करती सर्वमनोरथ तृप्त।।७५।। काळेतीळ, कुतप मुहूर्त, दौहीत्र। श्राध्दात यांना मानती परम पवित्र। तसेच असे श्राध्दात अतिशय श्रेष्ठ। चांदीचे दर्शन आणि चांदीचे दान।।७६।। हे द्विजश्रेष्ठा, चंद्र पितृगणांचा आधार। चंद्राचा मुख्य आधार असे योग। योगिजनांस करावे श्राध्दात नियुक्त। होईल यजमानासह सर्वांचा उध्दार।।७७।। विचारले पृथ्वीने तेंव्हा वराह देवांस। श्राध्दासंबंधी ज्ञान मार्कण्डेयाकडून ऐकून। गौरमुखाने केले कोणते आचरण। तेंव्हा वराहभगवान म्हणाले पृथ्वीस।।७८।। मार्कण्डेयांची बुध्दी होती अपरिमित। त्यांनी गौरमुखास सांगितले पितृकल्प। झाली मुनिवरांची कृपा गौरमुखावर। मागील शंभर जन्म आठवले तयास।।७९।। पूर्वीच्या पहिल्या, दुसऱ्या कल्पात। होता गौरमुख स्वतः भृगुमुनिश्रेष्ठ। ब्रह्मदेवांनी पुत्रांस दिला होता शाप। तुमच्या पुत्रांकडून मिळेल तुम्हा ज्ञान।।८०।। पुत्राकडून मिळवून ज्ञानाचा उपदेश। होईल तुम्हास सद्‌गती प्राप्त।

मार्कण्डेयांचा जन्म झाला होता वंशात। म्हणून त्यांनी केले गौरमुखास ज्ञानदान।।८१।। मार्कण्डेयांकडून ऐकून पितृकल्प विवेचन। गौरमुखाने बारा वर्षे केले पितृश्राध्द। श्रीहरीची उपासना करण्यास्तव। प्रभासतीर्थास जाऊन केले दैत्यदलन स्तवन।।८२।। महातपस्वी सांगती पितृउत्पत्ती प्रसंग। घडला असे हा फार पूर्व समयास। प्रजापती ब्रह्मदेव करण्या प्रजेचे सृजन। होते बसले ते मन एकाग्र करुन।।८३।। त्यावेळी त्यांच्या एकाग्र मनापासून। शब्दस्पर्शादि तन्मात्रा आल्याबाहेर। तेंव्हा ब्रह्मदेवांनी विचारले त्यांस। कोणत्या प्रकारे करावे यांना सुशोभित।।८४।। होत्या त्या तन्मात्रा ब्रह्मदेवाच्या शरीरात। धूम्ररंगाच्या त्या झाल्या प्रकट तेथून। तेंव्हा त्याच म्हणाल्या ब्रह्मदेवांस। पिऊ इच्छितो आम्ही सोमरस।।८५।। तेंव्हा इच्छा झाली त्यांच्या मनात। जाऊ इच्छितो आम्ही मनाच्या वरील लोकास। करु आम्ही तपस्या जाऊन आकाशात। करु लागल्या त्या तिरक्या मार्गाचे अवलंबन।।८६।। तेंव्हा ब्रह्मदेव म्हणाले तयांस। गृहस्थाश्रमींच्या कल्याणस्तव व्हावे तुम्ही पितर। जाऊ इच्छिती जे जे मुख वर करुन। होईल प्राप्त त्यांना नान्दीमुख नाम।।८७।। ब्रह्मदेवांनी केले मार्गाचे निरुपण। पितरांसाठी कथिला सूर्य दक्षिणायन काल। मागितले पितरांनी तेंव्हा ब्रह्मदेवास। द्यावी जिविका ज्यामुळे मिळेल सुख।।८८।। सांगितले ब्रह्मदेवांनी पितरांस। असेल अमावस्येचा दिवस तुमच्यास्तव। या तिथिला मनुष्य करतील तर्पण। त्यामुळे तुम्ही सर्व व्हाल तृप्त।।८९।। अमावस्या तिथीस असे तीळ देण्याचे विधान। पितृश्राध्द ठेवणारा करील तर्पण। श्राध्दकर्त्यावर होऊन अतिशय प्रसन्न। द्यावे यथाशीघ्र त्यास वरदान।।९०।। सांगितले वराहांनी कसे श्राध्द। मग आज्ञेने केले ब्रह्माने सृष्टीसृजन। ब्रह्माने केले बारा आदित्य,

आठ वसु। अकरा रुद्र, दोन अश्विनी कुमार उत्पन्न।।९१।। एकूणपन्नास मरुद्‌गण केले उत्पन्न। त्यांच्या उध्दारासाठी ब्राह्मण व सुरगण। केले त्याने तपोधन ऋषी उत्पन्न। तीव्र तेजामुळे होते ते सूर्यासम प्रकाशमान।।९२।। होते त्यांना सकलशास्त्रांचे ज्ञान। होता त्यात महानऋषि निमी नाम। निमिस होता एक पुत्र आत्रेय नाम। होता सुंदर, संयतचित्त आणि उदार।।९३।। मन एकाग्र करुन करीत होता तप। करीत होता तपस्येच्या नियमाचे पालन। केले तप त्याने दहा हजार वर्षांपर्यंत। परंतु झाला आत्रेयाचा देहान्त।।९४।। झाला निमि पुत्रमृत्युने शोकाकुल। माघ द्वादशीस केले पुत्राचे श्राध्द। ब्राह्मणांना आमंत्रित करून विधिवत। केले भाज्या आणि कंदमुळांचे पिंडदान।।९५।। रात्री पुन्हा झाला शोकाने व्याकुळ। पिंडदान केल्याचा झाला पश्चाताप। जन्म - मृत्यु असे पूर्वकर्म संबंधित। त्यामुळे असे तर्पण करणे असे अपवित्र।।९६।। तेंव्हा नारदमुनी आले आश्रमात। अर्घ्य पाद्य देऊन केले निमिने स्वागत। ग्रहण करुन नारद झाले सुप्रसन्न। म्हणाले ज्ञानी पुरुषांनी करु नये शोक।।९७।। तुझा पुत्र होता एक आत्मा महान। दहाहजार वर्षे केले त्याने तप। झाली आहे त्यास दिव्यगती प्राप्त। त्यामुळे तू असा शोक करणे असे व्यर्थ।।९८।। तू जे केलेस पिंडदान श्राध्द। हे कार्य मोठे म्हणती त्यास पितृयज्ञ। स्वत: ब्रह्माने दिले हे नाम। हा धर्म तेव्हा पासून व्रत म्हणजे क्रतु नामे ख्यात।।९९।। फार पूर्वी स्वयंभू ब्रह्माने स्वयम्। केले होते पितृयज्ञाचे आचरण। उत्तम विधी असे जाणून केला यज्ञ। असे त्यात श्राध्द कर्म व प्रेतकर्म विधान।।१००।।

।। श्री पितृदेवताचरणार्पणमस्त। श्री स्वामी समर्थचरणार्पणमस्तु।।

## ।।अध्याय सहावा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

स्वतः ब्रह्मदेवांनी सांगितला पितृयज्ञ। असे यामध्ये श्राध्दकर्म विधान। तसेच असे वर्णिलेले सविस्तृत। प्रेतकर्माचे संपूर्ण विधान।।१।। वराह भगवान म्हणती संसार नाशवंत। उत्पन्न होणाऱ्याचा मृत्यु निश्चित। नसे येथे कुणीही अविनाशी अमर। जो मरतो त्याचा जन्मही निश्चित।।२।। परंतु ठेवावी लक्षात ही एकमात। करुनी काही विशेष कर्मविधान। तसेच करीता मनःपूर्वक प्रायश्चित। मोक्ष प्राप्त करुन घेणे शक्य।।३।। सत्त्व, रज, तम हे तीनही गुण। स्वाभाविक गुणांनुसार लाभे गती त्यास। तामसी प्रकृतीचे सत्त्च गुणांकडे करती दुर्लक्ष। त्यांना त्यांच्या कर्मामुळे होई नरक प्राप्त।।४।। वेदज्ञ, सात्त्विक, ज्ञानी जे लोक। असे त्यांना धर्म, ज्ञान, वैराग्य ज्ञान। या सर्वांचे करती योग्य आचरण। त्यामुळे होती अग्रेसर मुक्ती मार्गावर।।५।। पराक्रमी, एकवचनी, स्थिरबुध्दी, संयमशील। शूर वीर प्रसिध्द असती ते पुरुष। असती ते पुरुष राजस गुणांनी युक्त। कर्मा नुसार गती होते प्राप्त त्यांस।।६।। असे ब्रह्माने सांगितले निमिस। असे शोक सर्व गोष्टींचा संहारक। आता या सर्व ज्ञानाचा करुनी विचार। निमिराजा, सोडून दे तू शोक।।७।। राजा, जेंव्हा प्राण येती कण्ठस्थानावर। करावे स्नेहपूर्वक सत्शास्त्र पठन। त्याचप्रमाणे दानधर्म करावा समुचित। दानात असे गोदानास महत्त्व विशेष।।८।। करावे

त्यानंतर त्याच्या कानात। श्रुतिकथित दिव्य मंत्रांचे पठण। त्यानंतर करावे मधुपर्क संपन्न। करावे ओंकारस्वरुप देवतांचे प्रार्थन।।९।। मधुपर्कामध्ये घालावा मध मुखात। ह्या विधिनंतर जर आले मरण। त्याला परलोकात लाभे सुख। तैसेच न येई पुनर्जन्म, लाभे मोक्ष।।१०।। मृतजीवास लाभावी सद्‌गति म्हणून। न्यावे वृक्षाखाली मृताच्या शरीरास। सुगंधी जल, तुप लावावे शरीरास। झोपवावे दक्षिणेकडे पाय करुन त्यास।।११।। नंतर गयादि पवित्र तीर्थांचे स्मरण। करुन मृतशरीरास घालावे जलस्नान। नंतर मृतदेहास ठेवावे चितेवर। मंत्रपठनाने करावे शिर्षस्थान प्रज्वलित।।१२।। त्यानंतर घेऊन मृतात्म्याचे नाम। तर्पण करुन भूमीवर करावे पिण्डदान। सगोत्रांसी असे दहादिवस अशौच। त्यानंतर वस्त्र भिजवून करावे स्नान।।१३।। चारही वर्णांसाठी असे हाच संस्कार। सर्व वर्णीयांनी करावे त्याचे पालन। जेंव्हा चालू असते अशौच (सुतक)। करु नये कोणतेही देवकार्य।।१४।। तिसऱ्या दिवशी श्राध्दकर्त्याने करुन स्नान। करावे तीन पिण्ड प्रदान तीन जलांजलि देऊन। चौथे, पाचवे, सहावे, सातवे दिनी। याच प्रकारे करुन एकेक पिंडदान आणि जलदान।।१५।। असावे वेगवेगळे पिंडांचे स्थान। दहा दिवसपर्यंत करावे याचे पालन। दहाव्या दिवशी श्राध्दकर्त्याने करवून क्षौरकर्म। स्नानानंतर करावे पवित्र वस्त्र परिधान।।१६।। अकराव्या दिवशी करावे एकोदिष्ट श्राध्द। स्नान करुन शुध्द झाल्यानंतर। प्रेतास पितरांत संमिलित करण्यास। करावे श्राध्दकर्त्याने पिंडदान।।१७।। तेराव्या दिवशी प्रेतात्म्याचे नाम घेऊन। संकल्प करणे असे आवश्यक। नंतर करवावे ब्राह्मणांस मिष्टान्न भोजन। त्यासाठी द्यावे ब्राह्मणांस नियंत्रण।।१८।। निमंत्रण देताना करावे मंत्राचे पठण। विनम्रतेने विनवावे दिवंगत व्यक्तीस। आता यमराजाच्या

आदेशानुसार। पोचले आहात तुम्ही दिव्य लोकात।।१९।। आता तुम्ही वायुरुप धारण करुन। मानसिक प्रयत्नाने व्हावे ब्राह्मणदेही स्थित। दुसऱ्या दिवशी प्रातःकाली सूर्योदयानंतर। तेल इत्यादि लावून करावे स्नान ।।२०।। भूमी स्वच्छ करुन तेथे वेदी बनवून। करावे पिण्डदान दक्षिण वा पूर्वाभिमुख होऊन। नदीतटावर, वृक्षाखाली किंवा पिंपळ छायेत। असे कार्य करणे असते प्रशस्त।।२१।। श्राध्दासाठी निमंत्रित ब्राह्मणास। द्यावे अर्घ्य, पाद्य, आसन। ब्राह्मण आसनावर होता अधिष्ठित। करावे संकल्पपूर्ण छत्रीचे दान।।२२।। असती आकाशात देवता गंधर्व। यक्ष, राक्षस, सिध्दगण व पितरगण। असती ते सारेच तेजस्वी अत्यन्त। त्यांच्यापासून आणि वर्षादिपासून रक्षणास।।२३।। छत्रीचे दान असे आवश्यक। सर्वप्रथम द्यावा प्रसन्नतेने प्रेतभाग। रहावे प्रेत छत्रछायेत सुरक्षित। त्यासाठी ब्राह्मणास द्यावे छत्रीचे दान।।२४।। देवता - दानव, सिध्द - गंधर्व, राक्षस। आकाशातून टाकती दृष्टी पृथ्वीवर। होई प्रेत त्यामुळे अतिशय लज्जित। पाहून असुर व राक्षस करती उपहास।।२५।। व्हावे प्रेताचे या सर्वांपासून रक्षण। होऊ नये प्रेतास या साऱ्यांचा त्रास। या सर्वांचे करण्यासाठी निवारण। आदित्याने केली छत्रीची व्यवस्था।।२६।। आणखी एक कारण सांगतो तुम्हास। एकदा देवता, ऋषी गेले प्रेतलोकात। पाहीले तेथे अग्नि, पत्थर, तप्तजल। भस्म याचा वर्षाव दिनरात त्यांच्यावर।।२७।। या उपद्रवाला शान्त करण्यास्तव। करावी लागली छत्रीव्यवस्था आदित्यास। म्हणूनच प्रेतकार्य करताना निश्चित। द्यावे छत्रीचे दान ब्राह्मणास।।२८।। यानंतर वहाण ही द्यावी दान ब्राह्मणास। वहाण पायात घातल्याने मिळे आराम। यमराजपुरीला निघालेल्या प्रेतास। वहाण दान केल्यास पाय नाही तापत।।२९।। असे यमपुरीमार्ग

अंध:कारमय कठीण। या मार्गाने एकाट्यानेच जावे लागते प्रेतास। असती यमदूत मागोमाग मार्गावर। नेती ते प्रेतास बळेच यमपुरीस।।३०।। तप्त वाळू असते यमपुरीच्या मार्गावर। काटेही असती यमपुरीच्या मार्गात। वहाण घालून प्रेत करी मार्ग पार। म्हणून वहाण अवश्य द्यावी ब्राह्मणास।।३१।। यानंतर करुन मंत्रांचे उच्चारण। धूप आणि दीप देण्याचे असे विधान। नाम आणि गोत्राच्या उच्चारणा मुळे। होतसे सर्व काही प्रेतास प्राप्त।।३२।। श्राध्दकर्त्याने पसरावे भूवर दर्भ। करावे भक्तिपूर्वक प्रेतास आवाहन। नंतर विनंतीपूर्वक सांगावे विप्रास। पुष्प, धूप, दीपदान केले असे प्रेतार्थ।।३३।। आपण कृपया करुन स्वीकार। कृपा करुन करावा प्रेताचा उध्दार। याप्रमाणेच प्रेतासाठी अन्न, वस्त्र। तैसेची आभूषणांचे करावे दान।।३४।। अशारीतीने उपभोग्य वस्तुसमवेत। करावे प्रभूत दान विप्रास। नंतर तीन वेळा करावे पादप्रक्षालन। चारही वर्णांनी करावे हे विधिपालन ।।३५।। दान घेणाऱ्याने करावे मंत्रोच्चारण। मंत्रोच्चारानेच दातव्य वस्तूंचे करावे ग्रहण। असावे त्या ब्राह्मणाने ज्ञानी, शुध्दस्वरुप। त्यावेळी एक दुसऱ्यास करु नये स्पर्श।।३६।। सर्व वस्तूंचे दान करावे प्रेत प्रीत्यर्थ। सारे दान करावे प्रेम व भक्तिपूर्वक। प्रेताला जेंव्हा केले जाते पिंडदान। ते प्राप्त करण्यास योग्य देवता व ब्राह्मण।।३७।। प्रेतकार्य झाल्यावर धुवावे हातपाय। नंतर विधिप्रमाणे करावे आचमन। घ्यावे हातात भक्षणयोग सिध्दअन्न। भोजनकर्त्याला जे हवे ते द्यावे समुचित।।३८।। ब्राह्मणादींस दान देऊ इच्छितसे इतर। निवारु नये तयास दान देण्यापासून। जर असे कोणी निवारील दुसऱ्यास। मिळेल तया गुरु हत्त्येसम वाईट फळ।।३९।। त्यामुळे पितर होती दु:खित। नाही लाभत प्रसन्नता प्रेतास। त्यामुळे मनुष्याने करावे असे कार्य। ज्यामुळे होणार

नाही दानधर्माचा लोप।।४०।। आपले जातीचे तसेच नातलग। द्यावे त्यानंतर प्रेतभाग भोजनास। अशा रीतीने करुन प्रेतात्म्याचे स्मरण। भोजनादि देता होई प्राणी मुक्त।।४१।। शांती लाभण्यास सांगतो विधान। विधिवत स्नान करुन यावे स्थानास। मंत्रवत धरणीस्तव करुन करावा प्रणाम। यानंतर करावे पिंडदान।।४२।। प्रेताच्या नाम, गोत्राचे करुन उच्चारण। द्यावे श्रेष्ठ ब्राह्मणांस तीलोदक। प्रणाम करुन बसवावे त्यांस शय्येवर। करावे अंजन इत्यादि वस्तूचे अर्पण।।४३।। औदुंबर लाकडाच्या पात्रातच। घेऊन तीळ, जल म्हणावे 'सौरभेय्य:सर्वहिता:'। हया मंत्राने होई जलाचे शुध्दिकरण। त्याचा उपयोग केल्याने होई पाप नष्ट।।४४।। यानंतर विधिवत करुन प्रेताचे विसर्जन। ब्राह्मणास दान देणे असे उचित। शेवटी 'काकबली' द्यावा अपसव्य होऊन। अन्नपदार्थांनी करावे इतर प्राण्यांचे तर्पण।।४५।। नंतर सर्व आप्तेष्टांसह करावे भोजन। त्यानंतर करावे अनाथ आणि गरीबांस संतुष्ट। अनाथांना दिलेले अन्नदान होई अक्षय। यमपुरीस जाऊन सारे करती प्रेतास सहाय्य।।४६।। आत्रेय म्हणाले, पुत्रा केलेस प्रेतकार्य। आता त्याविषयी भयाचा करिशी अनुभव। असे करणे असते सर्वथा अनुचित। करतो तुझ्यासाठी एक यज्ञ प्रतिष्ठित।।४७।। आजपासून या यज्ञास म्हणतील पितृयज्ञ। होईल याच नावाने जगात प्रसिध्द। मिळेल तुज ब्रह्मा, विष्णू, शिवलोकी निवास। यामध्ये यत्किंचितही नसे संशय।।४८।। ह्यामुळेच तिसऱ्या, सातव्या। नवव्या आणि अकराव्या महिन्यांत। सांवत्सारिक कार्याचा असे नियम। प्रेताचे हे कार्य पूर्ण होई एक वर्षात।।४९।। मृतव्यक्तिसाठी केले जाणारे संस्कार। केले जाती सर्व श्रध्देने स्नेहपूर्वक। म्हणूनच या विधिंना म्हणती श्राध्द। संपूर्ण प्रेतसंस्कारानंतर जाई जीव पितृ श्रेणीत।।५०।।

प्रत्येक महिन्याच्या अमावस्यातिथिस। प्रेतात्म्यासाठी करावे श्रध्देने तर्पण। श्रध्देने ब्राह्मणांस करविता भोजन। पितामह,प्रपितामह राहती सदा तृप्त।।५१।। केले आत्रेयांनी श्रीहरीचे ध्यान। नंतर तेथेच ते पावले अंतर्धान। तेंव्हा नारद म्हणाले निमिस। असे हे सर्व कार्य चारही वर्णासंबधित।।५२।। तेंव्हापासूनच ऋषिमुनींकडून। अमावस्येच्या दिनी केला जाई पितृयज्ञ। असे हा यज्ञ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यांस। मंत्रोच्चारणाने करावा त्यांनी संपन्न।।५३।। शुद्र वर्णियांनी करावा मंत्रोच्चारणाशिवाय। तेंव्हा पासून म्हणती यास नेमिश्राध्द। देऊन निमिस पूर्ण आशीर्वचन। गेले निघून नारद अमरावतीस।।५४।। ऐकून धरणीने विचारले वराहास। प्रेतकार्यामध्ये कोणास दान देणे उचित। प्रेतश्राध्द दान घेणे म्हणती असे निषिध्द। त्यापापापासून ब्राह्मणाने कसे व्हावे मुक्त।।५५।। अजाणतेपणी घेता प्रेतनिमित्त अन्न। शुध्दिसाठी एक दिवस रात्र रहावे निराहार। पुढे वराहदेव म्हणाले धरणीमातेस। पूर्ववाहिनी नदीत करावे स्नान।।५६।। संध्याकरून करावे तर्पण, अग्निमध्ये तीळाचे हवन। नंतर करावा शांतीपाठ, मंगलपाठ। त्यानंतर करावे पंचगव्याचे पान। मधुपर्क सेवन हे परमशुध्दिचे साधन।।५७।। (पंचगव्यः गाईचे मल, मूत्र, दूध, दही, तूप) औदुंबराच्या लाकडाच्या पात्रात। शांतिजल घेऊन करावे गृह शुध्दिकरण। देवतांचे मुख करीतसे अग्निचे काम। करीतसे ते सर्व पापांचे भस्म।।५८।। म्हणून करावे देवतांना क्रमशः तर्पण। भूतमात्रास बळी देऊन करवावे ब्राह्मण भोजन। गोदानाने होती सर्वही पापे नष्ट। त्यामुळे पाप परिहारास्तव करावे गोदान।।५९।। प्रेतानिमित्त अन्न असता उदरात। झाले जर अशा स्थितीत प्राणोत्क्रमण। त्यामुळे कल्पपर्यंत त्या ब्राह्मणास। करावा लागे भयंकर नरकात निवास।।६०।। त्यामुळे

अन्नदाता आणि भोक्ता यांनी। स्वकल्याणार्थ अवश्य करावे प्रायश्चित्त। जर घेतले गाय, हत्ती इत्यादि संपत्तीचे दान। मंत्रपूर्वक प्रायश्चित्ताने करु शके उध्दार।।६१।। (मंत्रपूर्वक प्रायश्चित ब्राह्मणाने घेतले तरच दात्याचा उध्दार करण्याचे सामर्थ्य लाभते) जो असे ज्ञानसंपन्न, करी जो वेदाध्ययन। तो ब्राह्मण असे शुचिर्भूत व पवित्र। त्याला दान देणाऱ्या दात्याचा उध्दार। करण्यास असे असा ब्राह्मण समर्थ।।६२।। जन्म नक्षत्रदिनी, देवकार्यांच्या समयास। श्राध्द तिथीस किंवा पर्वकाल समयास। असेल जो प्रेतकार्य संबधी कार्यात निपुण। असेल जर कोणी वैदिक विद्या जाणकार।।६३।। निष्ठावान असे जो करी धर्माचे पालन। परमसंतोषी, धर्मज्ञ, सत्यवादी, शीलवान। क्षमाशील, अहिंसाव्रती, शास्त्रपारंगत। अशा ब्राह्मणांस द्यावे तुरंत दान।।६४।। परंतु कुण्ड अथवा गोलक ब्राह्मणास। बोलावू नये कधीही पितृकार्यास्तव। होई त्याला दिलेले दान निष्फल। त्यामुळे दात्याला, पितरांना मिळे नरकवास।।६५।।(कुण्ड-पिता जीवंत असता जार पुरुषा पासून प्राप्त पुत्र। गोलक-पतिनिधनानंतर स्त्रीने अन्यपुरुषापासून प्राप्त केलेला पुत्र।) अवन्तीपुरी राहात होता राजा धार्मिक। मनुवंशाचा तो मेधतिथि नाम। अत्रिकुलोत्पन्न वेदज्ञ चंद्रशर्मा नाम। होता राजाचा राज पुरोहीत।।६६।। मेधातिथिराजा होता दानशूर। प्रतिदिनी देतसे तो ब्राह्मणांस गोदान। प्रतिदिनी विधीने शंभर गायींचे दान। करुनच करीतसे तो अन्नग्रहण।।६७।। वैशाख महिन्यात पित्याच्या श्राध्द दिनी। केले आमंत्रित त्याने अनेक ब्राह्मणांस। ब्राह्मण आणि राजपुरोहीत आल्यावर। त्यांना प्रणाम करुन केला श्राध्दकार्यारंभ।।।६८।। पिंडप्रदाना नंतर केला अन्नदान संकल्प। केले निमंत्रित ब्राह्मणांस अन्न वितरीत। त्या ब्राह्मणांत होता एक गोलक ब्राह्मण। त्यामुळे श्राध्दात निर्माण झाला

दोष।।६९।। स्वर्गातून खाली आले मेधातिथिचे पितर। काटेरी वनात होते तहान भूकेने व्याकुळ। मेधा तिथि गेला होता मृगयेस्तव वनात। त्यांना पाहून विचारले तयांस कोण आपण।।७०।। पितर म्हणाले असे आमच्या वंशात। मेधातिथि नाम शक्तिसंपन्न पुरुष। आम्ही सर्व आहोत त्याचेच पितर। ऐकून झाला राजा अतिशय शोकाकुल।।७१।। म्हणाला मीच असे मेधातिथि नाम। आपण सर्व आहात माझे पितर। कृपया करावे मज तुम्ही निवेदन। कोणत्या कारणाने मिळाला तुम्हा नरकवास।।७२।। पितर म्हणाले, मुला तू केलेस श्राध्द। दुर्दैवामुळे आला तेथे गोलक ब्राह्मण। त्यामुळे तू केलेले श्राध्द झाले दूषित। त्याचे फळ स्वरुप मिळाला हा नरकवास।।७३।। दान करणे असे तुझा स्वाभाविक गुण। दिले आहेस तू अगणित गाईंचे दान। दिलीस भरपूर दक्षिणा तू ब्राह्मणांस। तुझ्या पुण्यामुळे लाभू दे आम्हा स्वर्गवास।।७४।। परंतु त्यासाठी परत एकदा तुज। करावे लागेल पितरांचे श्राध्द। ऐकून मेधतिथि आला घरास। पुरोहीत चंद्रशर्मास सांगितला वृत्तांत।।७५।। सांगितले त्यास करणे आहे श्राध्द। बोलावू नयेस कुण्ड - गोलक ब्राह्मणांस। चंद्रशर्माने राजाकडून करविले श्राध्द। त्यानंतर राजा पुन्हा गेला वनात।।७६।। पाहीले त्याने त्याचे पितर हृष्टपुष्ट। पाहून राजा झाला अतिशय आनंदित। 'होईल तुझे कल्याण' म्हणाले ते राजास। तुझ्यामुळे आता आम्ही जातो स्वर्गलोकात।।७७।। वराहदेव म्हणाले तेंव्हा धरणीदेवीस। श्राध्दामधील संकल्पित अन्न पात्र। ब्राह्मण नसतील तर द्यावे गाईस। नाहीतर ते अन्न सोडावे नदीत।।७८।। श्राध्दामध्ये भोजन अधिकारी तीन। पिता, पितामह आणि प्रपितामह। पितृपक्षात येणाऱ्या त्यांच्या तिथिस। पिण्डदान केल्याने मिळे विशेष फळ।।७९।। ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ।

मनुष्ययज्ञादि गृहस्थाश्रमीयांस विविधयज्ञ। सांगतो आता मी पितृयज्ञाचे महत्त्व। या यज्ञांद्वारे होतसे माझे आराधन ।।८०।। हव्यकव्य ग्रहणास असे अग्निस मुख्य। आवस्थ्य, दक्षिणाग्नि, आह्वनीयाग्नि नाम। (पाच अग्नी - दक्षिणाग्नी, गार्हपत्य, आह्वनीय, सभ्य, आवस्थ्य (उत्तराग्नी)) या सर्व अग्नींमध्ये असे मीच व्याप्त। सर्व कार्यांमध्ये असे मीच व्यवस्थित।।८१।। देवतीर्थांमध्ये भिक्षुक, वानप्रस्थी, संन्यासी। या सर्वांचा करावा विशेष सत्कार। परंतु श्राध्दामध्ये यांना करवू नये भोजन। देवतांसाठी करावे या साऱ्यांचे पूजन।।८२।। श्राध्द करताना करावे देवतीर्थांत अवगाहन। त्यानंतरच करावे अग्निमध्ये हवन। नंतर पितरांसाठी करवावे ब्राह्मण भोजन। त्यानंतर करावे धरणीमातेस वंदन।।८३।। पिण्डदान केल्याने होती पितर प्रसन्न। पितृयज्ञ कर्त्यास लाभे आयु, कीर्ति, तेज। स्वतःच्या उत्तम कर्मामुळे मिळे उत्तमलोक। त्यांच्यामुळे नरकातील पितरांचा होतो उध्दार।।८४।। असे ज्यांची पितरांवर श्रध्दा नितांत। लाभे त्यांना सुध्दा गती उत्तम। अशाप्रकारे ज्ञानीजन मृत्युनंतर। सत्त्वगुणसंपन्न शुक्लमार्गाने करती प्रयाण।।८५।। श्राध्द तर्पण असे गृहस्थास महान धर्म। गृहस्थाश्रमच असे सर्व धर्मांचा आधार। धर्मपूर्वक श्राध्दाने गृहस्थास जे मिळे फळ। यज्ञ, दान, उपवास, तीर्थयात्रा, अध्ययन ।।८६।। अग्निहोत्र आणि विधीपूर्वक दान। हे सारे केल्याने ही नाही लाभत ते फळ। ब्रह्मा, विष्णु, रुद्र शरीरात प्रविष्ट पितृगण। होती प्रकट पिता, पितामह, प्रपितामह रुपात।।८७।। ब्रह्मानेच अग्निस दिला यज्ञभागाधिकार। तैसेची पितृश्राध्दात पिण्डभागाधिकार। अग्निने ग्रहण केलेले अन्न पितरांस पथ्यस्वरुप। सोमासहीत होतील अधिकारी पितर।।८८।। या पितरांचे जनक आहेत कश्यप। पूर्वी कधीतरी न करता अग्नित हवन। (कश्यप

जनक असल्यामुळेच जर गोत्र ठाऊक नसेल तर गोत्र कश्यप म्हणायला सांगतात) केले गेले होते ब्राह्मणांस भोजन। नंतर संकल्पपूर्वक केले पिंडदान।।८९।। पिंडदानामुळे झाले अजीर्ण पितरांस। होऊ लागली अतिशय पीडा तयांस। सोडले त्यांनी भोजन झाले व्याकुळ। आले सर्व पितर सोमदेवा समीप।।९०।। म्हणाला सोम तेंव्हा तयांस। तुम्हा तिघांबरोबर झालो मी चौथा पितर। जाऊ या सर्वांनी ऐशास्थानावर। जेथे होईल आपल्या सर्वांचे कल्याण।।९१।। सोमासह गेले सुमेरु पर्वत शिखरावर। सर्वब्रह्मर्षी ब्रह्मदेवांची होते सेवा करत। त्यांना प्रणाम करुन म्हणाले ब्रह्मास। आमच्या अजीर्ण क्लेशाचा करावा नाश।।९२।। केले ब्रह्मदेवाने श्रीहरींचे ध्यान। प्रकट होऊन श्रीहरि म्हणाले सर्वांस। माझ्या वैष्णवी मायेचा हा प्रभाव। देवता जे होते ते झाले पितर।।९३।। माझ्या पासून निघालेले पिता ब्रह्मरुप। पितामह विष्णुरुप, प्रपितामह रुद्ररुप। मर्त्य लोकात श्राध्द समयास यांनाच। पितृदेवता रुपात केले आहे नियोजित।।९४।। ब्राह्मणांच्या हितार्थ विष्णुमायेच्या आज्ञेने। प्रजा करते यांना पितृयज्ञाने तृप्त। आता अजीर्णासाठी सांगतो उपाय। धूम्रकेतू व विभावसु हे शाण्डिल्य पुत्र।।९५।। (विभावसु - हे अग्नीचेच नाम आहे) मानवाने श्राध्दसमयी प्रथमभाग। अग्निस देऊन शेषपिण्ड विभावसुसह। करावा मानवांनी पितरांस अर्पण। तेंव्हा ब्रह्मदेवाने केले अग्निस आवाहन।।९६।। ब्रह्मदेवाने पाच यज्ञभागांचा अधिकार। देऊन म्हणाले तुजनंतर देतील मरुद्‌गणांस। तुम्हा सर्वांनंतर होईल अन्न पथ्य स्वरुप। याचे अधिकरी होतील सोमसहीत पितर।।९७।। काही ठिकाणी केले जाते सपात्रक श्राध्द। या ठिकाणी करावा लागत नाही संकल्प। करावी ब्राह्मणास प्रार्थना सविनय। सांगावे त्यांना करावे सुखपूर्वक भोजन।।९८।। (सपात्रक श्राध्द

- या श्राध्दात अन्न व परिवेषणात वाढले जाताना. स्वतः ब्राह्मण भोजन करतात) ब्राह्मण जेवताना करावे रक्षोघ्न मंत्र पठन। ब्राह्मण तृप्त झाल्यावर करावे अन्न विकरण। नंतर दूसरे आसन देऊन तयांस। त्यानंतर पसरावे भूमिवर दर्भ।।९९।। दक्षिणाभिमुख होऊन पितरांसाठी करावे पिंडदान। पूजेनंतर द्यावे ब्राह्मणास अक्षयोदक। नंतर स्वस्तिवाचन पूर्वक, करावे विसर्जन। सर्व विधि झाल्यावर करावे धरणीस वंदन।।१००।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्रीस्वामीसमर्थचरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय सातवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

ब्रह्माने सांगितले व्यासमुनींसी। सांगतो तीर्थोत्तम गया माहात्म्य तुम्हासी। असुर गया नाम होता शक्तिशाली। होता करीत दारुण तपस्या पुरातनकाळी।।१।। तपश्चर्येने त्रस्त देवगण, मुनी, ऋषी। गेले शरण ते भगवान श्रीहरीसी। प्रसन्न श्रीहरी म्हणाले तयांसी। करीन मी पूर्ण तुमचे कार्यासी।।२।। क्षीरसमुद्रातून आणले गयाने कमळ। केले विष्णुमायेने गयासी मोहीत। त्यामुळे कीटकदेशी गया करीशयन। विष्णूने मारले गयास गदाप्रहार करुन।।३।। देण्या मुक्ती साक्षात भगवानविष्णु। असती गदाधर रुपात गयाक्षेत्रात स्थित। असती गयासुराच्या पवित्र देहात। ब्रह्मा, जनार्दन, शिव प्रपितामह स्थित।।४।। तेथील क्षेत्राची मर्यादा करण्या स्थापित। म्हणाले भगवान विष्णु या सर्वांस। होईल स्थिर याचा देह पुण्यक्षेत्ररुपात। करतील जन येथे भक्तीने यज्ञ व श्राध्द।।५।। जो करील येथे यज्ञ, श्राध्द पिण्डदान। जाईल त्यामुळे तो नंतर ब्रह्मलोकात। स्वतः ब्रह्माने जाणून गयातीर्थ श्रेष्ठ। केले यज्ञ व ऋत्विक विप्रांचे पूजन।।६।। जल युक्त विशाल नदी, वापी, जलाशय। विविध भक्ष्य, भोज्य, कामधेनू आणि फळ। अशी सृष्टी गयापंचक्रोशात केली निर्माण। नंतर ब्रह्माने गयातीर्थ केले ब्राह्मणांस दान।।७।। पण ब्राह्मणांनी धनादि दानांचा सर्व। लोभवशात केला होता स्वीकार। ते पाहून ब्रह्मदेव झाले

संतप्त। तेथील ब्राह्मणांस केले ब्रह्माने शापित।।८।। तुमचे आर्जित विद्या आणि धन। नाही राहणार स्थिर तीन पिढयांपर्यंत। आणि ही नदी जी आहे अतिशय जलयुक्त। दगड पर्वत रुपातच राहील ती अवस्थित।।९।। ऐकून दु:खी ब्राह्मणांनी केली प्रार्थना। अनुग्रह करुन ब्रह्मदेव म्हणाले त्यांना। गयाक्षेत्रामध्ये होईल ज्याचे श्राध्द। होईल तयास निश्चित ब्रह्मलोक प्राप्त।।१०।। मनुष्यमात्र येऊन करतील तुमचे पुजन। त्याते मी मानीन माझेच पूजन। ब्रह्मज्ञान, गयाश्राध्द, मृत्यु गोशाळेत। तसेच कुरुक्षेत्री निवास ही सारी मुक्तीची साधन।।११।। (ब्रह्मज्ञानं,गयाश्राध्द गोगृहे मरणं तथा। वास: पुसां कुरुक्षेत्रे मुक्तिरेषा चतुर्विधा)(ग.पु.८२.१५)। केल्याने गयाक्षेत्रात श्राध्द। ब्रह्महत्त्या, सुरापान, सुवर्णचौर्य, गुरुपत्नीगमन। आणि यांच्या संगतीने होणारी पापे। ही सर्व महापातके होती गयाश्राध्दाने नष्ट।।१२।। (ब्रह्महत्त्या, सुरापानं स्तेयं गुर्वंगनागम:। पापं तत्संगजं सर्वं गयाश्राध्दाद् विनश्यति)(ग.पु.८२.१७)।। ज्यांचा मृत्यु होई संस्काररहीत। चोरांकडून मारल्याने सर्पदंशाने होई मृत्यु। हे सारेही होतील बंधनातून मुक्त। गयाश्राध्द कर्माच्या पुण्यफुलाने।।१३।। व्यासमुनी, गयातीर्थात केल्याने पिण्डदान। होई मनुष्यास जे फळ प्राप्त। त्या पुण्यप्रभावाचे वर्णन शंभर करोड। वर्षे केले तरी न होई पूर्ण।।१४।। कीटक देशात असे बहु पवित्र गयाक्षेत्र। गया तीर्थाच्या पूर्व, पश्चिम, दक्षिण। त्याचप्रमाणे उत्तरेस असे मृण्डपृष्ठ। असे ते अडीच कोसापर्यंत विस्तृत।।१५।। म्हणाले ब्रह्मदेव तेंव्हा व्यासांस। समुद्र, नदी, वापी, कूप, तडागदि तीर्थ। स्वत: येती येथे गयातीर्थत स्नानास। असे हे सत्य नाही त्यात संशय।।१६।। असे गया क्षेत्र विस्तार पाच कोस। गया शिराचा भाग असे एक कोस। गयाशीर्षस्थानी जर केले पिण्डदान। लाभे तृप्ती पितरांस शाश्वत

रुपात।।।१७।। (पंचक्रोशं गयाक्षेत्रे क्रोशमेकं गयाशिर:। तत्र पिण्डदानेन तृप्तिर्भवति शाश्वती)(ग.पु.८३.३)। विष्णुतीर्थापासून उत्तरमानस पर्यंत भाग। जातो मानला गयाचा शीर्ष भाग। म्हणती या स्थानासच फल्गुतीर्थ। येथे पिंडदानाने परमगती। मिळे पितरांस।।१८।। असती विष्णु गयाक्षेत्री पितृदेवता रुपात। त्या पुण्डरीकाक्ष देवाच्या केवळ दर्शनानेच। मनुष्यमात्र होई तीन ऋणांतून मुक्त। आहे असे या गयातीर्थाचे महत्त्व।।१९।। गयाक्षेत्री रथमार्ग, रुद्रपद स्थानांत। घेता कालेश्वर भगवान केदारनाथाचे दर्शन। होई त्यामुळे मनुष्य पितृऋण मुक्त। गयागमनानेच व्यक्ति होई पितृऋण मुक्त।।२०।। गयेमध्ये पितामह ब्रह्माचे घेता दर्शन। होई मनुष्यमात्र सर्व पाप विमुक्त। प्रपितामह दर्शनाने मिळे अनामयलोक। गदाधरास प्रणाम करण्यास नसे पुनर्जन्म।।२१।। येथे प्रात:काळी घेऊनी गायत्री दर्शन। विधिवत संध्या करता लाभे सर्व वेदांचे फळ। माध्याह्न काळी घेता सावित्री दर्शन। लाभे त्याला यज्ञ केल्याचे फळ।।२२।। घेता सायंकाळी सरस्वती दर्शन। मिळेल त्याला सर्व दानांचे फळ। पर्वतावरील शिवाचे घेता दर्शन। होई मनुष्य पितृऋणातून मुक्त।।२३।। धर्मारण्य आणि त्याचा स्वामी धर्मदेव। यांच्या दर्शनाने होती सर्वऋण नष्ट। गृध्रेश्वर महादेवाचे घेता दर्शन। कुणीही मनुष्य होई भवबंधातून मुक्त।।२४।। करता येथे असणाऱ्या तीर्थांमध्ये स्नान। अथवा येथस्थित देवांचे करता दर्शन। त्या मनुष्याच्या एकविसाव्या पिढी पर्यंत। होई सर्वांनाही ब्रह्मलोक प्राप्त।।२५।। नाही गया क्षेत्रात असे रिक्त स्थान। असती येथे सर्वत्र सर्वस्थानी तीर्थक्षेत्र। गयाक्षेत्र परिसर सर्व पवित्र तीर्थयुक्त। तेथे पिण्डदानाने लाभे पितृगणांस ब्रह्मलोक।।२६।। (गयायां न हि तत्स्थानं यत्र तीर्थं न विद्यते। पञ्चकोशे गयाक्षेत्रे यत्र तत्र तु

पिण्डदः। अक्षयं फलमाप्नोति ब्रह्मलोकं नयेत् पितृन्।।)(ग.पु.८३.३९.४०)पुण्यशील गयेमध्ये असे गयाशिर श्रेष्ठ। त्यामध्येही मुख्यभागी असे फल्गुतीर्थ। उदीची कनका नदी, नाभितीर्थ मध्यभाग। त्या तीर्थाच्या जवळच असे ब्रह्म सदस्तीर्थ।।२७।। येथील केवळ स्नानानेच मिळे मोक्ष। कूपामध्ये करता पिंडदान होई पितृऋण मुक्त। स्वर्गद्वार तीर्थात करीता पिंडदान। जाती त्याचे पितृजन ब्रह्मलोकात।।२८।। भीष्मतर्पण स्थानास म्हणती कूटस्थान। करीता येथे पिंडदान श्राध्द। तरती त्याचे पितृगण भवसागर। अशी असती अनेक तीर्थस्थाने गयेत।।२९।। हंसतीर्थ, गयालोक, वैतरणी, गोमकतीर्थ। येथील पिंडदानाने होती एकवीस पिढया मुक्त। ऐन्द्रतीर्थ, वासवतीर्थ, रामतीर्थ, वैष्णवतीर्थ। गायत्री, सावित्री, सारस्वत तीर्थे आहेत पवित्र।।३०।। धर्मपृष्ठ, ब्रह्मसर, गयाशीर्ष, अक्षवट। धर्मारण्य, धेनुकारण्य, ब्रह्मारण्य, नागाद्रि पर्वत। भरताश्रम म्हणजे मतङ्गपर्वतावर। करावे नक्कीच पितरांसाठी श्राध्द।।३१।। येता आपला पुत्र होती पितर हर्षित। येथील पवित्र जलस्पर्श करुन करील दान। करील येथील गयाकूप क्षेत्रात पिंडदान। त्यामुळे होईल आम्हास ब्रह्मगती प्राप्त।।३२।। करवावे येथे त्या ब्राह्मणांस भोजन। ज्यांच्या पूर्वजांस केले होते ब्रह्माने वरण। गयेतील ब्रह्मद आणि सोमपान तीर्थ। केले होते ब्रह्मदेवाने त्यांच्यास्तव निर्माण।।३३।। हव्य कव्यादि पक्वानांनी गयातीर्थात। भोजन देऊन करावे ब्राह्मणांस संतुष्ट। गयाक्षेत्रात जो करी वृषोत्सर्ग। लाभे अग्निष्टोम यज्ञाचे फळ तयास।।३४।। (वृषोत्सर्ग - पितरांसाठी बैल सोडण्याची पूर्वी प्रथा होती) असे गयाक्षेत्र अतिशय पवित्र। करावे येथे तीलरहीत पिंडदान स्वतःस। पितृ, बन्धुबान्धव, तसेच सुहृदजन। सर्वांस पिंडदान केले जाते गया क्षेत्रात।।३५।। (आत्मनोऽपि

महाबुध्दिर्गयायां तुतिलैर्विना। पिण्डनिर्वापणं कुर्यादन्येषामपि मानवः)(ग.पु. ८३-६९) रामतीर्थात स्नानाने लाभे शतगोदान पुण्य। मतंगवापी स्नानाने सहस्रगोदान पुण्य। वसिष्ठाश्रमात स्नानाने मिळे वाजपेय यज्ञफळ। महाकौशिकी निवासाने मिळे अश्वमेध फल।।३६।। अग्निधारा नदी असे ब्रह्मसरोवरा जवळ। या नदीचेच असे कपिला नदी नाम। या नदीत स्नान करुन करता पितृश्राध्द। लाभे त्यास अग्निष्टोमयज्ञ फळ।।३७।। अशीच असती पुण्यदायक पवित्र। स्थाने असती या गयानाम पवित्र क्षेत्रात। कुमारधारा, सोमकुंड, संवर्तवापी तीर्थ। प्रेतकुंडतीर्थ, देवनदी, लेलिहान इत्यादि तीर्थ।।३८।। या पवित्र तीर्थांत करुनी पिंडदान। करावा आपल्या पितृजनांचा उध्दार। वसिष्ठेश्वरादि देवतानां करुन प्रणाम। मनुष्याने व्हावे सर्व ऋणातून मुक्त।।३९।। कव्यवाह, सोम, याम, अर्यमा, अग्निष्वात्त। बर्हिषद, सोमपा, असती पितृदेवात। गयातीर्थात श्राध्द करण्याच्या वेळेस। या पितृदेवतांची प्रार्थना करावी अवश्य।।४०।। (कव्यवाहस्तथा सोमो यमश्चैवार्यमा तथा। अग्निष्वात्ता बर्हिषदः सोमपाः पितृदेवताः।। आगच्छन्तु महाभागा युष्माभि रक्षितास्त्विह। मदीयाःपितरो ये च कुलेजाताः सनाभयः। तेषां पिण्डप्रदानर्थमागतोऽस्मि गयामिमाम्।।(ग. पू. ८४-१२-१४)) हे कव्यवाह, सोमप, यम, अर्यमा, अग्निष्वात्त। बर्हिषद् सोमप (दिव्य) पितृदेवता। असे आपणांस विनम्र निवेदन। आपण येथे यावे तुम्हाकडून रक्षिलेले।।४१।। आमचे कुलोत्पन्न सपिण्ड जे पितर। गेले असती पितृलोकात त्या सर्वच। पितृजनांसाठी देण्यास पिंडदान। आलो आहे मी या पवित्र गयाक्षेत्रास।।४२।। असे म्हणून फल्गुतीर्थात करुन पिंडदान। घ्यावे मनुष्याने पितामहांचे दर्शन। त्यानंतर घ्यावे गदाधरविष्णुंचे दर्शन। असे केल्याने होई तो पितृऋणमुक्त

।।४३।। इतकेच काय फल्गुतीर्थात करुन स्नान। घेता भगवान गदाधराचे दर्शन। त्यामुळे त्याच्या स्वतःबरोबरच तो पुरुष। करील मागील पुढील दहा पिढयांचा उध्दार।।४४।। गयातीर्थात करावे नवदैवत्य श्राध्द। तसेच येथे करावे द्वादशदैवत्य श्राध्द। अन्वष्टका तिथी तसेच वृध्दिश्राध्दात। गयेमध्ये मातेसाठी करावे वेगळे श्राध्द।।४५।। हे असे करावे फक्त गयातीर्थ क्षेत्रात। अन्यतीर्थ क्षेत्रांमध्ये करु नये पृथक् पृथक्। आपल्या पित्याच्या श्राध्दाबरोबरच। करावे तेथे मातेचेही श्राध्द संपन्न।।४६।। मुण्डपृष्ठतीर्थावर ठेवले शिवाने पाऊल। म्हणूनच येथे अल्प तपस्येचे मिळे मोठे फळ। करता येथे पिंडदान न नरकवासी पितरांस। मिळे स्वर्ग आणि स्वर्गवासीयांस मिळे मोक्ष।।४७।। (मुण्डपृष्ठे पदं न्यस्तं महादेवेन धीमता। अल्पेन तपसा तत्र महापुण्यमवाप्नुयात्। गयाशीर्षे तु यः पिंडान्नाम्ना येषां तु निर्वपेत्। नरकस्था दिवं यान्ति स्वर्गस्था मोक्षमाप्नुयुः।।)(ग.पु ८४/२८.३०) एकदा प्रेत म्हणाले विशाल नाम वाण्यास। गयातीर्थी तू कर माझ्या नावे पिंडदान। त्या वाण्याने केले त्या प्रेताच्या नावे पिंडदान। त्याच प्रमाणे आपल्या लहान भावांसह।।४८।। केले आपल्या पितृजनांस्तव पिडंदान। झाले त्याचे पितर मुक्त, झाला पुत्र लाभ त्यास। पुढील जन्मी झाला राजपुत्र, गेला गयाक्षेत्रास। तेथे केले पिंडदान झाली पुत्रप्राप्ती त्यास।।४९।। एके दिवशी त्याने पाहीले आकाशी तीन पुरुष। होते ते श्वेत, रक्त, काळ्यावर्णाचे पुरुष। विचारले त्याने तयांस सांगा तुम्ही कोण। श्वेतवर्णीय म्हणाला मी असे तुझे वडील।।५०।। तू गयातीर्थी केलेल्या पिंडदानाने झाला इंद्रलोक प्राप्त। हे रक्तवर्णीय आहेत माझे जनक। यांच्या शिरी ब्रह्म हत्यादि होती अनेक पाप। हे काळ्या वर्णाचे असती तुझे प्रपितामह।।५१।। (पिता म्हणजे वडिल, पितामह म्हणजे आजोबा,

प्रपितामह म्हणजे पणजोबा) केला होता यांनी अनेक ऋषींचा वध। तसेच होती त्यांची आणखी पापे अनेक। या दोघांचीही होती अशी पाप। म्हणून लाभला त्यांना अवीचि नाम नरक।।५२।। तू गयाक्षेत्री जाऊन केलेस पिंडदान। त्यामुळेच आम्ही सर्वही झालो विमुक्त। आता आम्ही सर्व जाऊ उत्तम स्वर्ग लोकात। झाला कृतकृत्य विशाल, गेला तोही स्वर्गलोकात।।५३।। गयातीर्थ असे पापमोचक पवित्र। तेथे पिंडदान करताना म्हणावा पुढील मंत्र - (येऽस्मत्कुले तु पितरो लुप्त पिण्डोदकक्रियाः। ये चाप्यकृत चूडास्तु ये चे गर्भाद्विनिस्सृताः। येषां दाहो न क्रिया च येऽग्नि दग्धास्तथापरे। भूमौ दत्तेन तृप्यन्तु तृप्ता यान्तु परांगतिम्। पिता पितामहश्चैव तथैव प्रपितामहः। माता, पितामहीचैव तथैव प्रपितामही। तथा मातामहश्चैव प्रमातातामह एव च। वृध्द प्रमातातामहश्च तथा मातामही परम्। प्रमातातामही तथा वृध्दप्रमातातामहीति वै। अन्येषां चैव पिंडोऽयमक्षय्यमुपतिष्ठताम्।।) (ग.पु.८४/४३-४८) सांगतो आता याचा संक्षिप्त अर्थ। जे कोणी राहीले माझ्या कुळी जलतर्पणक्रिया वंचित। नाही प्राप्त झाले ज्यांना क्रिया संस्कार। चूडाकर्म, संस्कारविहीन नसे घडला त्यांस संस्कार।।५४।। करीतो मी या गयाभूमीवर जलतर्पण। तैसेची सर्वांसी करीतो हे पिंडदान। त्यामुळे माझे पिता, पिमामहादि सर्व पितर। होवोत तृप्त होवो त्यांना परमगती प्राप्त।।५५।। करीता या गयाक्षेत्री पितृजनांचे श्राध्द। तैसेची करीता पिंडदानादि कार्य। जो करी येथे सर्व क्रिया संपन्न। पितृगणांप्रमाणे होई त्यालाही ब्रह्मलोक प्राप्त।।५६।। या क्षेत्रात विद्यमान गदाधर विष्णूचे पूजन। लाभे त्याला भार्या, पुत्र ऐश्वर्यादि वैभव। कपर्दि भगवान शिव आणि गणेश। यांना करीता वंदन होई तो सर्वविघ्न मुक्त।।५७।। मार्कण्डेयांनी सांगितले पितृस्तोत्र कौञ्चुकी मुनींस। सांगतो

सविस्तर ते तुम्हास। होते फारपूर्वी प्रजापति रुचि नाम। करीत होते निरहंभावे भूवर विचरण।।५८।। नाही केला विवाह, केला अग्निहोत्र त्याग। नव्हता स्वीकारला त्याने गृहस्थाश्रम। म्हणाले रुचिचे पितर तयास। मुला, नाही स्वीकारलास तू गृहस्थाश्रम।।५९।। गृहस्थाश्रमानेच लाभे मोक्ष मनुष्यास। गृहस्थच करीतो देव, पितर, ऋषी, याचक पूजन। 'स्वाहा' ने संतुष्ट करी देवतांस। 'स्वधा' ने करी तो पितरांस संतुष्ट।।६०।। अतिथि, नोकरादिंस अन्नदानाने संतुष्ट। न केल्याने होशील देव, पितृऋणांत बध्द। मनुष्य आणि प्राणिमात्रांचा तू ऋणी आहेस। प्रतिदिन वर्धित होत आहे तुझे ऋण।।६१।। पुत्रोत्पत्ति, देवपूजा, पितृतर्पण यानंतरच। करावे मनुष्याने संन्यास ग्रहण। या सर्वाविना न लाभे स्वर्ग किंवा मोक्ष। ह्या अन्यायाने प्राप्त होतील कष्ट।।६२।। रुचि म्हणाला पितरांस जीवनात दारपरिग्रह। करीतसे अंतकाळी अधोगती प्रदान। निष्परिग्रह करी विद्या आणि ज्ञानोपार्जन। करी तत्त्वज्ञानरुपी जलाने आत्मा प्रसन्न।।६३।। म्हणाले हा असे जितेंद्रियांचा मार्ग। हे जरी उचित परी नसे हा कल्याणाचा मार्ग। पञ्चयज्ञ, तप आणि दानाने करावे अमंगल दूर। फल प्राप्तीची इच्छा सोडून करावे कर्म।।६४।। अशा कर्माने न पडे कर्मबंधन। जन्मांतरीचे कर्म होई भोगल्याने नष्ट। प्रारब्धाचे पापपुण्य कर्म सुखदु:खात्मक। भोगभोगून होई आत्माप्रक्षालन।।६५।। विद्या प्राप्ती असे कर्म हेतुपूर्वक। सज्जन पुरुष स्वीकारती शास्त्रकथित मार्ग। शास्त्रविहीत कर्माचे न केले अनुष्ठान। त्यामुळे होती केवळ पापच उत्पन्न।।६६।। यथोचित प्रमाणात विषाचा उपयोग। होई प्राणिमात्रांस कल्याणकारक। उचित अविद्यारुप विहीत कर्मानुष्ठान। करुन भवबंधनमुक्त देई मोक्ष।।६७।। ऐकून पितरांचे हे सर्व कथन। केला रुचिने विवाह करण्याचा निश्चय।

उचित कन्या प्राप्ती व्हावी म्हणून। केले रुचिने तपस्येने ब्रह्मदेवास प्रसन्न।।६८।। ब्रह्मदेव म्हणाले रुचिस करी तू विवाह। करावेस तू तुझ्या पितरांचे पूजन। संतुष्ट होऊन करतील पितृगण कामना पूर्ण। नदीकिनारी रुचिने केले पितृतर्पण।।६९।। केले रुचिने मन:पूर्वक पितृस्तवन। असती जे पितर देवता रुपात विद्यमान। 'स्वधा'द्वारा तृप्त होणारे पूज्यपितर। करतो मी पितृगणांस विनम्र वंदन।।७०।। स्वर्गात श्राध्दाच्या शुभकाळी सिध्दगण। तसेच गुह्यकजन करती त्या पितरांचे पूजन। पृथ्वीवर मनुष्यमात्र श्राध्दसमयी करती पूजन। त्याने संतुष्ट पितर देती त्यांस अभीष्टलोक।।७१।। भूमीवर ब्राह्मण अभीष्ट लाभास्तव। प्राजापत्य लोक देणारे करती ज्या पितरांचे पूजन। त्या अभीष्ट प्रदायक पूज्य पितरांस नमन। तसेच तप करुन जे झालेत पापमुक्त।।७२।। त्या मुनींकडून श्राध्दाद्वारे ज्यांचे केले जाते पूजन। धर्मचारी, जितेंद्रिय, समाधिस्थ करती ज्यांना तृप्त। क्षत्रिय गण पितृगणांस कव्यपदार्थाने करती तृप्त। त्या सर्वही पितृगणांस माझे नमन।।७३।। सर्वकर्म निरत वैश्यगण जल, पुष्प, धूप। अग्निने करीती ज्यांचे अर्चन। शूद्रगण भक्तिपूर्वक श्राध्दाने करती तृप्त। त्या सुकालिन् नाम पितरांस माझे प्रणाम।।७४।। पाताळवासी असुर दंभ अहंकार सोडून। ज्या अमृतपान करणाऱ्या पितरांस। श्राध्दाने तृप्ती देती ज्या पितृगणांस। त्या सर्व पूज्यपितृगणांस करतो नमन।।७५।। रसातळातील नागगण मनोवांछित पूर्ण करण्यास। श्राध्दामध्ये भोगपदार्थ देऊन करती पूजन। तसेच सर्पगण मंत्रोच्चाराने करती ज्यांचे अर्चन। त्या सर्व पितृगणांस माझा प्रणाम।।७६।। जे देवलोक, अन्तरिक्ष, पृथ्वीवर करती निवास। आहेत जे देव आणि दैत्यांनाही पूजनीय। अशा सर्व पूज्य पितरांस करुन नमन। विनवितो करावा दिलेल्या वस्तूंचा स्वीकार।।७७।।

जे परमार्थास्तव पितृयोनीत राहून। अमूर्त रुपात असती विमानात विद्यमान। कष्टातून मुक्ती देणाऱ्या ज्या पितरांचे पूजन। निर्मल मनाने करती श्रेष्ठ योगीजन।।७८।। मूर्तरुपाने स्वर्गात राहणारे स्वधा भोजी पितर। इच्छा करणाऱ्यांची करती इच्छा पूर्ण। करती अभीष्टांची इच्छिते या लोकीच पूर्ण। देवत्व, इंद्रत्वापेक्षाही देती श्रेष्ठ पद।।७९।। चंद्ररश्मि, सूर्यमंडळ, विमानात करती निवास। आम्ही दिलेले करुन स्वीकार होवो संतुष्ट। अग्नीत दिलेल्या आहुतीने जे होती तृप्त। ते सर्व पितृगण राहोत सदा प्रसन्न।।८०।। दिलेल्या पुष्प, गन्ध, जल पक्वान्नातून। माझ्या पितरांना प्रिय पदार्थ होवोत प्राप्त। जे भूलोकी केलेल्या नित्यपूजेचा स्वीकार। जे आहेत अमावस्या, अष्टकालात पूजनीय।।८१।। मम पितर ज्यांची पूजा होते वर्षान्त समयास। तसेच होई पूजन अभ्युदय समयास। असे माझे परमपूज्य पितृगण। मी केलेल्या श्राध्दाने होवोत संतुष्ट।।८२।। कुन्दपुष्प, चंद्रसा, जे स्वच्छगौरवर्ण। असती जे पितृगण ब्राह्मणांस पूज्य। दैदीप्यमान सूर्यासम वर्णवाले पितर। ज्यांचे पूजन करती क्षत्रिय जन।।८३।। सोन्याप्रमाणे कांती असलेले पितर। असती जे वैश्यवर्णीयांस पूजनीय। निळयाप्रभेने सुशोभित जे शूद्रांस पूज्य। होवोत सारे तृप्त करतो तयांस नमन।।८४।। अग्निष्वात्त, बर्हिषद, आज्यप व सोमप। ह्या श्राध्दाने तृप्त होऊन करोत रक्षण। विश्व, विश्वभुक्, आराध्य धर्म धान्य शुभानन। भूतिद, भूतिकृत्, भूतिनाम असती नऊगण।।८५।। कल्याण, कल्यद, कल्यकर्ता, कल्यतराश्रय। कल्यता हेतु आणि अनघ नावाचे सहा पितृगण। वर, वरेण्य, वरद, तुष्टिद, पुष्टिद। विश्वपात, धाता नावाचे प्रसिध्द सात पितृगण।।८६।। महान्, महात्मा, महित, महिमावान। आणि महाबळ नावाने प्रसिध्द पाच पितृगण। सुखद,

धनद, भूतिद हा गण चतुष्टय। असे सर्व पितरांचे होती एकतीस गण।।८७।। या एकतीसांनी असे जगत् परिव्याप्त। हे सर्व पितृगण होवो या श्राध्दाने तृप्त। प्रसन्न पितरांनी दिले रुचिस दर्शन। पितरांच्या तेजोराशीस केले रुचिने सादर वंदन।।८८।। दिले रुचिस प्रसन्न पितरांनी वरदान। लाभेल मनोरमा पत्नी होईल तुज पुत्र प्राप्त। बुध्दिमान तो मन्वन्तराधिप रौच्य नामे ख्यात। असती त्याला बलवान, महात्मा अनेक पुत्र।।८९।। या स्तोत्र पठनाने होऊन आम्ही संतुष्ट। देऊ उत्तम भोग, ध्यान, पुत्र आयु, आरोग्य। श्राध्द समयी पठन करीता होऊ उपस्थित। होईल ते श्राध्द अक्षय असे म्हणून झाले अंतर्धान।।९०।। श्राध्दाच्या वेळी राहती पितर उपस्थित। देवी सीतेने आपले श्वुशुरादि तीन पितरांना पाहीले प्रत्यक्ष। श्रीरामाने केले होते पुष्कर येथे श्राध्द। केले होते रामाने ऋषींना निमंत्रित।।९१।। बनवले भोजन सीतेने पक्व फळ करुन सिध्द। रामाज्ञेने सीता आली वाढण्या अन्न। पण ब्राह्मणांत गेल्यावर गेली सीता तेथून दूर। जाऊन बसली ती वेलींमध्ये लपून।।९२।। पाहून राम झाला विस्मय चकीत। पण प्रथम त्याने वाढले ब्राह्मणांस भोजन। ब्राह्मण गेल्यावर रामाने पूसले सीतेस। उभी राहीली सीता होऊन लज्जित।।९३।। आपल्या पितरांच्या सेवकांनीही केले नसलेले भोजन। कसे देऊ त्यांना मी हे असले भोजन। पाहीले त्यांनी मला सदा आभूषण विभूषित। वल्कल, मृगचर्म लेऊन कशी जाऊ समोर।।९४।। त्यामुळे लज्जित होऊन आले मी परत। सीतेने प्रत्यक्ष पाहीले याने राम चकीत। असते श्राध्दाचे फार महत्व सांगतो संक्षिप्त। अमावस्येस पितृगण येती वायुरुपात।।९५।। वाट पाहात तहान भूकेने होऊन व्याकुळ। निराश होऊन सूर्यास्तानंतर जाती परत। म्हणून अमावस्येस अवश्य करावे श्राध्द। पुत्र

किंवा बंधुबांधवांनी करावे श्राध्द।।९६।। गयातीर्थात जाऊन करीता श्राध्द। लाभे पितरांस ब्रह्मलोकी निवास। पितृगण पूजनाने लाभे आयु, पुत्र। यश, स्वर्ग, कीर्ति, पुष्टी, बल श्री सुख आणि धन।।९७।। देवकार्यापेक्षाही असे पितृकार्य श्रेष्ठ। देवांच्याही आधी करावे पितरांस प्रसन्न। हे सर्व सांगितले भगवंतांनी गरुडास। मृत्युनंतर ज्योतीरुप जीवात्मा करी वायुरुप धारण।।९८।। स्वअधिकारानुसार जाई दुसऱ्या शरीरात। म्हणून मृत्युपूर्वीच धैर्याने व्हावे संयमित। षड्विकारांचा त्याग करुन व्हावे ब्रह्मरुप। त्यामुळेच जीवात्मा होई सर्व कर्म मुक्त।।९९।। पितृगण - जीवात्मा या विषयींचे चिंतन। केले स्वामी कृपेने गरुडपुराणातून। राहोत सर्वांचे पितृगण सदा संतुष्ट। लाभो वैद्य गणेशास पितरांचे वरदान।।१००।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्रीस्वामीसमर्थचरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय आठवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

सादर वंदन श्री गजाननास। होऊ दे माझे कार्य निर्विघ्न पूर्ण। देऊनी त्या विघ्नहर्त्याने वरदान। करवावे पूर्ण पितृनवशती लेखन।।१।। सूतासी शांशपायन पूसती। प्रत्येक महिन्याच्या अमावस्या तिथीसी। जात असे इला पुत्र पुरुरवा स्वर्गासी। कोणत्या रीतीने करी तर्पण पितरांसी।।२।। असती जेंव्हा सूर्य चंद्र एकाच रात्री। एकाच मंडलात समान नक्षत्री येती। अमावस्या असे म्हणती त्या तिथीसी। या तिथीस जात असे पुरुरवा स्वर्गासी।।३।। जाई पुरुरवा आपल्या आईचे वडिल। आणि आजोबा सूर्य आणि चंद्राला पाहण्यास। त्यांना वंदन करुन राही प्रतिक्षा करीत। प्रसन्न चंद्रातून होई अमृत परिस्रवण।।४।। पुरुरवा राहुनी उपस्थित स्वर्गलोकात। करी चंद्राची उपासना पितरांसमवेत। दोन लव (कुहू) म्हणजे छत्तीस निमेष पर्यंत। पितर आणि सोम करती कव्यग्रहण।।५।। अमावस्या चतुर्दशी आणि प्रतिपदा युक्त। या दोन्ही असती उपासनेस योग्य। पुरुरवा करी अमावस्या व कुहू उपासना। त्यावेळी भानुमतीस्तव करीतसे तेथेच निवास।।६।। तृप्तीस्तव पितरांच्या सुधामृत प्रस्रवण। कृष्णपक्षात पंधरा सुधामृतांचे प्रस्रवण। करणाऱ्या सूर्य किरणांद्वारे चंद्रातून अमृत वर्षाव। करीतसे प्रतिक्षा पुरुरवा नृपतिवर।।७।। ह्या शीघ्रस्त्रवित अमृताचे करुन ग्रहण। करी पुरुरवा तृप्त आपुल्या पितरांस। सौम्य, बर्हिषद, कव्य,

अग्निष्वात्त। पितरांस लाभे तृप्ती एक मास पर्यंत।।८।। ऋतु म्हणजे अग्निस मानती संवत्सर। संवत्सरापासून ऋतुगण झाले उत्पन्न। ऋतुगणांपासून झाले आर्तव उत्पन्न। अर्धमास नाम प्रसिध्द वर्षाचे पुत्र पिता आर्तव।।९।। ऋतुगण पितामह (आजोबा) मास नामे प्रसिध्द। हे मानले जाती वर्षाचे पुत्रगण। ब्रह्मपुत्र पंचाब्द नाम प्रसिध्द देवगण। ते प्रपितामह (पणजोबा) म्हणून असती प्रसिध्द।।१०।। सौम्य नावाचे पितर सोमापासून उत्पन्न। कव्य नावाचे पितर असती भृगुचे पुत्र। सोमापासून उत्पन्न सोमपायी पितरगण। उपहुत नावाने केले जाते त्यांचे स्मरण।।११।। आज्य (तूप) पान करणारे कव्य नाम पितृगण। अशा प्रकारे होती तृप्त हे पितर वर्ग। काव्य, बर्हिषद आणि अग्निष्वात्त। असती असे पितरांचे तीन प्रकार।।१२।। यज्ञकर्ता गृहस्थ होती क्रतु आणि बर्हिषद। तेच गृहस्थ होती अग्निष्वात्त आणि आर्तव पितर। अष्टका पति, काव्य आणि पञ्चाब्द। या नावाचेही सांगितले जाती पितर।।१३।। यांच्या संवत्सराचे असे अग्नि नाम। सूर्य परिवत्सर, चंद्र इद्वत्सर, वायु अनुवत्सर। रुद्र वत्सर असे जे युगात्मक पाच वर्ष। उष्मपा व दिवाकीर्त्य नामे होते यांचे स्मरण।।१४।। प्रत्येक महिन्याच्या अमावस्या तिथीस। करती हे सुधापान आकाशात। होता पुरुरवा जो पर्यंत जीवंत। करीतसे तो या प्रमाणे पितरांस तृप्त।।१५।। प्रतिमासी चंद्रापासून स्त्रवित सुधा। सोमपायी पितरांना होते ते अमृत। अशा प्रकारे स्त्रवित होणारे हे अमृत। सौम्य, सुधा आणि मधु नामे असे प्रसिध्द।।१६।। कृष्णपक्षातील चंद्राच्या पंधरा जलमयी कला। छन्दोत्पन्न तेहतीस देव करती पान। देवांकडून पान केला गेलेला चंद्र। अमावस्येच्या पंधराव्या भागात राहून करी गमन।।१७।। सुषुम्नेद्वारा वृध्दि पावलेला चंद्र। तेंव्हा कृष्ण पक्षाची जर प्रतिपदा प्रवृत्त

असेल। तर त्या तिथिस म्हटले जाते पोर्णिमा। असे चंद्र तेंव्हा पूर्ण कला युक्त।।१८।। चंद्र आणि सूर्य परस्पर युग व्यवधान विद्यमान। विषुवरेषेवर सम सूत्रात। उदय होता घडे त्यांस परस्पर दर्शन। ह्या योगाचे नाव आहे व्यतिपात योग।।१९।। सूर्यालाच मानून मूळ आधारभूत। केले जाते नेहमी काळाचे गणन। असे सूर्यच वेळेचा मार्गदर्शक। समयाला अनुसरुनच त्या अधीन असे सक्रियांचे विधान।।२०।। पोर्णिमा तिथी रात्रीच्या संधीभागात। मिळे पूर्ण प्रकाश म्हणती अनुमती तिज। देवांच्या सह पाहती तिज पितृगण। म्हणूनच अनुमती पोर्णिमा असे तिचे नाव।।२१।। पोर्णिमेस असे चंद्र अत्यंन्त सुप्रकाशित। म्हणूनच चंद्राच्या रंजनामुळे राका नाव। ज्या तिथीस सूर्य व चंद्र एका नक्षत्रात। त्या पंधराव्या तिथीस अमावस्या नाव।।२२।। देवांच्या अमृतपानाने होई चंद्र क्षीण। सुषुम्ना रश्मिने करी सूर्य पितरांस तृप्त। जेंव्हा चंद्राच्या होती संपूर्ण कला क्षीण। सुषुम्नेद्वारा सूर्य करी एकेक भाग पूर्ण।।२३।। सूर्याच्या तेजाने चंद्राचे शरीर होई पूर्ण। दिसे तेंव्हा गगनी चंद्राचे पूर्ण श्वेत मंडळ। जेंव्हा चंद्राच्या होती कला क्षीण। दिसत नाही चंद्र म्हणती अमावस्या तियेस।।२४।। पितृमान् चंद्राचे केले जाते स्मरण। केले जाते त्याचे इदवत्सर नामे स्मरण। चंद्राच्या कला सूर्य किरणांनी होती पूर्ण। सुधामृत स्त्रवणाच्या किरणांनी असे घेरला चंद्र।।२५।। सांगतो आता महत्त्वाचे पर्वकाळ। असे हे वर्णन शुक्ल आणि कृष्ण तिथींस। अर्ध्या महिन्याच्या तिथी असती पर्वकाळ। पोर्णिमा व अमावस्या ऐसे त्यांचे नाम।।२६।। तृतीया इत्यादि तिथी अर्धमासाचे पर्वकाळ। अग्न्याधानादि सत्कार्य करती या पर्वांत। अनुमतिच्या वेळी दोन काष्ठा(कला)काळ। राकाचा तिसरा प्रहर मानती यास योग्य।।२७।। कृष्ण पक्षीय प्रतिपदेस अपराह्ण काळ।

मानती हा सत्कार्यांसाठी योग्य काळ। संध्यासमयास जेंव्हा चंद्रसूर्य एकमेकास। पाहती त्यालाच म्हणती दर्श।।२८।। अमावस्या तिथीचा दोन कला (लव)काळ। तसेच पर्व संधीचा दोन काष्ठा(कुहू) काळ। (कुहू - कु हू या दोन अक्षरांच्या उच्चारणास लागणारा काळ)(अवस्थित म्हणजे विद्यमान) जाई मानला हा सत्क्रियांस योग्य काळ। मध्याह्नी चंद्र असे सूर्यासह अवस्थित।।२९।। असे तेथे प्रात:काळी दोन कला पर्यंत। नंतर माध्याह्नी येई चंद्र सुर्य मंडळा बाहेर। अशा प्रकारे शुक्ल प्रतिपदेस होई मुक्त। हा काळ मानती महत्त्वाचा अतिशय।।३०।। चंद्राने सूर्यापासून मुक्त होण्याचा काळ। असे आहुती, यज्ञ, तर्पणास उत्तम काळ । ह्या पर्वाच्या अमावस्येच्या काळास ऋतुमुखनाम। होई अमावस्येस चंद्रकलांचा अधिक क्षय।।३१।। अमावस्येस चंद्र पडे सूर्य मंडळा बाहेर। दोन लव मात्र चंद्र करी सूर्यमंडळ स्पर्श। तो काळ असे यज्ञ, हवनास उपयुक्त। मानला जाई हा काळ या क्रियांस प्रशस्त।।३२।। कोकिळेच्या कुहू उच्चारणास लागे जितका काळ। तेवढ्याच काळाच्या अमावस्येस कुहू नाम। ज्या अमावस्येस चंद्र सिनीवली प्रमाणात। करी सूर्यमंडळ प्रवेश त्यास सिनीवली नाम।।३३।। (सिनीवली - चतुर्दशी युक्त अमावस्या) अनुमती, राका, सिनीवली आणि कुहू। यांसी केवळ दोन लव (काष्ठा) काळच प्रशस्त। अशा प्रकारे पर्वांच्या संधीकाळास। दोन लव काळच मानला जाई प्रशस्त।।३४।। सर्व पर्व तिथींचा पूर्वकाळ असे प्रशस्त। असती उत्तम त्या यज्ञ आणि तर्पणास। चंद्र व सूर्याच्या व्यतिपात योगावर। संयोग व पोर्णिमा असती समफलदायी मानती सर्व।।३५।। प्रतिपदा, पोर्णिमेचा पर्वकाळ द्विमात्रिक। कुहू आणि सिनी वालीचा द्विलवात्मक। चंद्र असता सूर्य व अग्निमंडळ युक्त।

हा पर्वकाळ असे कलाश्रम (कलामात्र) मात्र।।३६।। रात्री पर्वसंधीत होई पूर्णचंद्रगस्त। असे वर्धित चंद्र पंधरा कलाने युक्त। त्यामुळे चंद्रग्रहण लागे फक्त पोर्णिमेस। असती सोमपायी, सोमवर्धक, पितरगण व गण।।३७।। ऋतु आणि मोसम असती परस्पर सहाय्यक। असती ते परस्परांस पुष्टिदायक। करतो आता मासिक श्राध्द भोगणारे पितर। त्यांची गती, पराक्रम, श्राध्दवस्तु वर्णन।।३८।। मृत व्यक्तीचे जन्ममरण फेरे व स्थिती। न जाणू शकती दिव्य महातपस्वी। श्राध्ददेव पितरांस म्हणती लौकिक पितर। अयोनिज, सौम्यदेव, यज्ञकर्ते पितर देवतुल्य।।३९।। देवतुल्य पितरांची पुष्टी म्हणजे सन्मान। करती देवगण, मनुष्य आणि पितृगण। पिता, पितामह, प्रपितामह व सोम यज्ञकर्ते पितर। त्यांना म्हटले जाते सोमवन्त पितर।।४०।। जे जे करती यज्ञ ते ते मृत्युपश्चात। होती बर्हिषद नाम पितृगण। जे करती सदा यज्ञादि सत्कर्मानुष्ठान। पुनर्जन्म मिळेपर्यंत राहती ते तृप्त।।४१।। त्यामध्ये होमपरायण यज्ञाधिकाऱ्यांकडून। यज्ञ करणाऱ्यांस म्हणती अग्निष्वात्त। जे करती आश्रमधर्मविहीत अनुष्ठान। धर्म साम्यामुळे म्हणती त्यांसही अग्निष्वात्त।।४२।। जे करती श्रध्दायुक्त कर्माचे आचरण। तसेच ब्रह्मचर्य, तप, यज्ञ, प्रजोत्पत्ति, श्रध्दा, विद्या, दान। ह्या सात श्रेष्ठ कर्मांमध्ये सदा निरत। मृत्युनंतर त्यांना होत नाहीत कष्ट।।४३।। सोमपान करणाऱ्या सूक्ष्म शरीरधारी देव, पितर। यांच्या सह जाती स्वर्गात आनंदयुक्त। स्वर्गात जाऊन लाभे त्यांना आनंद। करती ते आपल्या पितरांना संतुष्ट।।४४।। असती जे क्रियातत्पर आणि प्रज्ञावंत। तेच लोक असती सिध्द आणि प्रशंसनीय। पितरांसाठी दिले जर दान श्राध्दान्न। यामुळे सोमलोकी राहणारे श्राध्द भोजी पितर।।४५।। राहती एक महिन्यापर्यंत ते तृप्त। अशा

पितरांस म्हणती मास श्राध्दभुक् पितर। हे पितर असती मनुष्यांचे पितर। त्यांच्या खेरीज कर्मानुसार योनिंतून करती भ्रमण।।४६।। आश्रम धर्मभ्रष्ट, स्वधा स्वाहा विमुख। ते दुरात्मा जाती यमपुरीस शरीर नष्ट झाल्यावर। भोगती तेथे यातना भिन्न, भिन्न। त्यावेळी होई आपल्या कर्माचा पश्चाताप।।४७।। दीर्घायु होऊन अतिकृशकाय, वस्त्ररहीत। भटकती सर्वत्र ते तहानभूकेने व्याकुळ। जाती जलास्तव नदी, तलाव विहिरींजवळ। भुकेजलेले ते अन्नाच्या आशेने राहती फिरत।।४८।। टाकती त्यांना नंतर भीषण नरकपुरीत। शाल्मली, वैतरणी कुंभीपाक, असितपत्रवन। करम्भ(तप्त) वाळु, शिला संपेषण नरकात। जाती फेकले ते त्यांच्या कर्मानुसार।।४९।। अशा प्रेतात्म्यांच्या मुक्तीस्तव। कुटुंबीयांनी करुन त्यांचे गोत्रोच्चारण। अपसव्य होऊन जमिनीवर, दर्भावर। करावे त्यांच्यासाठी तीन पिंडांचे दान।।५०।। कुटुंबियांच्या या पिंडदानाने शांती परम। लाभे यातना सहन करणाऱ्या पितरांस। स्वकर्मानुसार पशुस्थावरादि योनित। किंवा नाना जीवश्रेणी वा तिर्यग् योनित।।५१।। असेल जन्म झाला पितरांस प्राप्त। त्यांना श्राध्दामध्ये दिले गेलेले अन्न। त्या योनिंस उपयुक्त आहार रुपात। होतसे प्राप्त त्या त्या पितरांस।।५२।। अशा रितीने सर्वांग परिपूर्ण केलेले श्राध्द। आणि मंत्रपूर्वक श्राध्दात दिलेले पदार्थ। याचे विवेचन, प्रेतांच्या जन्ममृत्युचे ज्ञान। सांगितले सनत्कुमारांनी दिव्य चक्षुने पाहून।।५३।। वह्निक, उष्मपा, दिव्याकीर्त अशी यांची नाम। पितरांसाठी कृष्णपक्ष दिन, शुल्कपक्ष रात्र। हे पितृदेवता, आणि देवपितर। ऋत व आर्तव हे सारे असती एकमेकांचे पितर।।५४।। हे सर्व पितृदेवता आणि जे मानुषपितर। त्यांच्या श्रध्दायुक्त कर्माने व प्रसन्नतेने। सर्व देवपितरसुध्दा राहती सदा प्रसन्न। अशा रीतीने सोमपायी पितरांचेही

असती पितर।।५५।। सांगितले जाते पितरांचे महत्त्व पुराणांत। अशा रीतीने सूर्य, चंद्र, पितर, पुरुरवा स्वर्गगमन। सुधा, अमृताची प्राप्ती, पितरांची तृप्ती। पोर्णिमा, अमावस्या, पितरांचे स्थान।।५६।। असे या सर्वांचे वर्णन बहुविस्तृत। सांगितले येथे सर्व संक्षिप्त स्वरुपात। ऐश्वर्यादिची इच्छा करणाऱ्याने ठेवावा विश्वास। केले आहे मी मनुसृष्टिचे वर्णन।।५७।। सांगितले सारे वायुपुराणातून। पितृमाहात्म्य आणि पितृगण वर्णन। आता सांगतो स्वामीकृपेने हरिवंश पुराणातील। जनमेजय आणि वैशंपायन संवाद।।५८।। जनमेजय पुसती वैशंपायनांस। सूर्यपुत्र यमास का म्हणती श्राध्ददेव। श्राध्दाचे कोणते असे उत्तम विधान। झाली कशी पितरसृष्टी उत्पन्न।।५९।। पितर हे आहेत कोण असती ते स्वर्गी स्थित। म्हणती देवतांचेही देवता असती पितर। पृथ्वीवर केलेले श्राध्द कैसे मिळे तयांस। जाणू इच्छितो मी उत्तम पितृसर्ग।।६०।। वैशंपायनजी म्हणती जनमेजयास। भीष्मांसाठी मार्कण्डेयांनी केले पितृवर्णन। शरशय्येवरील भीष्मांनी कथिले युधिष्ठिरास। जे होते सांगितले सनत्कुमारांनी मार्कण्डेयांस।।६१।। भीष्म म्हणाले करीता श्राध्दाद्वारे पितरांस तृप्त। जो राही पितरांच्या चरणी लीन। राही तो आनंदी सदैव संसारात। मृत्युपश्चात परलोकी लाभे तयास सुख।।६२।। युधिष्ठिराने पूसिले कोणाचे पितर स्वर्गात। कोणाचे पितर भोगती नरकवास। पिता, पितामह, प्रपितामहांस देती पिंड। कैसे प्राप्त होई ते सर्व पितरांस।।६३।। (पिता म्हणजे वडिल, पितामह म्हणजे आजोबा, प्रपितामह म्हणजे पणजोबा) भीष्म म्हणाले सांगतो आता तुज। माझ्या परलोकवासी पित्याने केले वर्णन। एकदा मी स्वतः करीत होतो श्राध्द। पित्यास पिंड देत होतो तेंव्हा झाले अघटित।।६४।। भूमि फाडून आला माझ्या वडिलांचा हात। मागू लागले ते पिंड

आपल्या हातात। होता त्यांचा हात बाजुबंदाने युक्त। जसा मी पाहीला होता ते असताना जीवंत।।६५।। तो हात होता अगदी तसाच विभूषित। पण असे नव्हते लिखित कल्पसूत्रात। कल्पसूत्रानुसार मी पिंड ठेवले दर्भावर। त्या पिंडदानाने झाले पिता संतुष्ट।।६६।। म्हणाले मज '' पुत्रा, तू असशी श्रेष्ठ। असशी तू धर्मज्ञ आणि विद्वान। लाभला मला तुझ्या सारखा पुत्र। झाले माझे दोन्ही लोक कृतार्थ।।६७।। पुत्रा, घेतली मी परीक्षा सहज। व्हावी त्यामुळे धर्मावरी श्रध्दा दृढ। धर्म रक्षिणाऱ्यांस मिळे चतुर्थांश पुण्य। धर्म रक्षण न करणाऱ्यास मिळे तेवढे पाप।।६८।। धर्मासंबंधी राजा मानतसे ज्या प्रमाणिक। प्रजाही मानतसे तेच प्रमाणभूत। प्रजा करीतसे नेहमी राजाचे अनुकरण। म्हणूनच राजाने असावे धर्मनिष्ठ।।६९।। मानलेस तू सनातन धर्मास प्रमाण। तसेच तुझी प्रजाही करील आचरण। प्रजेमध्ये राहील सनातन धर्म प्रतिष्ठित। त्यामुळे झालो मी तुझ्यावर प्रसन्न।।७०।। दिले त्यांनी मज इच्छामरण वरदान। या खेरीज मागून घे आणखी वरदान। भीष्माने पूसले एका प्रश्नाचे उत्तर। असती पितृगण देवतांचे ही देव।।७१।। देवताच असती पितर की दोन्ही भिन्न। कोणाचे बरं करावे आम्ही पूजन। देवता, दानव, मनुष्य, यक्ष, नाग, गंधर्व। किन्नर व महासर्प हे करती कोणाचे पूजन।।७२।। शंतनु म्हणाले तेंव्हा भीष्मांस। स्वर्गस्थ देवता, पितृदेवता हे सर्व। असती ते सारे ब्रह्मदेवांचेच पुत्र। देवता, असुर, मनुष्यादि करती ब्रह्माचे पूजन।।७३।। पितरांना श्राध्द करुन करता तृप्त। देव गंधर्वांसह सर्वांस करती ते तृप्त। श्राध्दाद्वारे पितरांचे करता तर्पण। कामना पूर्ण कर्ते पितर करती कल्याण।।७४।। नाम गोत्रोच्चारणाने करता श्राध्द। लाभे तृप्ती त्याने स्वर्गीय (स्वर्गस्थ)पितरांस। करती ते

पितर सर्व कामना पूर्ण। त्यानंतर शंतनु म्हणाले भीष्मांस।।७५।। आले आहेत मार्कण्डेय श्राध्दास। आहेत ते पितृभक्त व आत्मज्ञान परिपूर्ण। येथे आज येऊन केले मज उपकृत। तेच करतील शंकानिरसन'' झाले शंतनु अंतर्धान।।७६।। नंतर मार्कण्डेय म्हणाले भीष्मांस। पितृकृपेने झालो दीर्घायु, मिळाले उज्वल यश। सांगतो तुज आज एक गोष्ट। करीत होतो जेंव्हा मी मेरुर्पवतावर तप।।७७।। पर्वताच्या उत्तरे कडून आले विमान। त्या विमानात पाहीले मी सिंहसनावर। दीप्त, तेजस्वी, अग्नीत स्थापित। अग्निसम दीप्त अंगुष्ठमात्र एक पुरुष।।७८।। केले नम्र वंदन त्या दिव्य विभुस। पाद्य, अर्घ्य देऊन केले त्यांचे पूजन। आपण झाला नारायणाच्या शुध्द सत्वापासून। आहात आपण देवांचेही देव।।७९।। ते धर्मनिष्ठ मज म्हणाले हसून। तू केले नाहीत तप व्यवस्थित। त्यामुळेच नाही ओळखलेस मज। क्षणार्धात बदलले त्यांनी स्वतःचे रुप।।८०।। म्हणाले मी विभु ब्रह्माचा पुत्र। त्यांच्या तप प्रभावाने झालो उत्पन्न। नारायणाच्या शुध्द सत्व युक्त मम शरीर। मी असे सनत्कुमार नावाने प्रसिध्द।।८१।। अत्रि, क्रतु, वसिष्ठ, पुलह, पुलस्त्य। अंगिरा, मरीची हे ब्रह्माचे मानस पुत्र। हे माझे बंधु परमप्रबल त्यांचा वंश। प्रतिष्ठित देव, गंधर्व करती या सर्वांचे पूजन।।८२।। माझ्या जन्मापासूनच असे मी कुमार। असे बालकासम मी रागद्वेषापासून दूर। म्हणूनच मी सनत्कुमार नाम प्रसिध्द। तुझ्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन झालो प्रकट।।८३।। भीष्मा, श्राध्दफळा विषयीचा माझा संशय। स्वतः देवेश्वरांनीच केला दूर। सांगतो मी तुज तेच वर्णन। केले ब्रह्मदेवाने सृष्टीचे सृजन।।८४।। करतील देवता लोक आपुले पूजन। परंतु देवतांनी ब्रह्माला सोडून केले स्वतःचेच पूजन। ब्रह्मदेवाच्या शापाने झाली त्यांची चेतना नष्ट। ज्ञान नष्ट होऊन

पडला संसार मोहात।।८५।। ब्रह्मास शरण जावून केले क्षमायाचन। लोक कल्याणास्तव ब्रह्मदेव म्हणाले त्यांस। केला पूजेचा व्यतिक्रम करा प्रायश्चित्त। तुमच्या पुत्रांकडून लाभेल तुम्हा ज्ञान।।८६।। दु:खी पितरांनी विचारले पुत्रांस। विचार करुन म्हणाले जितात्मा पुत्र। वाणी, मन, कर्म, नेत्रांनी होई प्रायश्चित। जाणून हे तत्त्व व्हावे तुम्ही सचेत।।८७।। देवांना वाटले झालो पुत्रांकडून अभिशप्त। गेले ते परत ब्रह्मदेवा समीप। म्हणाले ब्रह्मा आहात ब्रह्मवादी म्हणून। असे सर्व योग्य नसे काही अनुचित।।८८।। त्यांच्या शरीर रचनांचे कर्ते तुम्ही देव। ज्ञान प्रदान कराणारे ते तुमचे पितर। झाला देवतांचा सारा संशय नष्ट। आले पुत्रांकडे परस्पर प्रीति युक्त होऊन।।८९।। झाले ते अशारीतीने परस्परांचे पितर। देव म्हणाले श्राध्दात करावे प्रथम पितृपूजन। न करता लाभेल श्राध्दफळ राक्षस, सर्पास। तुम्ही सर्व आहात दिव्य पितर।।९०।। जो मनुष्य करी ऐश्वर्य प्राप्तीस्तव श्राध्द। देती पितर त्यास ऐश्वर्य आणि संतान। सर्वत्र विद्यमान असती पिता,पितामह। प्रपितामह यांचे करावे विधिपूर्वक श्राध्द।।९१।। पिता, पितामह, प्रपितामह हे पितर। यांच्या गोत्रांचे करुनी उच्चारण। देई जो श्रध्दापूर्वक तीन पिंड। त्या श्राध्दाने होती त्याचे पितृगण तृप्त।।९२।। श्राध्दामुळे प्रसन्न झालेले पितर। देती सदा वृध्दि श्राध्द करणाऱ्यास। म्हणूनच विधिपूर्वक करावे श्राध्द। पितरांच्या कृपेने होई जीवन समृध्द।।९३।। तुमच्या द्वारा श्राध्दांनी परिपुष्ट पितर। करतील देव सोमवृध्दि होऊन तृप्त। श्राध्दांनी तृप्त चंद्र, समुद्र, पर्वत, वन। सर्व चराचरास करतील हे तृप्त।।९४।। किती असती पितृगण, कुठे ते प्रतिष्ठित। सांगितले सनत्कुमारांनी सात पितृगण। चार मूर्तिमान आणि तीन मूर्तिरहीत। धर्ममयी शरीरधारी पितरांचे तीन गण।।९५।।

(सुकाल,अंगिरस,सुस्वधा,आणि सोमपा हे चार मूर्तिमान आहेत। असे प्राप्त यांना दिव्य शरीर। वैराज, अग्निष्वात्त बर्हिषद हे तीन अमूर्त आहेत. (नीलकण्ठी मधून)) सनातन नावाचे दिव्य असती प्रजापति पुत्र। विराजपुत्र म्हणून ते वैराज नामे प्रसिध्द। शास्त्रोक्त विधीने देव करती यांचे पूजन। योगभ्रष्ट असल्यामुळे युगान्तीत न होती मुक्त।।९६।। दुसऱ्या कल्पामध्ये ब्रह्मवादी मुनिरुपात। होती ते प्रकट, असे त्यांना पूर्व स्मृति। करती उत्तम सांख्ययोगाचे अनुष्ठान। त्यामुळे मिळे जन्ममृत्यु रहीत योगगती।।९७।। जे करती प्रथम योगबळाने सोमास पुष्ट। तेच पितर असती योगियांचे योगवर्धक। म्हणून यांच्यासाठी करावे विशेष श्राध्द। असे हाच सोमपा पितरांचा प्रथम सर्ग।।९८।। सांगितले तुम्हास पितृगण महत्त्व। होता प्रसन्न पितर देती ऐश्वर्य सुख। निष्ठेने आदरपूर्वक करावे पितृपूजन। लाभे पितरांस पुष्टी करीता तर्पण।।९९।। (तर्पण - पितरांचे नामगोत्रोच्चारण करुन त्यांच्यासाठी अपसव्य होऊन हातावर जल घेऊन ते वसु,रुद्र आदित्य स्वरुप म्हणून प्रत्येकी तीन वेळा पाणी ताम्हणात सोडावे) स्वामींच्या कृपेने केले असे वर्णन। असे हे सारे हरिवंश पर्वावर आधारित।पितृगण माहात्म्य असे पुराणांत। दिसून येते त्यावर्णनांत साधर्म्य।।१००।।

श्री पितृदेवता चरणार्पणमस्तु। मी स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय नववा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री पितृदेवताय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

विघ्नहर्त्या गजाननास करुन नमन। करीती या नवव्या अध्यायाचे लेखन। देऊनी त्याने मज पूर्ण आशीर्वचन। करवावे पूर्ण मम हस्ते हे कार्य पूर्ण।।१।। सर्वांतर्यामी श्रीकृष्ण सर्वत्र स्थित। भक्तवत्सल तोच येई सर्व रुपात पितर हे ही त्या कृष्णाचेच रुप। श्रीकृष्ण श्रीकृष्ण म्हणता होती पितर तृप्त।।२।। श्राध्द प्राप्त होई फक्त पितृरुपात। परी ज्यांना न लाभला पितृलोक। असती ते प्रेतात्मा रुपात अतृप्त। त्यांच्यामुळे व्याप, ताप, पिडा होतात।।३।। श्रध्देने पितरांसाठी केले जाते। म्हणूनच यास श्राध्द असे म्हटले जाते। (श्रध्दया दीयते - क्रीयते इति श्राध्दम्) और्ध्वदैविक, सांवत्सरिक। एकोद्दिष्ट, पार्वण व तीर्थश्राध्द।।४।। असती असे श्राध्दाचे पाच प्रकार। विशेष इच्छापूर्तीसाठीही करती श्राध्द। म्हणती या श्राध्दास काम्य श्राध्द। नारायणबली नागबली त्रिपिंडी ही काम्य।।५।। श्राध्द केल्याने पितरांस स्वर्गलोक। होई त्यांना उत्तम गती प्राप्त। ज्यांना नसे पुत्र नाही श्राध्द। होत नाही का त्यांचा उध्दार।।६।। हे म्हणणे असे पूर्णतः अयोग्य। लक्षात ठेवा येथे यमराज आदेश। ‘करी जो नामस्मरण’ न आणावे यमपुरीस। म्हणून नामस्मरण करावे नित्य।।७।। पिता पूर्वज मृत्यु झाल्यावर क्रियाकर्म। शास्त्रोक्त विधिने करणेच योग्य। पण न झाल्यास असे संक्षिप्त विधान। पंधरा दिवसानंतर होऊन

निवृत्त।।८।। एक ताट जलाने भरुन मिसळावे दूध। मिसळावे त्यात जवस व काळे तीळ। दोन्ही अंगठ्यांमध्ये घेऊन दर्भ। या जलाने अंजली द्यावी देवांस व सूर्यास।।९।। नाही तर पूर्वजांस्तव एकादशी व्रत। ईश्वर स्मरण करुन करावे श्रध्दापूर्वक। करावे व्रताचे फळ पितरांस अर्पण। एवढ्यानेही पितर होती तृप्त।।१०।। सांगतो आता त्रिपिंडी श्राध्द। त्रिपिंडी असे हे काम्य श्राध्द। सतत तीनवर्षे नाही झाले श्राध्द। प्राप्त होते पितरांस प्रेतत्व।।११।। असे असता करावे त्रिपिंडी श्राध्द। अमावस्या तिथी पितरांची यास योग्य। नवरात्र व भाद्रपद कृष्णपक्षात। करु नये कधीही त्रिपिंडी श्राध्द।।१२।। असती तीन प्रकारच्या प्रेतयोनी। तमोगुणी, रजोगुणी, आणि सत्त्वगुणी। पृथ्वीवरील पिशाच्चे तमोगुणी। अंतरिक्षातील रजोगुणी, वायुमंडलावरील सत्त्वगुणी।।१३।। तिन्ही प्रेतयोनीतील पिशाच्चांच्या। पीडा परिहार करण्यासाठी। केले जाते श्राध्द त्रिपिंडी। होऊन पीडा दूर लाभे त्या सद्गती।।१४।। श्रावण, कार्तिक,पौष, माघ। फाल्गुन, वैशाख मासांच्या शुक्ल व कृष्ण। पंचमी, अष्टमी,एकादशी, त्रयोदशी। चर्तुदशी, अमावस्या तिथीस करावे हे श्राध्द।।१५।। १६ सप्टेंबर ते १५ नोव्हेंबर या दिनांस। असे रविग्रह कन्या व तुळ राशित। या काळात पितर करती पृथ्वीवर वास। असे हा काळ त्रिपिंडीस प्रशस्त।।१६।। असे कथिले गोदायात्रा विवेकादर्श ग्रंथात। जास्त त्रास असता करावे ताबडतोब। तैसेची सांगितले असे या ग्रंथात। त्र्यंबकेश्वर क्षेत्रीच करावे त्रिपिंडी श्राध्द।।१७।। त्र्यंबकेश्वर क्षेत्री केंव्हाही करावे हे श्राध्द। त्र्यंबकेश्वरास महेश्वर म्हणे कालिदास। करावे हे श्राध्द कुशावर्त तीर्था समीप। किंवा करावे पिशाच्च विमोचन तीर्थात।।१८।। या श्राध्दात ब्रह्मा,विष्णु व महेश। यांचे करती प्राणप्रतिष्ठा पूर्वक पूजन।

प्रेतयोनीतील जीवात्म्यास उद्देशून। केले जाते हे त्रिपिंडी श्राध्द।।१९।। असे त्रिपिंडी एकोद्दिष्ट प्रेतश्राध्द। जाणकाराकडून करवावे एक तंत्रेण। शास्त्रात सांगितल्या विधी प्रमाणेच। करावे श्रध्दापूर्वक त्रिपिंडी श्राध्द।।२०।। या खेरीज नारायणबली, नागबली। दोन्ही असती काम्यविधी म्हणून प्रसिध्द। संतान प्राप्तीस्तव आणि प्रेतपिडानाशास्तव। केले जाती हे विधी श्रध्दापूर्वक।।२१।। ज्या व्यक्तींना दुर्भरण झाले प्राप्त। करती ते घराण्यात पीडा उत्पन्न। त्यांच्या पिडेचे निवारण करण्यास्तव। 'काम्य नारायणबली' सांगितला शास्त्रात।।२२।। असती काही पूर्वजन्मीचे प्रेतशाप। पितृशाप तैसेच असती सर्पशाप। शापांमुळे उद्भव असे स्त्रीपुरुषांस। विविध शापसूचक स्वप्नांचा त्रास।।२३।। अशा स्वप्नांचा व्हावा परिहार। त्यामुळे होणाऱ्या बाधेचे निवारण। करण्यासाठी सांगितला शास्त्रात। नारायणबली - नागबली हा विधी।।२४।। सर्पयोनी व मानवाचा अतिनिकट संबंध। सांगितले असे हे महाभारतात। मरीची ऋषींचा पुत्र होता काश्यप। होत्या दोन पत्नी या ऋषीस।।२५।। कद्रू आणि विनिता अशी नाम। कद्रुचे पुत्र सर्प तर विनितेचा गरुड। असा मानव आणि नागयोनी संबंध। असे दोघांचेही उत्पत्तीशी साम्य।।२६।। असे सांगितले योगशास्त्रात। असे कुंडलिनी मानवाच्या देहात। करती याचे वर्णन ज्ञानेश्वर महाराज। पाठीच्या कण्याच्या प्रारंभ स्थानात।।२७।। मूलाधार चक्रात कुंडलिनीचे स्थान। तिच्यामुळेच प्राप्त होई ब्रह्मज्ञान। कुंडलीनीनेच होत असे जीवात्म्यैक्य। लाभे त्यामुळेच मानवास मनुष्यत्व।।२८।। कुंडलिनीनेच होतसे सम्यक् ज्ञान। होई मानवाची वैज्ञानिकता पूर्ण। कुंडलिनीचीच संज्ञा असे सर्प नाम। कुंडलिनी आणि सर्प ह्या अवस्था एकच।।२९।। मानवाची उत्पत्ति कुंडलिनी पासून। म्हणून असती कुंडलिनी

व सर्प एकच। शास्त्रकारांनी हे घेऊनी लक्षात। ठेवले असे सर्पाच्या क्रियेचे विधान।।३०।। झाल्या जर भौतिक वासना तीव्र। जाई मानव कुंडलिनी स्वरुप सर्प योनीत। नागबली केल्याने नागहत्त्येचे पाप। नष्ट होऊन सद्गती होते प्राप्त।।३१।। तंत्रशास्त्रात असे 'वाममार्ग'नाम। म्हणती यालाच अभिचार योग। यामध्येच जारण - मारण - उच्चाटन। इत्यादि क्रिया केल्या जातात।।३२।। या अभिचार योगामुळेच जीवास। शरीरपीडा, अनापत्यता प्राप्त। नारायण - नागबलीनेच यांचा परिहार। असे हा अनुभव अनेक लोकांस।।३३।। असे जोतिषशास्त्र हे विज्ञाननिष्ठ। मानवी जीवनाचा केला असे विचार। जन्मकुंडलिवरुन कळती ग्रहसंकेत। त्यांचा परामर्श घेऊन सांगती उपाय।।३४।। असे 'बृहद् पराशर होराशास्त्रम्' ग्रंथ। असे त्यात 'पूर्वजन्मशापद्योतकाध्याय'। सांगितला त्यात ग्रहयोग परामर्श। सांगितले असे विविध पीडा निवारण।।३५।। ग्रहयोगावरुन कळे सर्पशाप, पितृशाप। अनापत्य योग, पीडांचे कारण। त्या पीडांचा परिहार करण्यास। सूचविले त्यात विविध उपाय।।३६।। जन्म कुंडलीतील कोणता ग्रहयोग। करीतसे जीवास सर्पशाप। सांगती पराशरऋषी दोष परिहार। करावा त्यासाठी नागबली उपाय।।३७।। पितृशापाचेही सांगितले विविधयोग। पितृशापाचा करण्या परिहार। नारायण नागबली आणि गयाश्राध्द। त्यामुळे होतसे पितृशाप परिहार।।३८।। गयाश्राध्दासाठी नसे आवश्यक। गयातीर्थास जाऊन करणे श्राध्द। केले जाते त्र्यंबकेश्वरास गयाश्राध्द। त्र्यंबकेश्वरास असे 'रुद्रगया 'नाम।।३९।। असेल जर एखाद्यास प्रेतशापत्रास। करावा त्याने नारायण - नागबली उपाय। अशा माणसाने करावे विष्णुश्राध्द। रुद्राभिषेक करुन द्यावे ब्रह्माच्या मूर्तीचे दान।।४०।। अभिचार योगाने

असता संतती प्रतिबंध। करावा त्याने नारायणनागबली उपाय। याबरोबरच करावे त्याने त्रिपिंडी श्राध्द। होईल त्यामुळे अभिचार योग परिहार।।४१।। काहीवेळा असे पत्रिकेत पिशाच बाधा योग। यामध्ये होतसे प्रेतात्म्यापासून त्रास। ह्याबाधेचे निवारण होण्यास्तव। पुत्तल विधीसह नारायण नागबली उपाय।।४२।। नारायण नागबली हा असे उपाय। सर्व जाती जमातीस असे याचा अधिकार। आई - वडिल जीवंत असताही हा उपाय। येई करता तो पीडा निवारणास्तव।।४३।। घरात झाले असता मंगलकार्य। करु नये हा विधी एक वर्षापर्यंत। माता किंवा पित्याचे झाले असता निधन। करावा हा विधी एक वर्षानंतरच।।४४।। सांगतो आता हा विधी करण्यास। कोणता असे चांगला मुहूर्त। गुरु - शुक्र ग्रहांचा असता अस्त। पौष किंवा मलमासात करु नये हा विधी।।४५।। 'निर्णय - सिंधू' ग्रंथात असे स्वतंत्र निर्णय। सांगती पहावा फक्त नक्षत्रगुणदोष। असती वर्ज्ये हा विधी करण्यास। धनिष्ठापंचक आणि त्रिपाद नक्षत्रे।।४६।। (धनिष्ठा पंचक - धनिष्ठा नक्षत्राची शेवटची दोन चरणे, शततारका, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा व रेवती या साडेचार नक्षत्रांना 'धनिष्ठा पंचक' म्हणतात. त्रिपाद नक्षत्रे - कृत्तिका, पुनर्वसु, उत्तरा, विशाखा, उत्तराषाढा व पूर्वाभाद्रपदा या नक्षत्रांना त्रिपाद नक्षत्रे असे म्हणतात.) संतती प्राप्तीस्तव हा विधी करण्यास। श्रवण नक्षत्रावर करावा विधीचा प्रारंभ। तसेच दोन्ही पक्षातील पंचमी व एकादशी। मानली जाती या विधीसाठी श्रेष्ठ।।४७।। हस्त, पुष्य, आश्लेषा, मृग, आर्द्रा। स्वाती, मूळ यापैकी कोणतेही असे प्रशस्त। रविवार, सोमवार आणि गुरुवार। असती ह्या विधीच्या प्रारंभास उत्तम।।४८।। मनुष्यमात्रास त्रासदायक कालसर्पयोग। याची मिमांसा करताना म्हणती पराशर। रवि, शनि व मंगळ हे पापग्रह केंद्रस्थानात।

शुभग्रह असती केंद्रस्थान व्यतिरिक्त।।४९।। त्यामुळे निर्माण होतो 'सर्पयोग'। होई हा योग अतिशय त्रासदायक। 'बृहत् जातक नाम संयोग' ग्रंथात। सांगती वराह मिहीर सर्पयोग।।५०।। कल्याणवर्मा म्हणती सारावली ग्रंथात। केंद्रत्रिकोणवेष्टित पापग्रह करती सर्पयोग। राहू असे सर्प म्हणे ज्योतिषशास्त्र। त्या सर्पाचे शेपूट असे केतू ग्रह।।५१।। कुंडलीमध्ये जर असती सर्वग्रह। तोंडराहू आणि शेपटी केतू यांच्यात। या ग्रहस्थितीमुळे होई कालसर्पयोग। कालसर्पयोग असे सर्पयोगाचेच रुप।।५२।। या योगामुळे अल्पायुत्व, आर्थिक संकट। संघर्षमय जीवन अशी फळे मिळतात। या दोषाचा त्रिपिंडी श्राध्द। नारायण नागबली त्र्यंबकेश्वरास करावा।।५३।। असे महत्त्व नारायण नागबली विधीस। श्रध्देने करता होते पीडानिवारण। या विधीमध्ये असे प्रत्यक्ष नारायण। तैसेच सापास दिले असे येथे स्थान।।५४।। पितर निवास करती विविध लोकात। अपेक्षिती ते तर्पण श्राध्दरुपात। पुत्रांकडून मिळावे भक्तिपूर्वक अन्न, जल। यासाठीच केली जाती विविध श्राध्द।।५५।। सांगतो आता श्राध्दाचे विविध प्रकार। असती वर्णिले पूर्वीच्या अध्यायातून। परंतु सविस्तर स्पष्ट व्हावे ज्ञान। म्हणून दिले असती विविध ग्रंथातून।।५६।। विविध पुराणे वर्णिती पितृमाहात्म्य। असे वर्णिले विविध स्मृती ग्रंथात। मनुने केले पितृवर्णनादि मनुस्मृतीत। याज्ञवल्क्य स्मृतीतही दिले विस्तृत।।५७।। सांगतो तेच येथे पुन्हा संक्षिप्त। घ्यावे जाणून सर्वांनी व्यवस्थित। वर्णिले श्राध्दविधी आणि प्रकार। त्यांचे विधिविधान आधीच्या अध्यायांतून।।५८।। असती श्राध्दाचे प्रकार अनेक। पार्वण, एकोद्दिष्ट, नवश्राध्द, सपिंडीकरण। पार्वण श्राध्दाचा समय, विधी विधान। केले असे वर्णन पूर्वीच सविस्तृत।।५९।। केवळ मृत मनुष्यासाठी केलेले एकोद्दिष्ट। होई हे श्राध्द

संपन्न विश्वेदेवरहीत। नसे या मध्ये अग्नौकरण होम। केवळ अपसव्यानेच होते एकोद्दिष्ट श्राध्द।।६०।। मृत मनुष्याची प्रथम, तृतीय। सप्तम, नवम व अकराव्या दिवशी नवश्राध्द। नवश्राध्दांची गणना होई एकोद्दिष्टात। एकोद्दिष्टाचे असती तीन भेद।।६१।। अकराव्या दिवसा पर्यंतचे एकोद्दिष्ट 'नवश्राध्द'। अकराव्या दिवसापासून होणारे 'मासिकश्राध्द'। या श्राध्दास म्हणती'मिश्रश्राध्द'। नंतर होणारे वार्षिकादि एकोद्दिष्टास म्हणती 'पुराण'।।६२।। सांगतो आता सपिंडीकरणा विषयी। केव्हा केले जाते ते विशेषी। करावे वर्षान्तराते ऐसे मानताती। सपिण्ड करणाने होई जीवाची प्रेतनिवृत्ती।।६३।। होता प्रेतनिवृत्ती होई पितृत्वप्राप्ती। येई संबंध वसु, रुद्र, आदित्य या देवतांशी। पिता गेल्यावर पितामह किंवा प्रपितामह। असता जीवंत मृताचा संबंध पूर्व मृत पितरांशी।।६४।। संतती नसलेला, गोब्राह्मण संबधाने। आल्या मरण करु नये त्यांचे सपिंडीकरण। त्याच्या प्रेतत्त्व निवृत्यर्थ नारायणबली। करण्याचे सांगितले असे शास्त्रात।।६५।। सपिंडीकरणाचा अधिकार असे ज्येष्ठास। तो नसता प्राप्त होई क्रमाने इतरांस। परंतु असेही काही मानतात। पुत्राखेरीज इतरांनी करु नये सपिंडीकरण।।६६।। मातेचे सपिंडीकरण करत असता। करावा पित्याच्या गोत्राने उच्चार। कुलाचार देशाचारास अनुसरुन। करावा पतीचा किंवा पित्याचा गोत्रोच्चार।।६७।। मातेचे सपिंडीकरण पितामहीशी। किंवा पित्याशी किंवा मातामहाशी। असे असले तरी अन्वष्टका, गयादि। श्राध्द प्रसंगी करावे मातेचे श्राध्द पृथक्।।६८।। (अष्टका - प्रत्येक महिन्याची सप्तमी, अष्टमी, नवमी तिथी तसेच पौष, माघ आणि फाल्गुनची कृष्ण अष्टमी या तिथींना अष्टका म्हणतात.) मातामहाशी केले जर मातेचे सपिंडीकरण। करावेच लागते मातामहाचे

श्राध्द। तसे नसता मातामहाचे श्राध्द। केले तरी किंवा नाही केले तरी चालते।।६९।। सपिंडीकरण वर्ष पूर्ण झाल्यावर। किंवा वर्ष पूर्ण होण्यापूर्वीही करतात। आश्वलायन व कात्यायनांच्या मतानुसार। सपिंडी करणाचे असती चार पक्ष।।७०।। द्वादशाह, त्रिपक्ष, वृध्दी प्राप्ती। वर्ष समाप्ती असे चार पक्ष असती। अग्निहोत्रीने करावे बाराव्या दिवशी। कारण त्याशिवाय पिंडपितृयज्ञ करता येत नाही।।७१।। अग्निहोत्री खेरीज इतरांनी तीन महिन्यांनी। अथवा असता मंगलकार्य घरी। करावे सपिंडीकरण वर्ष होण्यापूर्वी। परंतु तत्पूर्वी षोडश श्राध्दे करावी।।७२।। ही सर्व श्राध्दे एकोद्दिष्ट करावी। सपिंडीकरणानंतर करणे योग्य नाही। बारा मासांची बारा,ऊनमासिक, त्रैमासिक। ऊनषण्मासीक, ऊनाब्दिक अशी सोळा।।७३।। असती श्राध्दाचे विविध प्रकार। नित्य, नैमित्तिक आणि काम्य श्राध्द। काहींच्या मते पार्वण व एकोद्दिष्ट दोन प्रकार। काही मानती त्यांचे प्रकार पाच।।७४।। अहरह:श्राध्द, पार्वणश्राध्द, वृध्दिश्राध्द। एकोद्दिष्ट आणि सपिंडीकरण। अहरह श्राध्द म्हणजे 'अन्नं'पितृमनुष्येभ्यो। पितर व मनुष्यास प्रत्यह द्यावे अन्न।।७५।।(प्रत्यहम् - प्रत्येक दिवशी, अन्न नसता कंद - फल - मूळ व तेही नसता जल तरी अवश्य समर्पण करावे) आता सांगतो असे श्राध्द प्रकार। असती जे आजही प्रचलीत। दिले ते श्राध्दमार्तण्ड ग्रंथात। असती ते सर्व मिळून बावीस।।७६।। प्रतिसांवत्सरिक केले पूर्वी वर्णित। दुसरे असे दर्शश्राध्द वर्णित। करती हे चतुर्दशीस सांय होमानंतर। किंवा अमावस्येस प्रातर्होमा नंतर।।७७।। दर्शश्राध्दासाठी विश्वे देवासाठी दोन। पितरांसाठी तीन, मातामहांसाठी तीन। असे एकूण आठ किंवा प्रत्येकास तीन। ब्राह्मण बोलवून करावे विधीवत।।७८।। तिसरे मातृश्राध्द असे सांवत्सरिका सम।

चौथे असे विप्रैकत्वे दर्भवटौ श्राध्द। या श्राध्दात पीठावर आधी शाळीग्राम। शिवलिंग किंवा दोन्हीही स्थापन करावेत।।७९।। नंतर पितरांस्तव निमंत्रित ब्राह्मणास। दक्षिणाभिमुख बसवून करावे श्राध्द। पाचवे असे आमश्राध्द, केले जाते हे संकटसमयी, प्रवासात, तीर्थस्थानी।।८०।। अग्नि नसता किंवा पत्नी रजस्वला असता। विप्रांना पूर्व निमंत्रणविधी न करता। पूर्वाभिमुख होऊन कर्त्याने पितृनाम। देशकाल इत्यादि उच्चारुन करावे हे श्राध्द।।८१।। आमश्राध्दाप्रमाणे हिरण्याश्राध्द प्रकार। आमश्राध्दाप्रमाणे करावे सुवर्णदान देऊन। (आमश्राध्द - हे श्राध्द करताना ब्राह्मणाला शिधा म्हणजे पाच प्रकारचे धान्यादि पदार्थ दिले जातात.) सातवा प्रकार असे सांकल्पिकश्राध्द। करावे यथाप्रकार ब्राह्मणास बोलावून।।८२।। संकल्पात देशकाल पितृनाम उच्चारुन। करावे साकल्पिक विधीने अन्न, हवि, देऊन सुवर्ण। आठवा प्रकार असे ब्रह्मार्पण विधी श्राध्द। या श्राध्दात देशकाल पितृनाम उच्चारुन।।८३।। 'ब्रह्मार्पणविधीने श्राध्द करतो' असे म्हणावे। श्राध्द संपन्न करण्याची ही पध्दत। नववा प्रकार पिंडप्रदान मात्र श्राध्द। देशादि नामोच्चारण करुन पिंडप्रदान विधीने करावे।।८४।। दहावा प्रकार एकोद्दिष्ट हे असे पूर्ववर्णित। अकरावा प्रकार सन्यासींचे श्राध्द। या श्राध्दात गोत्रादि उच्चारताना म्हणावे ब्रह्मीभूत। पार्वण श्राध्दाप्रमाणे परंतु ब्रह्मीभूत म्हणून।।८५।। बारावा प्रकार असे विधवा कर्तृक श्राध्द। या मध्ये विधवेने यथाप्रकार करावा संकल्प। करावे यथाप्रकार ब्राह्मण निमंत्रित। एखाद्या ब्राह्मणास करावे ऋत्विक।।८६।। 'माझ्या विनंतीने श्राध्दविधी करावा' असे म्हणून। श्राध्दविधी करवावा ब्राह्मणांकडून। अनुपनीतादि कर्तृक हा एक श्राध्द प्रकार। अनुपनीताने विधवा श्राध्दा प्रमाणे करावे

श्राध्द।।८७।। महालय श्राध्द असे चौदावा प्रकार। केले जाते अपराह्णकाली हे श्राध्द। यथाविधी करावे विप्रनिमंत्रण। श्राध्द संकल्पात करावा पित्याचा गोत्रोच्चार।।८८।। त्याबरोबरच आत्या, काका याप्रमाणे। मामा मावशी इत्यादिनाही द्यावे तर्पण। सर्व पितर ज्ञान,अज्ञात बांधव। आपले विद्यागुरु, मोक्षगुरुंनाही द्यावे तर्पण।।८९।। पंधरावा प्रकार असे नित्यश्राध्द। नित्यश्राध्द म्हणजेच असे ब्रह्मयज्ञ। यामध्येही कुलनाम गोत्र उच्चार करुन। सर्व पितरांना स्मरुन द्यावे तर्पण।।९०।। अविधवा नवमी असे सोळावा प्रकार। संकल्पात धूरिलोचन विश्वेदेवाचे करुन स्मरण। तैसेची माता, पितामही, प्रपितामही। यांच्यास्तव 'अविधवा नवमी श्राध्द करतो'म्हणावे।।९१।। (माता - आई, पितामही - वडिलांची आई, प्रपितामही - वडिलांची आजी) उर्वरीत सर्वविधी पार्वण श्राध्दाप्रमाणेच। याश्राध्दात सुवासिनीस द्यावे भोजन। वस्त्र दक्षिणादिने करुनी तिचा सत्कार। श्रध्दापूर्वक करावा यथोचित सन्मान।।९२।। भाद्रपद कृष्ण द्वादशीस संन्यास्यांचे महालय(१७ वा प्रकार)। संकल्पात ब्रह्मीभूत म्हणून करावे हे श्राध्द। भाद्रपद कृष्ण चतुर्दशीस शस्त्रादिहतांचे श्राध्द(१८वा प्रकार)। अश्विन प्रतिप्रदेस करावे मातामह श्राध्द(१९वा प्रकार)।।९३।। यात्रेस प्रारंभ करण्यापूर्वी करावे घृतश्राध्द(घृतश्राध्द २०वा प्रकार)। या श्राध्दात महत्त्वाचा तुपाचा उपयोग। तीर्थश्राध्द प्रकाराविषयी केले पूर्वीच विवेचन। वर्षभरात प्रतिकाळी केलेली षण्ण्वतीश्राध्द।।९४।। (अशी एकूण बावीस श्राध्द) (षण्णवती - श्राध्दविधीसाठी दिलेल्या काळाप्रमाणे वर्षभरात एकूण षहाण्णव श्राध्द होतात) असे आजचे जीवन गतीमान। असे सर्वच सरमिसळ प्रत्येकाच्या जीवनात। तरी सुध्दा करावे परंपरांचे पालन। जमेल त्याप्रमाणे करावे वेळ

काढून।।९५।। धर्माचे पालन असे प्रथम कर्तव्य। त्यानेच सफल होतसे गृहस्थाश्रम। नाहीतर विविध समस्या उद्‌भवून। होई विविधत्रासांनी जीवन व्याप्त।।९६।। पितर हे सुध्दा देवाचेच रुप। वसु, रुद्र, आदित्य पितरांचीच रुप। श्राध्दादि कर्मांनी करावे तीलजलार्पण। पितृयज्ञाचे या करावे पालन।।९७।। यासाठीच स्वामींनी आज्ञा देऊन। करविले असे या नवशतीचे लेखन। करावे पठण भक्तिभाव पूर्वक। त्याप्रमाणेच पितृतिथीस करावे श्राध्द।।९८।। नसले साध्य करणे विधीपूर्वक। करावे श्राध्द संक्षिप्त स्वरुपात। नसे श्राध्दासाठी बाकी विधान आवश्यक। संकल्प श्राध्दानेही होती पितर तृप्त।।९९।। करावे प्रतिदिवशी पितृस्मरण। निदान करावे त्यांच्या तिथीस तर्पण। असती पितर शांत, अल्पसंतुष्ट। देती आशीर्वचन होऊनी तृप्त।।१००।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री पितृस्तोत्र।।

।। श्री गणेशाय नमः।।

सकलपूजित अमूर्त तेजस्वी प्रखर। ध्यानमूर्ति जयांचे अलौकिक नेत्र। असती सदा वन्दित पूज्य पितृगण। करीतो तयांसी वंदन विनम्र।।१।। इंद्रादि देवतांचे अग्रणी असलेल। दक्ष, मारिचादिंना वंदनीय जे। कामदायक केले ज्यांस सप्तर्षिनी वंदन। अशा या पितरांना करीतो वंदन।। मनु इत्यादि सर्व मुनिश्रेष्ठांना। सूर्य चंद्रांचे प्रमुख असलेल्या। सर्व जल, नदी, सागरादिंना। वंदनीय पितरांना असो माझे नमन।।३।। नक्षत्र, ग्रह इत्यादिंचे प्रमुख। वायु, अग्नि आकाशांचे नेता। पूज्य ते स्वर्ग, पृथ्वी लोकांना। त्या पितरांना हात जोडून करीतो वंदन।४।। देवर्षीचे ही जे जनक। सर्व लोकांनी नमस्कार केलेले पितृगण। अक्षय स्वरुपी असती जे पितर। दानशूर अशा त्यांना करीतो वंदन।।५।। प्रजापति ब्रह्मदेवाने केले सृजित। कश्यप, सोम, वरुण रुपातील सर्व। स्वतः योगेश्वर असलेले पितर। त्यांना हात जोडून करीतो वंदन।।६।। नमस्कार माझा असे सातहीगणांना। सप्त लोक निवासी असणाऱ्यांना। स्वयंभुक, योगचक्षुयुत ब्रह्माला। भावपूर्वक करीतो विनम्र वंदन।।७।। सोमस्वरुप धारण करणाऱ्या साक्षात। योगमूर्ति असणाऱ्या। त्याचप्रमाणे अखिल जगाचे पितर असणाऱ्या। सोमरुपी पितरांना करीतो नमन।।८।। अग्निरुप धारण करणाऱ्या। त्याचप्रमाणे अन्यरुपात असणाऱ्या। सर्व आदरणीय पूज्य पितरांना। करीतो नमस्कार होऊनी विनम्र।।९।। सर्व अग्नि सोममय अशेष। व्यापिले असे ज्यांनी सर्व विश्व। असती जे तेजस्वी अतिशय। सोमाग्नि मूर्ति पितरांना माझे वंदन।।१०।। असे जयांचे अखिल विश्वरुप। तसेच

असती जे ब्रह्मस्वरुप। असे जे सर्व योगिश्रेष्ठ। अशा पितरांना मनःपूर्वक नमन।।११।। हे पितृगण हो असा जगत्स्वरुप। दानशून तुम्ही सदा वरदायक। स्वधाचे भोक्ते तुम्ही पितर। करीतो पुनः पुनः वंदन व्हावे प्रसन्न।।१२।। आमचे निर्माते आम्हास घडविणारे। आम्ही सर्वांना सदा सांभाळणारे। असा साक्षात दयाघन तुम्ही पितर। करीतो तुम्हासी विनम्र वंदन।।१३।। होउुनी प्रसन्न द्यावे वरदान। सावरावे तुम्हीच आमुचे जीवन। प्रातः स्मरणीय, पूजनीय पितर। असावे तुम्ही आम्हावरी नित्य प्रसन्न।।१४।।

श्री पितृदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

।। श्री गणेशाय नमः।।

।। पितृगीतम्।।

मार्कण्डेय उवाच

अपि धन्यः कुले जायादस्माकं मतिमान्नरः।
अकुर्वन् वित्तशाढ्यं यः पिण्डान्नो निर्वपिष्यति।।१।।५०
रत्नवस्त्रमहायानं सर्वतोयादिकं वसु।
विभवे सति विप्रेभ्यः अस्मानुद्दिश्य दास्यति।।२।।५१
अन्नेन वान्यथाशक्त्या कालेऽस्मिन् भक्तिनम्रधीः।
भोजयिष्यति विप्राग्र्यांस्तन्मात्रविभवो नरः।।३।।५२
असमर्थोऽन्नदानस्य वन्यशाकं स्वशक्तितः।
प्रदास्यति द्विजाग्र्येभ्यः स्वल्पां यो वापि दक्षिणाम्।।४।। ५३
तत्राप्यसामर्थ्ययुतः करैर्गृह्यासितांस्तिलान्।
प्रणम्य द्विजमुख्याय कस्मैचिदपि दास्यति।।५।।५४
तिलैस्सप्ताष्टभिर्वापि समवेतं जलाञ्जलिम्।
भक्तिनम्रः समुद्दिश्य योऽस्माकं सम्प्रदास्यति।।६।।५५

यतः कुतश्चित्सम्प्राप्य गोभ्यो वापि गवाह्निकम्।
अभावे प्रीणयेत्तस्माद्भक्त्या युक्तः प्रदास्यति।।७।।५६
सर्वाभावे वनं गत्वा कक्षमूलप्रदर्शकः।
सूर्यादिलोकपालानामिदमुच्चैः पठिष्यति।।८।।५७
न मेऽस्ति वित्तं न धनं न चान्यच्छ्राध्दस्य योग्यं स्वपितृन्नतोऽस्मि।
तृप्यन्तु भक्त्या पितरौ मयैतौ भुजौ ततौ वर्त्मनि मारुतस्य।।९।।५८
इत्येवं पितृभिर्गीतं भावाभावप्रयोजनम्।
कृतं तेन भवेच्छ्राध्दं एवं कुरुते द्विजः।।१०।।
इति वराहपुराणे आदिकृतवृत्तन्ते श्राध्दकल्पो नाम त्रयोदशोऽध्यायः
पितृगीतम् समाप्तम्

## बाहय शांती सूक्त

श्री स्वामी समर्थ

नमो वः पितरो, यच्छिव तस्मै नमो, वः पितरो यत् स्योन तस्मै।नमो वः पितरः,स्वधा वः पितरः।।१।। नमोऽस्तु ते निर्ऋते, तिग्म- तेजोऽमस्ययान विचृता बन्ध-पाशान्। यमो महयं पुनरित् त्वां ददाति। तस्मै यमाय नमोऽस्तु मृत्युवे।।२।। नमोऽस्वसिताय नमस्तिरश्चिराजये। स्वजाय बभ्रवे नमो नमो देव-जनेभ्यः।।३।। नमः शीताय, तक्मने, रुराय शोजिषे कृणोमि। यो अन्वेद्युरुभयद्युरभ्येति, तृतीय-काय नमोऽस्तु तक्मने।।४।। नमस्ते अधि-वाकाय, परा-वाकाय ते नमः। सु-मत्यै मृत्यो ते नमो, दुर्मत्यै ते इदं नमः।।५।। नमस्ते यातुधानेभ्यो, नमस्ते भेषजेभ्यः। नमस्ते मृत्यो मूलेभ्यो, ब्राह्मणेभ्यो इदं नमः।।६।। नमो देव-वधेभ्यो, नमो राजवधेभ्यः। अधो यें विश्वानां, वधास्तेभ्यो मृत्यो नमोऽस्तु ते।।७।। नमस्तेऽस्तु नारदा नुष्ठ विदुषे वशा। कतमासां भीस-तमा यामदत्वा परा-भवेत्।।८।। नमस्तेऽस्तु विद्युते, नमस्ते स्तनयित्लवे । नमस्तेऽस्तुवश्मने, येना दूडाशे अस्यसि।।९।। नमस्तेऽस्त्वायते नमोऽस्तु पराय ते। नमस्ते प्राण तिष्ठत, आसीनायोत ते नमः।।१०।। नमस्तेऽस्त्वायते नमोऽस्तु पराय ते । नमस्ते रुद्र तिष्ठत, आसीनायोत ते नमः।।११।। नमस्ते जायमानायै, जाताय उत ते नमः। वालेभ्यः शफेभ्यो, रुपायाध्न्येन्ते नमः।।१२।। नमस्ते प्राणा-क्रन्दाय, नमस्ते स्तनयित्लवे। नमस्ते प्राणा-विद्युते, नमस्ते प्राण-वर्षते।।१३।। नमस्ते प्राणा प्राणाते, नमोऽस्त्वपानते। पराचीनाय ते नमः, प्रतीचीनाय ते नमः, सर्वस्मैत इदं नमः।।१४।।नमस्ते राजन्। वरुणास्तु

मन्यवे,विश्व हयग्र निचिकेषि दुग्धम्। सहस्त्रामन्यान् प्रसुवामि, साकं शतं जीवाति शरदस्यवायं।।१५।। नमस्ते रुद्रास्य ते नमः प्रतिहितायै। नमो विसृज्य-मनायै, नमो निपतितायै।।१६।। नमस्ते लाङ्गलेभ्यो, नमः ईषायुगेभ्यः। वीरुत् क्षेत्रिय-नाशन्यप क्षेत्रियमुच्छतु।।१७।। नमो गन्धर्वस्य, नमसे नमो भामाय चक्षुष च कृण्मः। विश्वावसो ब्रह्मणा ते नमोऽभि जाया अप्सरसः परेहि।।१८।। नमो यमाय, नमोऽस्तु मृत्यवे,नमः पितृभ्य उतते ययन्ति। उत्पारणस्य यो वेद, तमाग्नि पुरो दधेस्मा अरिष्टतातये।।१९।। नमो रुद्राय, नमोऽस्तु तक्मने, नमो राज्ञे वरुणायं त्विषीमते। नमो दिवे, नमः पृथिव्यै, नमः औषधीभ्यः।।२०।। नमो रुराय च्यवनाय, नोदनाय धृष्णवे। नमःशीताय, पुर्व काम कृत्वने।।२१।। नमो वः पितर उर्जे, नमो वः पितरो रसाय।।२२।। नमो वः पितरो भामाय, नमो वः पितरो मन्यवे।।२३।। नमो वः पितरो यद-घोरं, तस्मै नमो वः पितरो, यत् क्रूरं तस्मै।।२४।।

।। पितृसूक्त।।

उदीरतामवर उत् परास उन्मध्यमाः पितरः सोम्यासः।
असुं य ईयरवृका ऋतज्ञास्ते नोऽवन्तु पितरो हवेषु।।१।।
इदं पितृभ्यो नमो अस्त्वद्य ये पूर्वासो य उपरास ईयुः।
ये पार्थिवे रजस्या निषत्ता ये वा नूनं सुवृजनासु विक्षु।।२।।
आहं पितृन् त्सुविदत्राँ अवित्सि नपातं च विक्रमणं च विष्णोः।
बर्हिषदो ये स्वधया सुतस्य भजन्त पित्वस्त इहागमिष्ठाः।।३।।
बर्हिषदः पितर ऊत्य१र्वागिमा वो हव्या चकृमा जुषध्वम्।
त आ गतावसा शंतमेनाऽथा नः शं योररपो दधात।।४।।
उपहूताः पितरः सोम्यासो बर्हिष्येषु निधिषु प्रियेषु।
त आ गमन्तु त इह श्रुवन्त्वधि ब्रुवन्तु तेऽवन्त्वस्मान्।।५।।
आच्या जानु दक्षिणतो निषद्येमं यज्ञमभि गृणीत विश्वे।
मा हिंसिष्ट पितरः केन चिन्नो यद्व आगः पुरुषता कराम।।६।।
आसीनासो अरुणीनामुपस्थे रयिं धत्त दाशुषे मर्त्याय।।
पुत्रेभ्यः पितरस्तस्य वस्वः प्र यच्छत त इहोर्जं दधात।।७।।

ये नः पूर्वे पितरः सोम्यासो ऽनूहीरे सोमपीथं वसिष्ठाः।
तेभिर्यमः संरराणो हवींष्युशन्नुशद्भिः प्रतिकाममत्तु।।८।।
ये तातृषुर्देवत्रा जेहमाना होत्राविदः स्तोमतष्टासो अर्कैः।
आग्ने याहि सुविदत्रेभिरर्वाङ् सत्यैः कव्यैः पितृभिर्घर्मसद्भिः।।९।।
ये सत्यासो हविरदो हविष्पा इन्द्रेण देवैः सरथं दधानाः।
आग्ने याहि सहस्त्रं देववन्दैः परैः पितृभिर्घर्मसद्भिः।।१०।।
अग्निष्वात्ताः पितर एह गच्छत सदः सदः सदत सुप्रणीतयः।
अत्ता हवींषि प्रयतानि बर्हिंष्यथा रयिं सर्ववीरं दधातन।।११।।
त्वमग्न ईळितो जातवेदो ऽवाड्ढव्यानि सुरभीणि कृत्वी।
प्रादाः पितृभ्यः स्वधया ते अक्षन्नध्दि त्वं देव प्रयाता हवींषि।।१२।।
ये चेह पितरो ये च नेह याँश्च विद्म याँ उ च न प्रविद्म।
त्वं वेत्थ यति ते जातवेदः स्वधाभिर्यज्ञं सुकृतं जुषस्व।।१३।।
ये अग्निदग्धा ये अनग्निदग्धा मध्ये दिवः स्वधया मादयन्ते।
तेभिः स्वराळसुनीतिमेतां यथावशं तन्वं कल्पयस्व।।१४।।
(ऋक. १०/१५)

। पितृस्तोत्रं पितृस्तुतिः।

श्रीगारुडे महापुराणे पितृस्तोत्रे रुचिस्तोत्रं नाम

ऊननवतितमोऽध्यायान्तर्गतम्।

रुचिरुवाच।

नमस्तेऽहं पितृन्भक्त्या ये वसन्त्यधिदेवतम्। देवताः

देवैरपि हि तर्प्यन्ते ये श्राध्देषु स्वधोत्तरैः।।१।।१,८९.१३

नमस्येऽहं पितृन्स्वर्गे ये तर्प्यन्ते महर्षिभिः।

श्राध्दैर्मनोमयैर्भक्त्या भुक्तिमुक्तिमभीप्सुभिः।।२।।१,८९.१४

नमस्येऽहं पितृन्स्वर्गे सिद्धाः सन्तर्पयन्ति यान्।

श्राध्देषु दिव्यैः सकलैरुपहारैरनुत्तमैः।।३।। १,८९.१५

नमस्येऽहं पितृन्भक्त्या येऽर्च्यन्ते गुह्यकैर्दिवि

तन्मयत्वेन वाञ्छद्भिमात्यन्तिकीं पराम्।।४।। १,८९.१६

नमस्येऽपितृन्मत्यैरर्च्यन्ते भुवि ये सदा।

श्राध्देषु श्रध्दयाभीष्टलोकपुष्टिप्रदायिनः।।५।।१,८९.१७

नमस्तेऽहं  पितृन्विप्रैरर्च्यन्ते भुवि ये सदा।

वाञ्छिताभीष्टलाभाय प्राजापत्यप्रदायिनः।।६।।१,८९.१८
नमस्तेऽहं पितॄन्ये वै तर्प्यन्तेऽ रण्यवासिभिः।
वन्यैः श्राध्दैर्यताहारैस्तपोनिर्धूतकल्मषैः।।७।।१,८९.१९
नमस्येऽहं पितॄन्विप्रैनैष्ठिकैर्धर्मचारिभिः।
ये संयतात्मभिर्नित्यं सन्तर्प्यन्ते समाधिभिः।।८।।१,८९.२०
नमस्तेऽहं पितॄञ्छ्राध्दै राजन्यास्तर्पयन्ति यान्।
कव्यैरशेषैर्विधिवल्लोकद्वयफलप्रदान्।।९।।१,८९.२१
नमस्येऽहं पितॄन्वैश्यैरर्च्यन्ते भुवि ये सदा।
स्वकर्माभिरतैर्न्नित्यं पुष्पधूपान्नवारिभिः।।१०।।१,८९.२२
नमस्तेऽहं पितॄञ्छ्राध्दे शूद्रैरपि च भक्तितः।
सन्तर्प्यते जगत्कृत्स्नं नाम्ना ख्याताः सुकालिनाः।।११।।१,८९.२३
नमस्येऽहं पितॄञ्छ्राध्दे पाताले ये महासुरैः।
सन्तर्प्यन्ते सुधाहारास्त्यक्तदम्भमदैः सदा।।१२।।१,८९.२४
नमस्येऽहं पितॄञ्छ्राध्दैरर्च्यन्ते ये रसातले।
भोगैरशेषैर्विधिवन्नागैः कामानभीप्सुभिः।।१३।।१,८९.२६

नमस्तेऽहं पितृञ्छ्राध्दैः सर्पैः सन्तर्पितान्सदा।
तत्रैव विधिवन्मन्त्रभोगसम्पत्समन्वितैः।।१४।।१,८९.२६
पितृन्नमस्ये निवसन्ति साक्षाद्ये देवलोकेऽथ महीतले वा।
तथाऽन्तरिक्षे च सुरारपूज्यास्ते वै प्रतीच्छन्तु मयोपनीतम्।।१५।।१,८९.२७
पितृन्नमस्ये परमार्थभूता ये वै विमाने निवसन्त्यमूर्ताः।
यजन्ति यानस्तमलैर्मनोभिर्योगीश्वराः क्लेशविमुक्तिहेतून्।।१६।।१,८९.२८
पितृन्नमस्ये दिवि ये च मूर्ताः स्वधाभुजः काम्यफलाभिसन्धौ।
प्रदानशक्ताः सकलेप्सितानां विमुक्तिदा येऽनभिसंहितेषु।।१७।।१,८९.२९
तृप्यन्तु तेऽस्मिन्पितरः समस्ता इच्छावतां ये प्रदिशन्ति कामान्।
सुरत्वमिन्द्रत्वमितोऽधिकं वा गजाश्वरत्नानि महागृहाणि।।१८।।१,८९.३०
सोमस्य ये रश्मिषु येऽर्कबिम्बे शुक्ले विमाने च सदा वसन्ति।
तृप्यन्तु तेऽस्मिन्पितरोऽन्नतोयैर्गन्धादिना पुष्टिमितो व्रजन्तु।।१९।।१,८९.३१
येषां हुतेऽग्नौ हविषा च तृप्तिर्ये भुञ्जते विप्रशरीरसंस्थाः।
ये पिण्डदानेन मुदं प्रयान्ति तृप्यन्तु तेऽस्मिन्पितरोऽन्नतोयैः।।२०।।१,८९.३२
ये खड्गमांसेन सुरैरभीष्टैः कृष्णैस्तिलैर्दिव्य मनोहरैश्च।

कालेन शाकेन महर्षिवर्यैः सम्प्रीणितास्ते मुदमत्र यान्तु।।२१।।१,८९.३३
कव्यान्यशेषाणि च यान्यभीष्टान्यतीव तेषां मम पूजितानाम्।
तेषाञ्च सान्निध्यमिहास्तु पुष्पगन्धाम्बुभोज्येषु मया कृतेषु।।२२।।१,८९.३४
दिनेदिने ये प्रतिगृह्णतेऽर्चां मासान्तपूज्या भुवि येऽष्टकासु।
ये वत्सरान्तेऽभ्युदये च पूज्याः प्रयान्तु ते मे पितरोऽत्र तुष्टिम्।।२३।।१,८९.३५
पूज्या द्विजांना कुमुदेन्दुभासो ये क्षत्रियाणां ज्वलनार्कवर्णाः।
तथा विशां ये कनकावदाता नीलीप्रभाः शूद्रजनस्य ये च।।२४।।१,८९.३६
तेऽस्मिन्समस्ता मम पुष्पगन्धधूपाम्बुभोज्यादिनिवेदनेन।
तथाऽग्निहोमेन च यान्ति तृप्तिं सदा पितृभ्यः प्रणतोऽस्मि तेभ्यः।।२५।।१,८९.३७
ये देवपूर्वाण्यभितृप्तिहेतोर श्नन्ति कव्यानि शुभाहृतानि।
तृप्ताश्च ये भूतिसृजो भवन्ति तृप्यन्तु तेऽस्मिन्प्रणोऽस्मि तेभ्यः।।२६।।१,८९.३८
रक्षांसि भूतान्यसुरांस्तथोग्रात्रिर्णाशयन्तु त्वशिवं प्रजानाम्।
आद्याः सुराणाममरेशपूज्यास्तृप्यन्तु तेऽस्मिन्प्रणोऽस्मितेभ्यः।।२७।।१,८९.३९
अग्निष्वात्ताःबर्हिषद आज्यपाः सोमपास्तथा।
व्रजन्तु तृप्तिं श्राद्धेऽस्मिन्पितरस्तर्पिता मया।।२८।।१,८९.४०

अग्निष्वात्ताः पितृगणाः प्राचीं रक्षन्तु मे दिशम्।
तथा बर्हिषदः पान्तु याम्यां मे पितरः सदा।
प्रतीचीमाज्यपास्तद्वदुदीचीमपि सोमपाः।।२९।।१,८९.४१
रक्षोभूतपिशाचेभ्यस्तथैवासुरदोषतः।
सर्वतः पितरे रक्षां कुर्वन्तु मम नित्यशः।।३०।।१,८९.४२
विश्वो विश्वभुगाराध्यो धर्मो धन्यः शुभाननः।
भूतिदो भूतिकृद्भूतिः पितृणां ये गणा नव।।३१।।१,८९.४३
कल्याणः कल्यदः कर्ता कल्यः कल्यतराश्रयः।
कल्यताहेतुरन्घः षडिमे ते गणाः स्मृता।।३२।।१,८९.४४
वरो वरेण्यो वरदस्तुष्टिदः पुष्टिदस्तथा।
विश्वपाता तथा धाता सप्तैते च गणाः स्मृताः।।३३।।१,८९.४५
महान्महात्मा महितो महिमावान्महाबलः।
गणाः पञ्च तथैवैते पितृणां पापनाशनाः।।३४।।१,८३.४६
सुखदो धनदश्चान्यो धर्मदोऽन्यश्च भूतिदः।
पितृणां कथ्यते चैव तथा गणचतुष्टयम्।।३५।।१,८९.४७

एकत्रिंशत्पितृगणा यैर्व्याप्तमखिलं जगत्।
त एवात्र पितृगणास्तुष्यन्तु च मदाहितात्।।३६।।१,८९.४८
मार्कण्डेय उवाच।
एवं तु स्तुवतस्तस्य तेजसोराशिरुच्छ्रितः।
प्रादुर्बभूव सहसा गगनव्याप्तिकारकः।।३७।।१,८९.४९
तद्दृष्ट्वा समुहत्तेजः समाच्छाद्य स्थितं जगत्।
जानुभ्यामवानीं गत्वा रुचिः स्तोत्रमिदञ्जगौ।।३८।।१,८९.५०
रुचिरुवाच।
अर्चितानाममूर्तानां पितृणां दीप्ततेजसाम्।
नमस्यामि सदा तेषां ध्यानिनां दिव्यचक्षुषाम्।।३९।।१,८९.५१
इन्द्रादीनां च नेतारो दक्षमारीचयोस्तथा।
सप्तर्षीणां तथाऽन्येषां तान्नमस्यामि कामदान्।।४०।। १,८९.५२
मन्वादीनां च नेतारः सूर्याचन्द्रमसोस्तथा।
तान्नमस्याम्यहं सर्वान्पितृनप्युदधावपि।।४१।।१,८९.५३
नक्षत्राणां ग्रहाणां च वाय्वग्न्योर्नभसस्तथा।

द्यावापृथिव्योश्च तथा नमस्यामि कृताञ्जलिः।।४२।।१,८९.५५
प्रजापतेः कश्यपाय सोमाय वरुणाय च।
योगेश्वरेभ्यश्च सदा नमस्यामि कृताञ्जलिः।।४३।।१,८९.५५
नमो गणेभ्यः सप्तभ्यस्तथा लोकेषु सप्तसु।
स्वायम्भुवे नमस्यामि ब्रह्मणे योगचक्षुषे।।४४।।१,८९.५६
सोमाधारान्पितृगणान्योगमूर्तिधरांस्तथा।
नमस्यामि तथा सोमं पितरं जगतामहम्।।४५।।१,८९.५७
अग्निरुपांस्तथैवान्यान्नमस्यामि पितृनहम्।
अग्निसोममयं विश्वं यत एतदशेषतः।।४६।।१,८९.५८
ये च तेजसि ये चैते सोमसूर्याग्निमूर्तयः।
जगत्स्वरुपिणश्चैव तथा ब्रह्मस्वरुपिणः।।४७।। १,८९.५९
तेभ्योऽखिलेभ्यो योगिभ्यः पितृभ्यो यतमानसः।
नमोनमो नमस्तेऽस्तु प्रसीदन्तु स्वधाभुजः।।४८।।१,८९.६०
इति श्रीगारुडे महापुराणे पूर्वखण्डे प्रथमांशाख्ये आचारकाण्डे
रुचिकृतपितृस्तोत्रं नामैकोननवतितमोऽध्यायान्तर्गतम्